

# ॥ अष्टसिद्धि ॥

# ॥ अष्टसिद्धि ॥

लेखक

चंद्रकांत केणी

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ समिति

ASHTASIDDHI

# अष्टसिद्धि

©
सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

अक्षर जुळणी व मुद्रण

सुरेश तिमाजी शणै काकोडकार
ओमेगा एन्टरप्राइझेस्
११५८, विद्यानगर, मडगांव - गोवा.

प्रकाशक

वासुदेव वसंतराव शेणवी धेंपे
अध्यक्ष, श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ समिति
पर्तगाळ,काणकोण - गोवा ३०१ ७०२

मूल्य : रु.१२५/-

# प्राक्कथन

परमपूज्य श्रीमद् विद्याधिराजतीर्थ स्वामीजी गंडकी यात्रेला निघाले आणि पश्चिम भारतांतील सारस्वत समाजाचें चित्त विचलित झालें. श्री विद्याधिराजतीर्थांनी यापूर्वी यात्रा केल्या नव्हत्या अशांतला भाग नाहीं. अष्टमहाक्षेत्र यात्रा, चतुर्धाम यात्रा, सप्तपुरी यात्रा तर त्यांनी केल्याच. त्याशिवाय जेथें जेथें तीर्थक्षेत्र अथवा देवमंदिरें असतील तेथें जाऊन श्रीनारायण स्मरण करण्याची प्रथा त्यांनी पाडून घेतली होती. फार कशाला, हिमालयांतील बदरीनाथ येथें त्यांनी चातुर्मास व्रताचरण करण्याचा जो संकल्प केला, तो साहसीच होता. तें क्षेत्र दुर्गम आहे, कडे कोसळून वाहतूक दिवसेन् दिवस बंद राहते, तर कधीं गांवचे गांव दरडीखालीं चिरडले जातात, अशा वार्ता आपले लोक वाचत होते. परंतु अलकनंदेच्या किनाऱ्यावर वसलेल्या बदरी विशालच्या सान्निध्यांतच श्रीगोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठाचे संस्थापक श्रीमन्नारायणतीर्थ यांनी आश्रमस्वीकार केला होता. एका अर्थाने मठसंस्थापनेचें बीज नरनारायणाच्या साक्षीने उत्तुंग हिमालयाच्या कुशींत पेरण्यांत आलें होतें. गत पांचशें वर्षांच्या काळांत श्रीमठ परंपरेंतील अनेक स्वामीजींनी पायीं चालून बदरीनाथ यात्रा केल्याच्या नोंदी मठाच्या दप्तरांत सांपडतात. त्याच कारणासाठीं इ.स.१९८६ मधील चातुर्मास व्रताचें आचरण पूज्य श्री विद्याधिराजतीर्थांनी बदरीनाथ येथे केलें आणि त्या निमित्ताने पश्चिम भारतांतील शेंकडो मठानुयायी व इतर भाविक बदरिकाश्रमाची यात्रा करून परतले. त्याच मुक्कामांत श्रीस्वामीजींनी बदरिकाश्रमांत श्रीमठाच्या शाखेचा शिलान्यास केला आणि त्या तीर्थक्षेत्रांकडील सारस्वत समाजाचें नातें अतूट राहील याची तरतूद केली. पुढें इ.स. १९८९ मध्यें बदरीनाथ मठाला श्रीजीवोत्तम मठ असें नामाभिदान देऊन श्रीविद्याधिराजतीर्थांनी त्याचें उद्घाटन केलें. या साऱ्या कार्याची समाज कृतज्ञ मनाने नोंद घेत होता. तरी त्यांत कांहीं साहस आहे असा विचार त्यांच्या मनांत आला नव्हता. पण गंडकी यात्रेची वार्ता समस्त समाजामध्यें चिंतेची लाट पसरवून गेली. खडतर, अवघड, दुर्गम भागांतून श्रीस्वामीजी मजल दरमजल पदयात्रा करीत होते आणि कौतुकमिश्रित आश्चर्याने व मानवसुलभ चिंतेने समाजाचें चित्त त्यांच्या पदमुद्रांवर खिळून राहिलें होतें. आणि जेव्हां यात्रेची यशस्वी परिपूर्ति करून श्रीस्वामीजी १२ ऑक्टोबर रोजीं वारणासीला पोंचले त्यावेळीं त्यांच्या स्वागतासाठीं समाजाचे प्रतिनिधि मोठ्या संख्येने उपस्थित झाले. पंचगंगा घाटावरील त्यांच्या कार्तिक कल्पवास काळांत हजारों मठानुयायांनी कार्तिक मासांतील गंगास्नानाचें पुण्य मिळविलें. त्या मुक्कामांत गंगा दीपोत्सव साजरा झाला. सूर्यास्त होतांच गंगा घाटावर दश लक्षद्वीप प्रज्वलित झालेले तें दृश्य अविस्मरणीय होतें. नौकाविहार करून श्रीस्वामीजींनी तें दृश्य पाहिलें. तेथें गेलेल्या शेकडों मठानुयायांनाहि तें पाहतां आलें. वारणासी मुक्कामांत

काशी मठाधीश श्रीसुधींद्रतीर्थ यांच्याशीं झालेला वार्तालाप आणि कैवल्य मठाच्या नूतन वास्तूच्या बांधकामाची पाहणी श्री स्वामीजींनी केली. या यात्रेचा समाज मानसावर इतका सखोल परिणाम झाला कीं परतीचा प्रवास हा आनंदोत्सवाचा भाग ठरला. जेव्हां श्रीस्वामीजी पर्तगाळी मठांत परतले, त्या दिवशीं तर या आनंदाला उधाण आल्याचें दृष्य पहायला मिळालें. (परिशिष्ट ७ पहा)

सव्वीस वर्षांपूर्वी श्रीगुरुपीठावर आल्यापासून श्रीस्वामीजींनी असंख्य सिद्धि प्राप्त केल्या. आम्ही समकालीन मठानुयायी मोठ्या अचंब्याने स्वामीजींच्या कार्यशक्तीचें व दिव्य दृष्टीचें कौतुक करीत राहिलों. समाजामध्यें जागृति करून समाजाचे मठ व देवमंदिरांकडील संबंध त्यांनी दृढतर केले आणि सामाजिक ऐक्याच्या प्रक्रियेला नवी चालना दिली. मठवास्तु व देवमंदिरांचे जीर्णोद्धार करविले व नूतन देवप्रतिमा व शिखर कलशांची प्रतिष्ठापना करवून देवमंदिरांचे वैभव व सौंदर्य वृद्धिंगत केलें आणि यज्ञ-यागादि अनुष्ठानांद्वारें धर्म व धार्मिकतेला पोषक असें वातावरण निर्मिलें. श्रीसंस्थानचा मुख्य मठ असलेल्या पर्तगाळी क्षेत्राचा कायाकल्प घडवून आणून श्रीरामदेवाच्या गळ्यांत मठवास्तुरूपी माला अर्पण केली. श्रीमठ संस्थापनेच्या पंचशताब्दि महोत्सवाचें आयोजन करून इतिहासवशात् इतस्ततः विखुरलेल्या सारस्वत समाजाचें हरवलेलें नातें पुन्हा जुळविण्याची प्रक्रिया कार्यरत केली. 'विद्याधिराज पुरस्कार' व इतर सत्कारांचें आयोजन करून समाजांतील गुणिजनांना त्यांच्या सत्कार्याची पावती देण्याची प्रथा पाडली. वैयक्तिक प्रकृति अस्वास्थ्याकडे दुर्लक्ष करून ध्यान, चिंतन, मनन व अध्ययन अखंड चालू ठेवलें. या स्वाध्याय कार्याचा कळस म्हणजे श्रीमन्न्यायसुधामंगल पाठाची यशस्वी परिपूर्ति होय. तीर्थाटने तर केलींच, शिवाय अनेक वैयक्तिक व सामुदायिक समस्यांचें कौशल्यपूर्वक निवारण केलें. श्रीस्वामीजींनी अशा असंख्य सिद्धि मिळवल्या. त्यांतील आठ ठळक सिद्धींची नोंद रहावी या भावनेने या 'अष्टसिद्धि' पुस्तकाचें संकलन केलें आहे. या उपक्रमांत माझे निकट सहकारी व अभिमानी मठानुयायी श्री. नारायण जयवंत प्रभु वादोळकर यांचें तत्पर सहाय्य मिळालें आणि परम पूज्य श्रीस्वामीजींनीहि श्रीमठाच्या दफ्तरांत असलेली माहिती आम्हाला उपलब्ध करून दिली. इतकेंच नव्हे, तर अनेक शंकांचें समाधानहि केलें. हें ऋण थोडके नाहीं. त्यामुळेंच या पुस्तकाला थोडेसे अधिकृत स्वरूप प्राप्त होऊं शकलें. श्रीमठ कमिटीचे अध्यक्ष श्री. वासुदेव वसंतराव शेणवी धेंपे यांनी सुरुवातीपासून या पुस्तकाची कल्पना उचलून धरली आणि पुस्तकाच्या मुद्रणाची व्यवस्था करविली. आज श्रीमठाच्या ५२५ व्या संस्थापनदिनीं आणि परमपूज्य श्रीविद्याधिराजतीर्थांच्या गुरुपीठारोहणाच्या सव्विसाव्या वर्धापन दिनीं हें लहानसें पुस्तक श्रीगुरुचरणीं अर्पण करताना मी धन्यता अनुभवीत आहें.

पर्तगाळ, चैत्र शु।। २, शके १९२१
दि. १९ मार्च, १९९९

- चंद्रकांत शांताराम केणी

# श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश
# परम पूज्य श्रीविद्याधिराज तीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजींच्या
# अष्टसिद्धि

**१. तीर्थयात्रा व पुण्यक्षेत्र दर्शन**

(अष्ट महाक्षेत्र, गंडकी-शालिग्राम क्षेत्र, आदि)

(श्रीनारायणसान्निध्याचे अनेकविध अनुभव)

**२. मठ वास्तूंचे जीर्णोद्धार**

(आद्य मठ वारणासी, गोकर्ण, बसरूर, भटकळ, रिवण, इ.)

(इतिहासिक कडील पुरातन नामे दृढतर)

**३. नूतन मठवास्तूंचे निर्माण**

(मडगांव, हुब्बळी, बेळगांव, बद्रीनाथ, दांडेली, इ.)

(सारस्वत समाजाच्या नव्या केंद्रांमध्यें धर्म संस्कृतीच्या रक्षणाची तरतूद)

**४. श्रीमठसंस्थापनेचा पंचशताब्दि महोत्सव**

(ऐतिहासिक कारणासाठी विखुरलेल्या समाज प्रतिनिधीच्या स्नेहमीलनाद्वारे संघटनाची प्रक्रिया कार्यरत)

**५. सुधान्त अध्ययन**

(काव्य : रघुवंश, कुमारसंभवम्, कीरातार्जुनीय, वैषध

न्याय : दिनकरि मंगल वाद पर्यंत

व्याकरण : सिद्धांत कौमुदि.

वेदान्त : दशप्रकरण व दश उपनिषत्

श्रीमध्वाचार्यकृत सर्व मूल ग्रंथ

वाचनासह सुधांत अध्ययन)

(स्वाध्यायाद्वारे जिज्ञासापूर्ति व आत्मोन्नति)

**६. यज्ञ-याग**

महासुदर्शन, कोटि राम-नाम यज्ञ, सहस्र भोजन, सहस्र कलश इ. धार्मिक कृत्ये

(सामाजिक चित्तशुद्धीद्वारे धर्म व धार्मिकतेची भावना वृद्धिंगत)

**७. कल्पवास - प्रयाग क्षेत्री**

(संन्यस्त धर्माचे दक्षतापूर्वक पालन)

**८. पर्तगाळ मठाचा पूर्ण विस्तार**

(पुरातन मठाचा तीन टप्प्यांत विस्तार)

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्राक्कथन ... | ५ |
| | अष्टसिद्धि ... | ७ |
| १. | पंचगंगावळी ... | ९ |
| २. | सेनापुर आचार्य घराणें ... | १० |
| ३. | एक प्याला वात्सल्याचा ... | १४ |
| ४. | तरुण निग्रही तपस्वी ... | २५ |
| ५. | पंचशताब्दि महोत्सव ... | ३१ |
| ६. | वारणासी क्षेत्रांत सारस्वत मठ ... | ३६ |
| ७. | पर्तगाळ येथील मठवास्तु ... | ४१ |
| ८. | श्री विद्याधिराजतीर्थांचें कार्य ... | ४६ |
| ९. | केल्याने तीर्थाटन.... ... | ५१ |
| १०. | गंडकी यात्रेची पार्श्वभूमि ... | ६३ |
| ११. | गंडकी वासरी ... | ६८ |
| १२. | गंडकी यात्रेचें प्रयोजन व अनुभव : मुलाखत ... | ७९ |
| १३. | तीर्थक्षेत्रांचें संदर्शन ... | ८५ |

परिशिष्ट

| | | |
|---|---|---|
| १. | मल्ल्यार मठ : एक सोनेरी प्रकरण ... | ८९ |
| २. | श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींची जन्मकुंडली ... | ९२ |
| ३. | श्री विद्याधिराज पुरस्काराचे मानकरी ... | ९३ |
| ४. | द्वैत संप्रदायाचे संस्थापक : श्री मध्वाचार्य ... | ९४ |
| ५. | पर्तगाळ परिसरांतील या पूर्वीचे जीर्णोद्धार ... | ९८ |
| ६. | अष्टोत्तर-शत दिव्य विष्णुस्थान ... | ९९ |
| ७. | वारणासी येथील गौरवपत्र ... | १०३ |
| ८. | मठग्रामस्थांनी दिलेलें मानपत्र (मूळ संस्कृत) ... | १०५ |
| ९. | मानपत्राचा मराठी अनुवाद ... | १०७ |

# १. पंचगंगावळीं

दक्षिण कन्नड जिल्ह्यांतील गंगोळ्ळी हा गांव संगम क्षेत्रावर वसलेला आहे. सह्याद्रि पर्वत रांगांच्या कुशींत जन्म घेतलेल्या पांच लोकमाता (गंगा) आपल्या दुतर्फा पसरलेला परिसर सुजलाम् सुफलाम् करीत सागर सान्निध्यांत पोचतात तेव्हां थोड्याफार थकून भागून मंदावतात आणि आपल्या कार्याची परिपूर्ति झाल्याच्या कृतार्थतेने काहींशा भावपूर्ण आवेशांत त्या स्वतःस सागराच्या विशाल जलाशयांत झोंकून देऊन आत्मविलोपन करून बसतात. या पांचहि नद्यांचीं मुखें गंगोळ्ळीच्या किनाऱ्यावर उभे राहिल्यास पहायला मिळतात. सागर संगम पाहतांना हृदयांत उर्मी उसळूं लागतात. वेळ संध्याकाळची असेल तर सुदूर पश्चिमेला क्षितिजाकडे झेप घेणारें लालभडक सूर्यबिंब पहायला मिळतें. मावळत्या सूर्याचे लाल सोनेरी किरण समुद्राच्या पृष्ठभागावर व संगमस्थानावर झळाळतात. त्या सह्य सोनेरी किरणांच्या स्पर्शाने संथ पाणी शहारतें आणि गुदगुल्या झाल्यागत तें थरारतें. त्यांतहि मावळत्या सूर्याचें दर्शन घेण्यासाठीं जेव्हां मासोळ्यांच्या समुहांमध्यें स्पर्धा लागते तेव्हां तें दृश्य अधिकच मनोहर असतें. क्षणार्धांत सूर्यनारायण धीरगंभीरपणे सागरांत एक डुबकी घेतो आणि पुन्हा डोकें वर काढल्याचा आभास निर्माण करीत अदृश्य होतो. पश्चिमेकडील आकाशांत लालिमा फांकतो आणि पूर्वेकडील आकाशांत डौलदार चंद्र रिक्त आकाशाचा ताबा घेऊं लागतो. आणि मग सूर्य गेल्याची खात्री करण्यासाठीं एक एक तारका आपल्या कवाडाआडून हळूच डोकावून पाहते आणि सूर्य अस्तास गेल्याची खात्री करून निर्धास्तपणे आपआपल्या अंगणांत बागडूं लागतात आणि पाहतां पाहतां सारें आकाश ज्योतिर्मय बनून जातें. भूतलावर काळोखाचे पांघरुण पसरत असतानाच नभांगण दीपोत्सव साजरा करीत असतें.

पहांटेच्या वेळीं अनुभव वेगळाच असतो. पूर्व क्षितिजावरील सूर्योदय डोळ्यांचें पारणें फेडतो आणि त्याची प्रभा क्षितिजाचे कवच भेदून इतस्ततः पसरतें तेव्हां तारका घाबऱ्या घुबऱ्या होऊन ढगांआड जाऊं लागतात आणि चंद्र देखील आपला डौल आवरीत थोडासा निस्तेज बनूं लागतो.

वेळ सकाळची असो, तिन्हीसांजेची असो वा मध्यान्हाची, पंचगंगांचा प्रवाह अखंड वहात असतो. नगाधिराजाकडून आणलेली तीर्थाची कावड एकएक प्रवाह सागराकडे अलगद सुपूर्द करीत राहतो.

दुसऱ्या कोणत्याही संगम क्षेत्रावर असेंच दृश्य पहायला मिळेल यांत शंका नाहीं. पण गंगोळ्ळीचें कौतुक अशासाठीं कीं तेथें पांच गंगांचा संगम एकाच वेळी पहायला मिळतो आणि या संगमांवर दृष्टि स्थिरावून कुणी ध्यानस्थ होतो तर कोणी निसर्गाच्या अलौकिक लीला पाहून मंत्रमुग्ध होऊन जातो. या नद्यांच्या संगमामध्यें संगीत आहे, ताल आहे, नाद व तालब्रह्माचा साक्षात्कार घडविण्याची शक्ति आहे. फक्त हवी आहे ती दृष्टि आणि त्या दृष्टीला भावनांची जोड.

गंगोळ्ळी हें तसें एक लहानसें खेडें. जलमार्गाचे महत्त्व ओसरले असले तरी गंगोळ्ळी बंदराचे महत्त्व घटलेलें नाहीं. दक्षिण कन्नड जिल्ह्यांतील तें मुख्य मासेमारी केंद्र. आणि या व्यवसायाशीं संलग्न माणसें श्रावण पौर्णिमेला पंचक्रोशींतून एकत्र होतात आणि सागराला नारळ अर्पून आणि यज्ञोपवीत दान करून एखाद्या उन्मत वृषभाला वश करावा त्या भावनेने सागराफुडें नतमस्तक होतात. पुढील मृग नक्षत्र लागेपर्यंत गंगोळ्ळी हें ह्या लोकांचें वास्तव्यस्थान. एका दिवसांत गंगोळ्ळीची लोकसंख्या द्विगुणित होते. सागर किनारीं उलाढाली वाढूं लागतात. जलसंपत्तीचें वहन करणारे लहानमोठे मचवे व होड्या दाटीवाटीने गंगोळ्ळी किनाऱ्यावर येऊन धडकतात. रस्त्यावरून मालवाहू वाहनांच्या पण रांगा लागतात. दिवसभरांत लाखो रुपयांची उलाढाल होते. पावसाळा संपला म्हणजे गंगोळ्ळीच्या बाजारालाहि बरकत येते. अनेक नवीं दुकानें थाटलीं जातात. मनोरंजनाचे कार्यक्रम आणि सिनेमागृहें देखील सुरू होतात.

असा हा गंगोळ्ळी गांव. बाजारपेठेमध्यें कौलें, तांदूळ, धान्ये, नारळ व तत्सम मालाची उलाढाल थोडकी नसते. गांवांत व्यंकटरमणाचें एक प्राचीन, जागृत देवस्थान आहे. या देवस्थानच्या स्थापनेची कथाहि आगळी वेगळी. (परिशिष्ट १ पहा)

## २. सेनापुर आचार्य घराणें

गोव्यांत ज्या वेळीं पोर्तुगिजाचें आक्रमण झालें त्यावेळी धर्म व संस्कृतीच्या रक्षणासाठीं असंख्य सारस्वत कुटुंबें देशाच्या इतर सुरक्षित भागांमध्ये स्थलांतरीत झालीं. अधिकांश कुटुंबें दक्षिणेकडे कर्नाटकांत इतस्ततः विखुरलीं. अशा स्थलांतरितांमध्यें मूळ वेर्णे गांवचे रहिवासी विठ्ठल मल्ल्या यांचे सुपुत्र नारायण मल्ल्या यांचा समावेश होता. या मल्ल्या कुटुंबियांनी आपल्या विद्वत्तेच्या व कार्यकुशलतेच्या बळावर केळदी राजघराण्याचा विश्वास संपादन केला. श्री नारायण मल्ल्या हे त्या संस्थानात महसूलमंत्री पदावर अधिष्ठीत होते. कर्नाटकांत व्यंकटापूर नांवांचे एक लहानसे खेडे आहे. शिराळी जवळच्या या खेड्यांत सुमारे ३४० वर्षापूर्वी श्री. गणपती मल्ल्या यांनी

श्रीलक्ष्मी व्यंकटेश शिलाविग्रहाचे एक सुबक देवमंदिर बांधून घेतलें होतें. स्वतः श्री. गणपती मल्ल्या यांचें होनावर येथें वास्तव्य असायचें. शके १७३९ या ईश्वर संवत्सरी श्री. गणपती मल्ल्या यांचे वंशज श्री. रामचंद्र कृष्ण मल्ल्या यानी व्यंकटापूर देवस्थान श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या परंपरेतील १६ वे आचार्य श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी यांस मंदिराचा जमीनजुमला दागिने-अलंकार यांसह अर्पण केलें.

या संदर्भात शार्वरी संवत्सरांत शके १५८३ मध्ये आश्विन पौर्णिमेच्या दिवशीं केळदी संस्थानिक सदाशिव नायक यांचा प्रपौत्र, संपर्ण नायक यांचा पौत्र सिद्धप्पा नायक यांचा पुत्र व्यंकटप्पा नायक यानी कूकनीर गांवातील जमीन गोकर्ण मठाला दानरूपाने दिली होती. या दोन्ही दानपत्रांचीं नावें संस्थानच्या इतिहासात व मठाच्या दप्तरांत आहेत.

दुसरे मंदिर लक्ष्मी व्यंकटेशाचे होन्नावर येथें सुमारे ३४० वर्षापूर्वी श्री. रामचंद्र मल्ल्या यांनी बांधून घेतलें. शिलाविग्रह असलेल्या या मंदिरास श्री शके १५८५ (सन् १६६३) शोभकृत संवत्सर, ज्येष्ठ पौर्णिमा या दिवशी सदर देवालयाच्या पूजा-अर्जा विनियोगासाठीं भद्रप्पा नायक यानी चंदावर सीमांतर्गत करीकेरे, गरणे गांवातील वडगेरे स्थळांतील शेतीवाडीची जमीन अर्पण केली. भद्रप्पा नायक हे शिवप्पा नायक यांचे पुत्र व सिद्धप्पा नायक यांचे पौत्र होत.

मल्ल्या कुटुंबियानी कासरकोड (विंदूमाधव व विश्वेश्वर देवालय) आणि हेजमाडी (व्यंकटेश देवालय) हीं दोन देवालये बांधून सारस्वत समाजाला अर्पण केलीं. याच मालिकेंतील पांचवे व सर्वात महत्त्वाचे देवालय म्हणजे गंगोळी येथील श्रीव्यंकटेश देवालय होय. वाराही, भद्रा, शुक्ती, खेटा व चक्रा या पांच नद्यांचा गंगोळी येथे संगम होत असतो. या पुरातन गांवाचा उल्लेख पंचगंगावळी, गंगावळी, पंचाप्सरस् तीर्थ असाही इतिहासांत सापडतो.

गंगोळीचे श्रीव्यंकटेश देवस्थान श्री. मल्ल्या यानी श्रीशके १५९० (सन १६६८) मध्ये गंगोळी येथील देवस्थान बांधून घेतलें. केळदी राजघराण्यातील सोमशेखर राजाची धर्मपत्नी चेन्नम्माजी यानी सदर देवस्थानच्या नित्य विधिविनियोगाप्रित्यर्थ शेतीवाडीची जमीन दानरूपाने देवालयाला अर्पण केली. (सन १६७४) ऐतिहासिक नोंदी, ताम्रपत्रांच्या व शिलालेखांच्या आधारे. ही गोष्ट स्पष्ट होते कीं, केळदी संस्थानच्या भद्रप्पा नायक राजाने इ.स. १६६२ मध्ये नारायण महाले यानी देवता विनियोगासाठीं जमीन दान केली होती.

गंगोळी येथील या मल्ल्यार मठाने सारस्वत समाजाच्या इतिहासांत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. गंगोळी देवस्थान स्थापन केल्यानंतर तेथे शास्त्रसंमत

पद्धतीने नित्य पूजा-अर्जा व्हावी यासाठी सुयोग्य अर्चकाचा शोध घेत संस्थापक नारायण महाले जवळच्या सेनापुर गांवातील आचार्य कुटुंबाच्या घरीं दाखल झाले. सेनापुर हें लहानसें गांव. परंतु सेनापुर आचार्य धराण्याचा विद्वत्तेची व चारित्र्याची कीर्ती आसमंतात पसरली होती. गावांतील तंटे-बखेडे या कुटुंबातील कर्ते पुरुष सामोपचाराने मिटवीत. अडल्या नडल्याची तत्परतेने सेवा करीत. अतिथी अभ्यागत, साधु-संन्याशी गांवांत आले तर त्यांचा योग्य आदरसत्कार याच घराण्याकडून होत असे. धर्मशास्त्र, आयुर्वेद; ज्योतिष आदि शास्त्रांत पारंगत असलेल्या या कुटुंबातील कर्ते पुरुष सदाचरणी व व्यवहारकुशल होते. या कुटुंबानें गंगोळी येथील श्री व्यंकटरमण देवस्थानचा कारभार स्वीकारला तर तो सुरळीत चालेल व लोकांमध्ये धर्म व धार्मिकता, सद्‌सद्‌विवेकबुद्धि, त्याचप्रमाणे संघटन शक्ति दृढ होईल, असा विचार श्री. नारायण महाले यानी केला होता.

इतिहासाच्या पुस्तकामध्ये श्री. नारायण महाले यांनी या मंदिराचा कारभार श्री. सेनापुर कृष्ण आचार्य यांजकडे सुपूर्द केल्याचा उल्लेख आहे. सेनापुर आचार्य घराणे कौंडिण्य गोत्री असून ते कालांतराने त्यांची एक शाखा गंगोळी येथे स्थायिक झाली. देवस्थानचा कारभार सुरळीत चालावा यासाठी श्री. नारायण मल्ल्या यांनी सुमारे ३२० क्विंटल तांदूळ पिकविणारी शेती व सेनापूर येथील जमीन देवस्थानाला दान करून टाकली होती. त्यांतून दैनिक पूजा-अर्चा व वार्षिक पंचपर्व सुरळीतपणे चालत असे. गंगोळी देवस्थानांतील पंचपर्वांतर्गत महापर्वणी म्हणजे वार्षिक महारथोत्सव होय. दरवर्षी फाल्गुन शुद्ध तृतियें पासून सहा दिवस हा उत्सव वैभवाने साजरा होत असतो.

ही सारी मालमत्ता समाजाची आहे आणि वहिवाट चालँविणारे आपण केवळ विश्वस्त आहोंत ही भावना सेनापुर आचार्य घराण्यात दृढ होऊन बसली होती. दरम्यानच्या काळांत या मंदिराची कीर्ती सर्व भागात पसरली. श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ परंपरेंतील १६ वे स्वामी श्रीलक्ष्मीनाथतीर्थ रामेश्वर यात्रेहून परतताना सेनापुर कृष्ण आचार्य यांनी श्रीव्यंकटरमण देवस्थानात त्यांनी चार दिवस वास्तव्य करावे अशी इच्छा व्यक्त केली व स्वामीजीनीहि ती तत्काळ स्वीकारली. तेव्हांपासून गोकर्ण मठाकडील या घराण्याचे आध्यात्मिक नातें कांहीसें भावनिक बनलें.

श्रीपद्मनाभतीर्थ (१९ वे गुरूस्वामी) यानीही गंगोळी देवस्थानात पांच दिवस वास्तव्य करून सेनापुर आचार्य घराण्याचे आतिथ्य स्वीकारून संतोष व्यक्त केला होता. बसरूर येथील शाखा-मठाच्या दर्शनी भागांत दुसरा मजला उभारून घेण्यास श्री. कृष्ण आचार्य यांचे सुपुत्र श्री. बाबण आचार्य यांची देखरेख ठेवण्यासाठीं नियुक्ति करण्यात आली. श्रीइंदिराकांत तीर्थ यांनी तर सेनापुर आचार्य घराण्याकडील

श्री गोकर्ण मठाचे संबंध अधिकच जिव्हाळ्याचे व्हावे अशी इच्छा मनात बाळगून पर्तगाळी संस्कृत पाठशाळेत शिक्षण घेण्याऱ्या श्री. गोविंद आचार्य या मुलाची मनातल्या मनात आपले प्रशिष्य म्हणून निवड करून ठेवली आणि योग्य वेळी आपले पट्टशिष्य कमलनाथ तीर्थ स्वामीकडे व्यक्त केली.

श्रीइंदिराकांततीर्थांच्या महानिर्वाणानंतर एका महिन्याने वैशाख वद्य सप्तमी शके १८६४ ( ७ मे १९४२) या दिवशीं पूर्वाश्रमीच्या गोविंद आचार्य याना आश्रमदीक्षा देण्यात आली आणि त्यांचे श्रीद्वारकानाथतीर्थ असे नामाभिधान करण्यात आलें. ते चैत्र कृष्ण अष्टमी, मंगळवार दि. २७ मे १९४३ रोजीं श्रीगुरुपीठावर आरूढ झाले. तब्बल तीस वर्षांची दैदीप्यमान कारकीर्द यशस्वीपणे चालविल्यानंतर फाल्गुन कृष्ण षष्ठी शके १८९४, रविवार दि. २५ मार्च १९७३ रोजीं ते देहमुक्त झाले. तत्पूर्वी माघ कृष्ण द्वितिया शके १८८८, दि. २६ फेब्रुवारी १९६७ रोजीं त्यानी आपल्या पूर्वाश्रमीच्या सेनापुर आचार्य घराण्यातील बटू, राघवेंद्र आचार्य याना दीक्षा देऊन त्यांचें श्रीविद्याधिराजतीर्थ असें नामकरण केलें होते.

श्रीद्वारकानाथतीर्थ पीठावर असताना मे १९४५ सालीं प्रथमच गंगोळी येथे श्री व्यंकटरमण देवस्थानात वास्तव्यासाठीं गेले असतां सेनापुर आचार्य घराण्यांतील कुटुंबजनानी देवस्थानचा ताबा श्रीस्वामीजींकडे सुपूर्द केला. स्वामीजींनी स्थानिक समाजाची बैठक घेऊन देवस्थानचा कारभार चालविण्यासाठीं एक स्थानिक समिती नियुक्त केली. आजही अशा समितीमार्फत सदर देवस्थानचा कारभार चालविला जातो.

आज गंगोळीचें श्री व्यंकटरमण देवस्थान कर्नाटकांतील गौड सारस्वत समाजासाठीं एक श्रद्धास्थान बनून राहिलेलें असून त्यामुळें गंगोळी गांवाची कीर्ति चौफेर पसरली आहे. पंचगंगावळींत असलेल्या या देवस्थानाबद्दल सारस्वत समाजामध्ये जो आदराचा व कृतज्ञतेचा भाव वसत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे या घराण्याने त्याच दैवतांची पूजाअर्चा करून संस्कारीत झालेले दोन सुपुत्र श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाला अर्पण केले आणि उभय गुरूच्या कारकिर्दींत मठाचा लौकिक अगणित प्रमाणात वाढून समाजांत अभूतपूर्व अशी जागृतीची लाट येऊं शकली.

४ फेब्रुवारी १९९६ रोजीं श्री विद्याधिराजतीर्थांनी देवालयाचे गर्भमंदिर, सभामंडप व तीर्थमंडप यांचा जीर्णोद्धार करून देवता प्रतिष्ठा व सुवर्णमंडित कलश स्थापन केला. याच वास्तूमध्ये श्रीद्वारकानाथ तीर्थ यांनी एकदां (१९६३) व श्रीविद्याधिराजतीर्थ यांनी दोनदां (१९८४, १९९१) चातुर्मास व्रताचरण केलें.

# ३. एक प्याला वात्सल्याचा

मावळतीला झुकलेल्या सूर्याचे लालभडक बिंब संगम क्षितिजावर सागरात अस्तंगत होण्याची तयारी करत होतें. गांवच्या वेशीच्या पल्याड माडांच्या रांगा नेहमीसारख्याच वाऱ्याच्या झोताबरोबर डोलत होत्या. परंतु पूर्व क्षितिजाकडे काळोख दाटूं लागला होता. माडाच्या झावळ्यांच्या फटींतून चमकदार सूर्यकिरण अजूनही आपली प्रभा विस्तारीत होते. पण संध्याछाया दाटू लागल्याने ते किरणही शीतल झाले होते.

कधीं मावळत्या सूर्य बिंबाचा तर कधीं पूर्वेकडील विस्तारत राहिलेल्या अंधःकाराचा वेध घेत एक माऊली, गंगोळीच्या व्यंकटरमण मंदिराच्या लगत असलेल्या अर्चकाच्या घराच्या एका कोपऱ्यात कधीपासून उभी आहे. तिच्या हृदयांत प्रचंड ज्वालामुखी धगधगत आहे. संस्कारितेचा संयम मुखकमलावर विलसित असला तरी चुकल्या चुकल्यासारखें वाटतें. मधूनच पूर्वेकडील कृष्णछाया आपले हृदय व्यापून टाकत आहे असा तिला भास व्हायचा. हरवलेल्या पाडसाची वाट पाहणाऱ्या धेनूच्या कळवळ्याने ती कितीतरी वेळ त्या ठिकाणी निश्चल उभी आहे.

तेवढ्यात बंदराकडून येणाऱ्या मार्गाने एक आकृती झपाझप पावलें उचलीत मंदिराच्या दिशेन येत असलेली दिसली. तसे पाहूं जाता, रस्त्यावरील गर्दी आतां वाढली होती. बाजारपेठेत जाणाऱ्या येणाऱ्या माणसांची वर्दळ आणि शाळा सुटल्यानंतर पक्षांच्या थव्याप्रमाणे चिंवचिंवत घरी परतणाऱ्या बालकांची रस्त्यावर गर्दी होती. पण या गर्दीमधून देखील झपाझप पावलें टाकीत येणारी ती आकृती बाईने पाहिली आणि एकदम तिचे काळीज धडधडूं लागलें. आकृतीवरूनच माऊलीला आपल्या पुत्राची ओळख पटली होती.

नदीच्या पल्याड कुंदापूर शहरांत कॉलेजचे वर्ग संपताच मान खाली घालून थेट घरी येणे हा राघवेंद्राचा शिरस्ता होता. एखादे वेळीं आकाशस्थ ग्रह-तारकांचें वेळपत्रक चुकूं शकेल, पण राघवेंद्राचा वक्तशीरपणा बदलणार नाही याची तिला पुरेपूर खात्री होती. आपण प्रतीक्षा करत राहिलो म्हणून तो लवकर येणार नाही आणि प्रतीक्षा नाही केली तरी तो वेळेवर आल्याशिवाय राहणार नाहीं हें ती जाणून होती. पण आज तिचे मन सैरभैर झाले आहे. नित्याचीं कामें घरांत पडून राहिली आहेत. दुपारच्या भोजनानंतरची घरांतली आवराआवर अजून व्हायची आहे. असे यापूर्वी कधीच झाले नव्हते. हातापायातील शक्ती गळून पडल्याचा भास तिला झाला होता आणि तिची मती देखील बधीर झाली होती.

आकृती जवळ आली आणि आता त्या धूसर सांजप्रकाशात तिने राघवेंद्राचा चेहराही न्याहाळून घेतला. आईचा कळवळा आवरेना. उभी होती तिथूनच दोन्ही हातांचीं बोटें उलटीं करून दुतर्फा कानशिलावर ठेवलीं आणि तीं कडाकड मोडून मनातल्या मनात उद्‌गारली, "व्यंकटरमणा, मला शक्ति दे. आईच्या वात्सल्या पोटी माझा विवेक ढिला पडूं नये. आणि माझ्या राघवेंद्राला तूं राख. कुणाला त्याची दृष्ट लागूं नये." इतका वेळ आवरून धरलेले अश्रू आता डोळ्यांतून भळाभळा ओघळू लागले. लुगड्याच्या पदराने पुसण्याचा प्रयत्न केला. पण आषाढांतील पागोळ्यांसारख्या अश्रु-धारा अखंड वाहत राहिल्या.

राघवेंद्र मंदिराजवळ पोहचला, तशी ती माऊली धावत न्हाणीघरांत गेली. दोन तांबे गार पाण्याने तिने आपल्या तोंडावर शिडकावे केले. विचारांची दग्धता इतकी तप्त असूं शकते याचा अनुभव ती प्रथमच घेत होती. शीतल पाण्याचे शिडकावे देखील ती दग्धता कमी करूं शकत नव्हते. पण अश्रू लपविण्याचे काम मात्र त्या पाण्याने बेमालून केले. राघवेंद्र घरीं परतला. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे मागील दारी जाऊन हातपाय धुवून घेतले. कॉलेजचे कपडे काढून ठेवले आणि घरांत वापरायचे कपडे चढवून तो व्यंकटरमणाच्या मूर्तीसमोर येऊन उभा राहिला. हात जोडून क्षणभर ध्यानस्त झाला आणि मग आपले अभ्यासाचे पुस्तक उचलून नेहमीच्या दिशेने वळणार तोंच कांपऱ्या आवाजातील हांक त्याच्या कानात पडली.

"बाळ, एक मिनिट... हे घे."

कांपरा आवाज कानावर पडतांच राघवेंद्र चमकला. भावनाप्रधान असलेल्या आपल्या आईचा कंठ बोलतां बोलतां रुद्ध होतो हे त्याला माहीत होते. पण असे प्रसंग क्वचितच यायचे. आज यावेळी आईचा आवाज कांपरा कसा झाला? असा प्रश्न तारुण्याच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवलेल्या राघवेंद्रला पडला. त्याने चमकून मागे पाहिले. खांद्यावरील लुगड्याचा पदर एका हाताने तोंडावर ओढून धरून दुसऱ्या हातातील पेला पुढे करून आई उभी होती.

"हे काय?" राघवेंद्रने विचारले.

त्याला माहीत होते, पेल्यांत धारोष्ण दूध आहे. घरांत जेवणाखाण्याची ददात नसली तरी आपली आई काटकसरीने गाडा हाकते याची त्याला जाणीव होती. राघवेंद्राच्या रूपाने ती भविष्यकाळाचीं रम्य स्वप्ने पहात होती. अनेकदा बोलण्याच्या ओघात तिने आपल्या लाडक्या लेकराशीं आपलें हृद्‌गत व्यक्त केलें होतें. 'देवाने तुला मधुर स्वभाव दिला आहे. निर्मळ वाणी आणि उदात्त विचारसरणी ही देखील कुलदेव रामनाथाची देणगीच होय. शिस्त व चारित्र्य, शील व सदाचरण हे सद्‌गुण तुझ्या रक्तात आहेत हे मी ओळखून आहें. तुझी बुद्धिमत्ता विलक्षण असून स्मरणशक्ती

अचाट आहे. धर्मगुरुबद्दल तुझ्या मनात आकंठ आदर असून तुझी देवनिष्ठा अनन्यसाधारण आहे. देवाने तुला जन्माला घालतानाच तुझ्या हातून महत् कार्य करवून घेण्याचे निश्चित केलेले दिसते. तू फार मोठा होशील ... फार मोठा! सेनापुर आचार्य घराण्याचे नांवलौकिक दिगंताला पोहोचविशील आणि तुझी जननी या नात्याने मी कृतार्थ होईन...'

आपली आई इतर भावंडांपेक्षा आपणास वेगळी वागणूक देते याची जाणीव राघवेंद्राला अलिकडच्या दिवसांत अधिक प्रकर्षाने होऊ लागली होती. पानावर बसल्यावर पंक्तिभेद जाणवावा येथवर ती पक्षपात करते असा त्याला संशय येऊ लागला होता. आईबद्दल मनात भक्ती व आदराची भावना असली तरी त्याला हा पक्षपात रुचत नव्हता. त्यामुळे आता आपल्यासाठी दुधाचा पेला घेऊन ती आली याचे त्याला वैषम्यच वाटले होते. आई आपल्याला जेव्हा पेलाभर दूध जास्त देते तेव्हा ती तेवढ्या प्रमाणात भावंडांच्या तोंडचा वाटा काढून घेते अशी त्याची भावना होती. म्हणून तो म्हणाला, "दूध आहे ना? इतर भावंडांना पण दिले आहे काय?"

"नाही बाळा. तुझ्यासाठी मुद्दाम ठेवले..." आणि बोलतां बोलतां तिला हुंदका फुटला.

आज कांहीतरी विपरीत घडलेले आहे हे राघवेंद्राने ओळखले. तो म्हणाला, "तुझी माया मला समजते. पण हा पक्षपात नको आहे. मला दूध नको... दुधाचे राहू दे. आज तुला झाले आहे काय?"

"काही नाही बाळ." कशीबशी ती उत्तरली.

पुढील शब्द तोंडातून फुटेना. किती तरी वेळ हुंदके देणाऱ्या आईकडे पहात राहिल्यानंतर राघवेंद्रचे हृदय चरकले. तो म्हणाला, "तू असे मनाला लावून घेऊ नकोस. तुझ्या अपेक्षा मी ओळखून आहे. देवाची इच्छा असेल तर मी त्या साऱ्या पुऱ्या करीन. माझ्या परीने प्रयत्नांत कोणतीच कसूर ठेवणार नाही."

राघवेंद्र आपल्या अभ्यासाच्या कोपऱ्याकडे वळणार तोंच आईने पुन्हा हांक मारली. म्हटले, "स्वामीजींकडून आज्ञा रायस आला आहे."

६ मे १९६६ चा तो दिवस. कुंदापुर येथील कॉलेज विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त वेळेत खास वर्ग घेतले जात होते. राघवेंद्र या वर्गांना आवर्जून उपस्थित राहायचा. त्यामुळेंच घरीं परतायला त्याला किंचित् उशीर झाला होता. पर्तगाळ येथून परमपूज्य श्रीमद् द्वारकानाथतीर्थांची चि. राघवेंद्र याचा शिष्य म्हणून स्वीकार करण्याची इच्छा समजल्यापासून मातोश्री चिंतीत झाल्या होत्या. चि. राघवेंद्रची प्रतिक्रिया जाणून घेण्यास, किंबहुना हें वर्तमान त्याच्या कानावर घालण्यास त्या उतावळ्या झाल्या होत्या. नाहींतरी दररोज राघवेंद्र कॉलेजमधून परतण्याच्या वेळीं दुधाचा प्याला

घेऊन आई त्याची प्रतिक्षा करायची. पण आजचा प्रसंग निराळा होता हें राघवेंद्राने हेरलें. त्याने अधिक वाद न घालतां आईच्या हातचा दुधाचा प्याला घटाघटा पिऊन टाकला आणि अभ्यासासाठीं तो वळणार इतक्यांत आई म्हणाली, "जरा थांब, मला कांही बोलायचें आहे."

"का? कांही विशेष?" राघवेंद्रने पृच्छा केली.

"तुला शिष्य करूं पाहतात ... " एका दमांत ती बोलून गेली.

पू. स्वामीजीची इच्छा आईने राघवेंद्राच्या कानावर घातली व सद्‌गदीत स्वरांत म्हटलें, 'परवां ८ तारखेला स्वामीजीकडून मंडळी यायची आहे, तूं त्यांना काय सांगणार?"

स्वामीजींचे शिष्य होणे म्हणजे नेमके काय करावें लागेल याची केवळ ओझरती कल्पना असलेल्या राघवेंद्राच्या मनात जन्मदात्या माता-पित्या इतकीच किंबहुना कंकणभर अधिकच देवगुरूवर श्रद्धा होती. आपल्याच घराण्यातील एक तेजस्वी पुरुष श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या गुरुपीठावर अधिष्ठीत आहेत याचा त्याला अभिमान वाटत होता. गुरूचें दर्शन अनेकदां घडले होते. त्यांच्या त्या सुहास्य वदनाचें, प्रसन्न मुखकमलाचें राघवेंद्रला स्मरण झालें व तो उत्तरला, "स्वामीजींची इच्छा असेल, आणि देवाला तें मान्य असेल, तर मी विरोध कां करूं?"

मुलाच्या उत्तराने आई चमकली. उरलें सुरलें अवसान गळून पडलें. आईच्या दृष्टिने ही इतिहासाची पुनरावृत्ती होती. "आमच्यावर हा प्रसंग यायला नको होता. संन्यास धर्म पाळणे फार कठीण असतें."

राघवेंद्र म्हणाला, "निर्णय स्वामीजीनी घेतलेला आहे. त्या उपर मी काय बोलणार? गुरुवर्यांच्या इच्छेला मी नकार देणार नाही."

आतां आपला लाडका पुत्र घराण्यासाठीं कायमचा दुरावणार या विचाराने ती गद्‌गद् झाली. अश्रू आवरत नव्हते. पण हुंदके आवरले. म्हणाली, "स्वामी होऊन तुला काय करायचें आहे? ... काटेरी मुकूट असतो तो. सर्व सुखांना तिलांजली देऊन अत्यंत खडतर असे संन्यस्त जीवन जगावे लागेल..."

राघवेंद्र कांही बोलला नाही. त्याची अभ्यासाची वेळ चुकत होती. तो पाठ वळविणार तेवढ्यात आई म्हणाली, "स्वामी झाल्यावंर मठमंदिरांची देखभाल व तीर्थाटन करावें लागेल. कुटुंबाचे मायपाश तोडून घ्यावे लागतील. आहार-विहार, आचार-विचार ... साऱ्या व्यवहारांवर निर्बंध येतील. पण तू माझं कुठं ऐकणार?"

"मठाची अभिवृद्धी व समाजांत धार्मिकतेचा विस्तार करणे, श्री संस्थानच्या आराध्य दैवतांची पूजा करणे व पुण्यक्षेत्रांची यात्रा यांसारखीं महद्‌भाग्याचीं कार्यें, माझ्या हातून घडणार आहेत." राघवेंद्राने कांहीशा अभिमानाने आईला समजावलें.

आज मागे वळून पहाताना परमपूज्य विद्याधिराजतीर्थांना, मातेला दिलेल्या वचनाची पूर्ति केल्याचें समाधान मिळूं शकेल.

त्या दिवशीं राघवेंद्रचे चित्त अभ्यासावरून उडालें. एक प्रकारची अस्वस्थता मनात दाटून आली. आईच्या भावना तो ओळखत होता. पण आपला एक पुत्र गुरुपीठाला अर्पण केल्याची धन्यता काय थोडकी असणार!

गंगोळीच्या त्या लहानशा गांवांत हां हां म्हणतां वार्ता सर्वत्र पसरली. सेनापुर आचार्य घराण्यातील असाच एक तेजस्वी तरुण गोविंद, स्वामी होऊन श्रीद्वारकानाथतीर्थ या नावाने समाजाच्या भक्ती व आदरास पात्र ठरले होते. आजही ते गांवांत आले तरी अगदीं तटस्थ मनाने येत. ज्या मातीत ते खेळले, ज्या संवगड्यांच्या समवेत लहानाचे मोठे झाले, गांवातील ज्या प्रकारच्या वातावरणात त्यांनी संस्कार घेतले, त्यात काही एक बदल झाला नव्हता. पण जेव्हा जेव्हा गांवात प्रवेश करीत, तेव्हा जयजयकाराच्या घोषणांनी आसमंत दुमदुमे आणि सामान्यातून असामान्यत्व प्राप्त केलेल्या या गुरुचरणाशी सारा गांव नतमस्तक होई. या इतिहासाची पुनरावृत्ती व्हायची आहे. गंगोळी गांवची परंपरा यापुढेही चालणार आहे. गोकर्ण मठाच्या इतिहासात आणखी एक सुवर्ण पर्व नोंदविण्याचे भाग्य गंगोळीला मिळणार आहे.

स्वामीजीनी पाठविलेली गृहस्थ मंडळी आली. त्यांच्या समवेत आले होते वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध आचार्य. घरची मंडळी देवमंदिरासमोर गोळा झाली. दहा प्रतिष्ठीत ग्रामस्थांनाही बोलावून घेण्यात आलें. आचार्यांनी पाट मागवून घेतला आणि राघवेंद्राला त्या पाटावर बसण्यास सांगितले.

मग आपल्या धीरगंभीर आवाजात त्यांनी श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश श्रीमद् द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजींनी स्वतःच्या स्वाक्षरीने पाठविलेला आज्ञारायस वाचून दाखविला. चोख नाणे फरशीवर पडतांच यावा तशा खणखणीत आवाजांत एकेक शब्द आचार्य उच्चारीत होते. प्रत्येक शब्दाचा अर्थ मनांत स्थिर होत असतानाच मनःचक्षूसमोर इतिहासातील कसोटीचे क्षण तरंगत होते.

रायस वाचून पूर्ण झाला. व्यंकटरमणासमोर प्रज्वलित असलेल्या स्निग्ध ज्योतीचा प्रकाश श्रीमुखाला उजाळा देत होता. सगळ्यांच्या नजरा श्री मूर्तीवर स्थिरावल्या. त्या मूर्तीच्या मुखावर मधुर स्मित विलसत होते. गुरूंच्या इच्छेला देवाचा आशीर्वाद असल्याचा तो संकेत मानण्यात आला आहे. मग आचार्यांनी राघवेंद्राला लहानसे, पण उद्‌बोधक असे बौद्धिक दिले. मोजक्या शब्दांत संन्यास धर्माच्या कठोर कर्तव्यांची जाणीव देऊन श्रीमठाच्या गुरुपदाची जबाबदारी समजावून सांगितली. राघवेंद्राने स्थिर चित्ताने आचार्यांचे म्हणणें ऐकून घेतलें. गुरूंचा रायसही त्यांनी ऐकला होता. नजर वर करून कुटुंबजनाकडे पाहिलें. सर्वांचे डोळे अश्रूंनी डबडबलेले

दिसले. क्षणभर डोळे मिटून ध्यान केलें. निमिषभर देवमूर्तीचें दर्शन घडलें. मनात आकंठ केलेली श्रद्धा व भक्ती उफाळून आली. अनायासें हात जुळले व तोंडातून शब्द उमटलेः "श्री गुरुंची इच्छा मला शिरोधार्ह राहील."

पूर्वतयारी इथेच संपली. एका डोळ्यात आसूं आणि दुसऱ्या डोळ्यांत हांसू अशा अवस्थेत उपस्थित मंडळी उठली.

हा आनंदोत्सव होता की वियोगाची वेदना?

## एक जुनी आठवण

बटु राघवेंद्र याचा गुरु आज्ञा शिरोधार्य मानण्याचा निर्धार इतका पक्का होता कीं घरांतील कांहींशा खिन्न, कांहींशा साशंक वातावरणांत देखील त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारची तेजस्वी तटस्थता विलसत होती. संन्यास धर्माच्या यमनियमांची संपूर्ण नसली तरी बऱ्याच अंशीं कल्पना त्याला होती आणि घरांतील वातावरण गंभीर कां बनलें, हें ओळखण्याची बुद्धि होती. जीवनांतील उत्सर्गावस्थेचा तो निर्णायक क्षण होता. पण राघवेंद्रचा चेहरा निर्विकार राहिला. मनहि तसेच शांत होतें. श्रीमद् भगवद्गीतेंत स्थितप्रज्ञाचीं जीं लक्षणें सांगण्यांत आलेलीं आहेत, त्यांचें स्मरण कुणालाहि व्हावें इतका तो निश्चल होता.

कुटुंबजनांचा व खुद्द बटूचा हार्दिक होकार घेऊन श्रीस्वामीजींनी पाठवलेलें शिष्टमंडळ परतलें आणि गंगोळीच्या वेंकटरमण मंदिरांतील वातावरण एकदम पालटलें.

रात्र होईपर्यंत वातावरण बरेच हलके झालें. आतां संन्यासदीक्षा घ्यावी कीं घेऊं नये हा प्रश्नच राहिला नव्हता. पुढचे निर्णय मठाधिपति स्वतः घेणार होते. पण कुटुंबजन त्या दिवसापासूनच पूर्वतयारीला लागले.

मातोश्रीनें डोळे कोरडे केले आणि कसे देव जाणे, मनही प्रसन्न करून ती आपल्या पुत्राला लहान सहान गोष्टीं द्वारें बोध देऊं लागली. संन्याशाने कसे वागावें, एकदां कुटुंबांतून बहिर्गमन केल्यावर मायापाश कसे तोडावे, घागरींतून बिंदू सिंधूला मिळतांच घागरीकडील त्याचे नातें संपतें... तो सागरमय कसा होत असतो ... अनेक दृष्टांत-दाखले, मुखोद्गत केलेलीं वचनें अध्यापिकेच्या अभिनिवेशानें आई राघवेंद्रा समोर रुजू करूं लागली. हा एक नवा अनुभव होता. मातेच्या बुद्धिमत्तेचें, विवेकशक्तीचें, व्यक्तिगत विचारां पल्याड जाऊन समष्टीचा विचार करण्याच्या दृष्टीचें राघवेंद्राला प्रथमच दर्शन घडत होतें.

पिताश्रींची वृत्ति जरा गंभीर. बोधाच्या चार गोष्टी तेही सांगत. पण त्यांच्या तोंडून निघणाऱ्या शब्दांमध्यें शालीनता होती आणि पुत्राकडील वात्सल्याची जवळीक

ओलांडून श्रीमठाच्या शिष्यस्वामीकडे बोलण्याची अदब त्यांच्या शंब्दांतून व्यक्त व्हायची. तरी तळमळ ही होतीच. श्रीमठाची परंपरा अधिक उज्वल बनविणारे स्वामी म्हणून आपल्या पुत्राने नांवलौकिक मिळवावा असे प्रकर्षाने वाटत होतें. त्या मानाने ज्येष्ठ बंधु उपेंद्र किंचित सडेतोड. एखादी गोष्ट सांगून विचारायचे, 'आलं लक्षांत? नपेक्षां उद्या तुझे हंसे व्हायचें. कुटुंबावर ठपका यायचा आणि मठाधीशांचा पाणउतारा व्हायचा...'

सर्वांचे ऐकावे, नीरक्षीर बुद्धीने इष्ट तें स्वीकारावें असें ठरवून राघवेंद्र ऐकत होता. प्रत्युत्तर देत नव्हता. परंतु त्या तरुण हृदयांत प्रचंड वादळ आलें होतें. ज्या निकटवर्तियांच्या सहवासांत, श्रीव्यंकटरमण देवता सान्निध्यांत जीवनवास्तूची जडणघडण केली, भविष्य काळाबद्दल जीं सुरम्य स्वप्ने पाहिलीं, स्वावलंबना द्वारे उच्च शिक्षण घेतले व आपल्या कुटुंबियांच्या जीवनाला नवा आकार देण्याची जी महत्त्वाकांक्षा उराशीं बाळगली, त्या सान्या आठवणी सागराच्या लाटांप्रमाणे एका मागून एक हृदय व्यापून टाकीत होत्या आणि मनोमनीं संन्यस्त व्रताचा स्वीकार करून बसलेल्या दृढ संकल्पाच्या चरणाशीं फुटून माघारीं वळत होत्या. एका नव्या विश्वांत प्रवेश करायचा होता. एक दुर्लभ व तसेंच अज्ञात असें तें विश्व! जीवनाच्या चाकोरींतील पायवाटेला फुटलेला हा एक फांटा होता. पुढचे-मागचे चाकोरीच्या वाटेने पुढे जाणार आणि आपणास एकाकीपणें, प्रमाणांत निर्जन व अनोळखी अशा मार्गाने पुढे जावे लागणार. पण संकोच इतका पक्का होता कीं मनांत प्रसन्नता पसरली होती. हाहि एखादा ऋणानुबंध असलाच पाहिजे अशी ग्वाही मिळत होती.

लहानपणांतील एक आठवण आईने एकदां सांगितली होती. राघवेंद्राच्या जीवनांतील ती घटना असल्याने त्यालाहि तिचें थोडेंबहुत स्मरण होतें. आतां ती पुरती आठवली. इ. स. १९५२ सालची ती गोष्ट. कुलदेव रामनाथ पोर्तुगीज अधिसत्ते खालील गोव्यांत आहे. वैशाख महिन्यांत अक्षय तृतियेच्या मंगल दिनीं कुलदेवाच्या सन्निधींत महासुदर्शन अनुष्ठानाचें आयोजन करण्यांत आलें होतें. अशा पर्वणीच्या प्रसंगीं कुलदेवाचें दर्शन घेण्याच्या संकल्पाने गंगोळी येथील लक्ष्मीनारायण आचार्य कुटुंबियांसह गोव्याच्या यात्रेला निघाले. सोबत पत्नी, एक कन्या व पुत्र राघवेंद्र अशीं चार माणसें. प्रवासाचीं साधने आजच्या सारखीं सुलभ नव्हतीं. एक रात्र पर्तगाळी मठांत वास्तव्य करायचें आणि दुसऱ्या दिवशीं रामनाथीकडे प्रयाण करायचे असें त्यांनी ठरविलें होतें. मंडळी कारवारहून बोरुसपर्यंत पोहोचली. तोवर सूर्य अस्तंगत होऊन आसमंतांत अंधार पसरू लागला होता. अंदाजाने एक वाट धरली व कसेंबसें पर्तगाळी मठांत पोचावें असा विचार केला. काळोख दाटला होता आणि वाट संपून संपत नाहीं. मंडळी अर्दफोंडपर्यंत पोंचली. वाट विचारायची

म्हटल्यास जवळपास कोणी दिसेना. अचानक समोरून एक बैलगाडी आली. बैलांच्या गळ्यांतील घंटांचा निनाद धीर देऊन गेला. आचार्य महाशयांनी गाडीवानाकडे पर्तगाळीला जाण्याच्या वाटेची चौकशी केली.

"मग तुम्ही इथं कुठं चाललां? ही वाट रानांत जाते. चला, मी तुम्हाला वाट दाखवतों."

मंडळी बैलगाडीच्या बाजूने चालूं लागली. आफ्रामेंतजवळ पोंचतांच गाडीवान म्हणाला, "तुम्ही इथेंच थांबा, मी कुणाला तरी बोलावून घेतों. तो तुम्हाला मठापर्यंत पोचवील."

गाडीवानाने हांक मारली आणि अंधारांतून हातांत मशाल घेऊन एक माणूस अवतरला.

"यांना मठाजवळ पोचव." गाडीवानाने बजावलें.

त्या वाटाड्याने नुसता हुंकार भरला. मशालीच्या उजेडांत पावलें उचलताना राघवेंद्र अडखळत होता. त्याचीं पावलें ठेंचाळत होतीं. राघवेंद्रला खांद्यावर घेण्यास त्या वाटाड्याने हात पुढें केला. पण दुसरे लोक चालत जातांना आपण कुणाच्या तरी खांद्यावर बसून जावें यांत पुरुषार्थ कसला, या विचाराने राघवेंद्राने स्पष्ट नकार दिला, पण वाटाड्याने धरलेला हात सोडवून घेतला नाहीं.

मंडळी मठाच्या प्रांगणांत मुख्यप्राणाच्या घुडाजवळ पोंचली. वाटाड्याने राघवेंद्रचा हात सोडला आणि मठाकडे अंगुलिनिर्देश करून म्हटलें,

"हा तुझा मठ बरं का!"

वाटाड्याचे आभार मानायला हवे. त्याला थोडी बिदागी द्यायला हवी या विचाराने कोटाच्या खिशांतून नाणीं हातांत घेऊन लक्ष्मीनारायण आचार्य पाहतात तों वाटाड्या अदृष्य झालेला. मशाल देखील विझलेली. हा काय प्रकार आहे हें कुणालाच कळेना. तो चमत्कार होता, दृष्टांत होता कीं सहज स्वाभाविक अशी घटना होती?

अशा लहान मोठ्या गोष्टी त्यानंतरहि अनेक घडलेल्या आहेत. परंतु अशा घटना चमत्कार मानण्यास श्रीविद्याधिराजतीर्थ कबूल नाहींत. जाणकारांनी तो नारायणभूताचा प्रताप असल्याचा तर्क केला. तसे नसावे असे राघवेंद्रला वाटत होतें. आतां संन्यास दीक्षेसाठीं मनाची तयारी करतां करतां वाटाड्याच्या तोंडचें वाक्य कानांत घुमूं लागलें,

"हा तुझा मठ बरं का!..."

## संन्यास दीक्षा सोहळा

श्रीमठाचे बाविसावे स्वामी श्रीद्वारकानाथतीर्थ हेहि सेनापुर आचार्य घराण्यांतील होत. त्यांचे पूर्वाश्रमीचे नांव गोविंद असे होते. गंगोळी येथें कन्नड व इंग्रजी शिक्षण घेतल्यानंतर अर्चक घराण्याची परंपरा चालू ठेवण्याच्या विचाराने वडील रामनाथ यांनी गोविंदाला कारकळ येथील श्रीभुवनेंद्र संस्कृत महाविद्यालयांत पाठविले. त्या काळीं श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या गादीवर दैदीप्यमान व्यक्तिमत्वाचे महर्षि श्रीमद् इंदिराकांततीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी विराजमान होते. पर्तगाळी मठांत संस्कृत पाठशाळा होती व श्रीइंदिराकांततीर्थ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे जातीने लक्ष देतात ही गोष्ट सर्वश्रुत झाली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखालीं आपल्या पुत्राला संस्कृत भाषेचे शिक्षण मिळावे या इच्छेने श्री. रामनाथ आचार्य यांनी गोविंदाला कारकळहून पर्तगाळीला पाठवले.

गोविंद आचार्य पर्तगाळीच्या पाठशाळेंत आले आणि तत्काळ श्रीइंदिराकांतांच्या नजरेंत भरले. या विद्यार्थ्याचें ते बारकाईने निरीक्षण करूं लागले. गौरवर्णी, सुस्मित वदनी, अखंड प्रवृत्ति करणाऱ्या या विद्यार्थ्याची नम्रता व बुध्दिमत्ता स्वामीजींच्या चाणाक्ष नजरेंतून सुटली नाहीं. हा मुलगा मठाधिपती होण्यास सर्वतोपरि लायक आहे हा आपल्या मनांतील अभिप्राय गुरुस्वामीजींनी शिष्य श्रीकमलानाथतीर्थांच्या कानी घालून ठेवला.

इतर विद्यार्थ्यांपेक्षा तल्लख बुद्धीच्या गोविंद आचार्यांनी वेद, वेदांगे, न्याय, मीमांसा शास्त्रांचें व विविध दर्शनांचें शिक्षण घेऊन आपले नैपुण्य तर दाखवून दिलेच; पण आपल्या मधुर मीलनसार स्वभावाने सहपाठींची व गुरुवर्यांची हृदयेंहि जिंकलीं.

श्रीइंदिराकांतीर्थांचे महानिर्वाण (शके १८६४) झाल्यानंतर महिन्याभरांतच श्रीकमलानाथतीर्थांनी सारे सोपस्कार पूर्ण करून श्री. गोविंद आचार्य यांना आश्रमदीक्षा दिली (शके १८६४) व श्रीद्वारकानाथतीर्थ असे नामकरण केले. अकरा महिन्यांनंतर श्रीकलानाथतीर्थांनी देहमुक्ति प्राप्त केली व श्रीद्वारकानाथतीर्थ वयाच्या तेविसाव्या वर्षी श्रीगुरुपीठावर अधिष्ठित झाले. (शके १८६५)

श्रीद्वारकानाथतीर्थ यांची वैभवशाली कारकीर्द श्रीमठाची प्रतिष्ठा अधिक उन्नत करणारी ठरली. श्रीस्वामीजींना अनारोग्याने ग्रासले होते; पण साऱ्या वेदना निग्रहाने सहन करून त्यांनी आपली दिनचर्या उत्तम रीतीने चालविली. नित्य नैमित्तिक पूजा, अर्चा करताना, सण उत्सव साजरे करताना, यज्ञ याग व मूर्ती प्रतिष्ठा, शिखर

कलश प्रतिष्ठा आदि श्रमाचे विधि पार पाडताना किंवा विद्वानांच्या सभेंत संवाद करताना ते इतके तन्मय होऊन जात कीं, श्रीस्वामीजींच्या पाठकण्याला दुखापत झाली आहे या गोष्टीवर कुणाचा विश्वास बसत नव्हता.

शके १८८८ च्या सुमारास श्रीद्वारकानाथतीर्थांनी आपण शिष्याची निवड मनांतल्या मनांत करून ठेवल्याचे निकटवर्तीयांना सांगितले व त्या दृष्टीने पूर्वतयारी सुरू केली. श्रीस्वामीजींनी गंगोळी मठांतील अर्चक सेनापुर श्री.लक्ष्मीनारायण आचार्य यांचे द्वितीय पुत्र राघवेंद्र यांची शिष्य म्हणून मनांतल्या मनांत निवड करून ठेवली होती. ते त्यांचे पूर्वाश्रमीचे पुतणे होते. परंतु शिष्याची निवड करताना ती भावना मनांत नव्हती. श्रीगोकर्ण पर्तगाळ मठाला अनुरूप उत्तराधिकारी मिळावा हाच ध्यास प्रामुख्याने होता. त्या दृष्टीने आचार्यांनी तटस्थपणे विचार करावा असा आदेशहि श्रीस्वामीजींनी दिला.

पूर्वापार चालत आलेली जी पद्धत आहे, त्या पद्धतीनुसार ही निवड करण्यांत आली. प्रथम गुरुस्वामींनी सात संभाव्य बटूंची शिष्यस्वामीसाठीं निवड केली व त्यांच्या पत्रिका गोळा करून त्या ज्योतिर्विदांच्या स्वाधीन केल्या. या ज्योतिषपंडितांना स्वामीजींनी मुद्दाम मठांत पाचारण करून आणले होते. त्यांच्या स्वाधीन फक्त पत्रिकाच केल्या होत्या; त्या पत्रिका कोणाच्या आहेत हें सांगितलें नव्हतें.

ज्योतिषशास्त्रज्ञांनी सातही कुंडल्यांचा अभ्यास करून संन्यासाश्रमासाठीं सर्वांत योग्य अशा एका पत्रिकेची निवड करून ती श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामींच्या स्वाधीन केली व मग श्री स्वामीजींनी ती राघवेंद्र आचार्य या बटूची असल्याचें सांगितलें. (कुंडली : परिशिष्ट २) या प्रसंगीं स्ववर्गीय अनेक शिष्यमंडळी उपस्थित होती. त्यांनी या घटनेचें स्वागत केलें. मागाहून बटूच्या मातापित्याकडे कांही सद्‌गृहस्थांचें एक शिष्टमंडळ पाठविण्यांत आलें व घडलेली हकीकत या मंडळीनें आचार्यांस निवेदन केली. त्यांनी व त्यांच्या पत्नीने नियम-कर्तव्यावर लक्ष देऊन बटूला शिष्याश्रम स्वीकारण्यास मान्यता दिली. ही वार्ता सर्वत्र पसरली तेव्हा बटूच्या निवडीबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त केलें. यथाकाळीं वडाळा मठांत त्यांस आश्रम देण्यांत येऊन त्यांचें नूतन-आश्रमांतील नांव श्रीविद्याधिराजतीर्थ असें ठेवण्यांत आलें. शिष्य स्वीकाराचा हा सोहळा मुंबईत श्रीद्वारकानाथ भवनांत पार पडला. (माघ वद्य २, शके १८८८).

गुरुस्वामींचा सहवास शिष्यस्वामींना पूर्ण सहा वर्षांहून अधिक काळ लाभला. या काळांत गुरुस्वामींनी आपल्या शिष्याच्या अध्ययनाकडे संपूर्ण लक्ष तर दिलेंच, शिवाय त्यांची दृष्टि अधिक विशाल व्हावी, ती समाजाभिमुख व्हावी, आधुनिक विद्या व शास्त्रांचे त्यांस ज्ञान व्हावें, तसेच अध्यात्म, तत्त्वज्ञान, वेदवेदान्त वगैरे शास्त्रांतही ते पारंगत व्हावे या दृष्टीने आवश्यक तरतूद केली. स्वतःबरोबर त्यांनी

त्यांस सर्वत्र हिंडविले. मुळांतच श्रीविद्याधिराजतीर्थ यांस कन्नड, संस्कृत व इंग्रजी शिक्षणाचा लाभ झाला होताच. कोंकणी ही मातृभाषा. मराठी व हिंदी भाषांचें ज्ञानही त्यांनी संपादन केलें. या सर्व भाषांवर प्रभुत्व संपादन केलेले श्रीविद्याधिराजतीर्थ हे बहुभाषा कोविद आहेत.

## पट्टाभिषेक समारंभ

श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामींचे २५ मार्च १९७३ रोजी अंकोला येथें आकस्मिक निर्वाण झाल्यानंतर दहा दिवसांनी, शके १८९५ चैत्र शुद्ध २या, दि. ५ एप्रिल १९७३ रोजीं शिष्यस्वामींस पट्टाभिषेक करण्यांत आला. गोव्यांतून, मुंबईहून आणि कर्नाटकांतून असंख्य शिष्यवर्ग त्या दिवशीं पर्तगाळी मठांत गोळा झाला होता. या समारंभाला गोव्याचे पहिले वहिले मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकर सपत्नीक उपस्थित होते. त्यांनी गोमंतकीय जनतेतर्फे श्रीस्वामीजींना अभिवादन केलें.

शिष्यस्वामीचा स्वीकार केल्यावरही श्रीद्वारकानाथतीर्थांच्या संचार कार्यक्रमांत खंड पडला नव्हता. गोमंतक मुक्तिनंतर तर ते अधिकच उत्साहाने काम करूं लागले. पण शरीर साथ देईनासें झालें.

श्रीविद्याधिराजतीर्थ ज्या दिवशीं श्रीगुरुपीठावर विराजमान झाले तो दिवस योगायोगाने श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठाच्या संस्थापनेचा वर्धापन दिवस होता. आपल्या पहिल्याच प्रकट प्रवचनांतून ते शिष्य परिवाराची हृदयवीणा झंकृत करून गेले. आधुनिक जगाशीं सुंसवाद राखून समाजाला ऐहिक अभ्युदयाचा व पारमार्थिक सुखाचा मार्ग दाखविण्याचें पांच शतकांचें अखंड कार्य श्रीमठाकडून यापुढेंहि चालू राहील असा विश्वास मठानुयायी वर्गाच्या मनांत दृढ झाला. गेल्या पांच शतकांच्या परंपरेचा आढावा घेतल्यानंतर श्रीविद्याधिराजतीर्थांच्या नेतृत्वाखालीं श्रीमठाला अधिक स्थैर्य मिळून त्याची कीर्ति अधिक उत्तुंग होईल याबद्दल संदेह राहिला नाहीं.

श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजी चैत्र शु. २ या शके १८९५, दि. ५ एप्रिल १९७३ रोजीं श्रीगुरुपीठावर आले आणि तेव्हांपासून मठाचें कार्य अधिकाधिक गतिमान झालें. जीवनमूल्यांना पोषक बनविण्यासाठीं त्यानी असंख्य योजनाबद्ध उपक्रम हातीं घेतले. समाजधारणोन्मुख संन्यस्त वृत्तीची परंपरा चालू ठेवण्याचें व्रत घेऊन व पीठस्थ झाल्या पासून श्रीविद्याधिराजतीर्थांनी शिष्यपरिवाराला संघटित करून राष्ट्र व समाज कार्यासाठीं अधिक प्रवण करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्या प्रयत्नांमुळेंच मठानुयायांमध्ये एक प्रकारची नवजागृति, नवचैतन्य येऊन विघटित सारस्वत समाजाच्या संघटनेच्या प्रक्रियेस विलक्षण गति आली.

# ४. एक निग्रही तरुण तपस्वी

*[श्री विद्याधिराजतीर्थ यांचे श्रीगुरुपीठारोहण होऊन मठाचे सर्व व्यवहार त्यांनी आपल्या हातीं घेतल्यानंतर श्रीमठ संस्थापनेच्या पंचशताब्दि महोत्सवाची योजना आंखली. त्यावेळीं पत्रकाराच्या तटस्थ दृष्टिकोनांतून श्रीस्वामीजींची एक मुलाखत घेतली होती (इसवी सन १९७७). त्या मुलाखतीचें इतिवृत्त येथें देत आहोंत]*

करमल घाटांतील प्रवास हाच मुळीं एका अननुभूत अशा आनंदाचा साक्षात्कार घडविणारा! सागर आणि डोंगर यांचें एवढें निकट सान्निध्य क्वचितच आढळतें. दुतर्फा उंच वृक्षराजी, एका अंगाला उंच डोंगर व दुसऱ्या अंगाला खोल दरी. उताराला लागतांच दिसणारा, दूरवर धरणीमातेचे चरणकमल धुणारा सागर, हें दृश्यच मुळीं भान हरपून टाकणारें! अतिपरिचयानें देखील त्या सौंदर्यात उणेपणा येऊं शकलेला नाहीं. अलीकडेच वनखात्याने नव्या लागवडीच्या प्रयोगासाठीं वृक्षसंहार कार्य शास्त्रशुद्ध पद्धतीनें उरकले असूनहि या मार्गांतील प्रवासांत मिळणारा आनंद कमी झालेला नाहीं. मोटार काणकोण पार करून सदाशिवगडच्या दिशेने पुढें निघाली नि श्रीसंस्थान पर्तगाळी असा फलक दिसतांच डावीकडील आडमार्गाकडे वळून उतरणीला लागली आणि आमच्या मनावरील दडपण अधिकच वाढलें. क्षणांत पांढरा शुभ्र उंच मनोरा आणि समोर एका पुण्यपुरातन वास्तूच्या अग्रभागीं चमकणारा कळस दिसला. उंच वृक्षांनीं आसमंत हिरवागार व सुखशीतल बनलेल्या प्रशांत ठिकाणीं वसलेल्या या वास्तूवर एखाद्या ऋषीच्या आश्रमाची छटा पसरली होती. अर्थात ही वास्तू आधुनिक जगाशीं सुसंवाद राखूनहि, गजबजापासून दूर राहून समाजाला ऐहिक अभ्युदयाचा व पारमार्थिक सुखाचा मार्ग दाखविणाऱ्या एका पीठाची वास्तू आहे. गेलीं पांच शतकें मठाने हें कार्य प्रभावीपणें चालविले आणि त्यामुळेंच अनुयायांची मठावरील व पीठस्थ स्वामीजींवरील श्रद्धा व निष्ठा आजच्या विज्ञाननिष्ठ युगांतहि कायम राहिली आहे.

मठाच्या मध्यभागीं श्रीरामदेवाचें मंदिर. श्रीराम-दर्शन करून श्रीस्वामीजींचे आराध्य दैवत श्रीवीरविठ्ठलाचें दर्शन घेतलें. वृन्दावनाचें दर्शन घेतलें. मठाचे यापूर्वी बावीस स्वामी होऊन गेलेले असून, त्यांपैकीं कांहीं स्वामींचीं वृन्दावनें येथें आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने वृन्दावनें हें या मठाचें खास वैशिष्ट्य असून ते मठाच्या अनुयायांचें व भाविकांचें एक प्रमुख दर्शनस्थान ठरलें आहे.

मठाचे विद्यमान गुरुस्वामीजी श्रीमद् विद्याधिराजतीर्थ हे या परंपरेंतील तेविसावे

स्वामी होत. आंग्ल विद्याविभूषित असूनहि भारताची समाजधारणोन्मुख संन्यस्त वृत्तीची परंपरा चालू ठेवण्याचें व्रत घेऊन पीठस्थ झाल्यापासून स्वामीजींनी मठाचें कार्य अधिकाधिक गतिमान व जीवनाच्या बदलत्या मूल्यांना पोषक बनविण्यासाठीं योजनाबद्ध प्रयत्न चालविले आहेत.

एका अनौपचारिक मनमोकळ्या वातावरणांत आमची मुलाखत सुरू झाली. मठाचे, स्वामीजींच्या समोर वागण्याचे रीतिरिवाज आम्हांला माहित नसल्यामुळें बोलण्याच्या ओघांत एखादा वेडावांकडा प्रश्न निघाल्यास स्वामीजींनी गैरसमज करून घेऊं नये अशी आम्हीं विनंती केली. विशाल भाल, सरळ नासिका, पाणीदार नेत्र आणि याच्या जोडीला विरक्तिदर्शक भगवीं वस्त्रें, असें प्रसन्न व्यक्तिमत्त्व आमच्यासमोर, आमच्या अन्तःकरणाचा ठाव घेत मंचकावर पहुडले होते. आमच्या अंतःकरणावरील दडपण पार गेलें आणि एका मुक्त वातावरणांत झालेल्या चर्चेत तास-दीड तास कसा गेला तें आम्हांस कळलें देखील नाहीं.

चर्चेला गति देण्यासाठीं सूत्र सांपडावें म्हणून आम्ही सर्वप्रथम स्वामीजींना त्यांच्या पूर्वाश्रमाविषयीं, संन्यासाश्रमांत प्रवेशाच्या वेळीं होणाऱ्या मानसिक स्थित्यंतराविषयीं, मठाचीं सूत्रें हातीं घेतल्यानंतरच्या मनःस्थितिविषयीं, मठांतील दैनंदिनीविषयीं प्रश्न विचारले आणि स्वामीजींनी मनांत कांहींहि न ठेवतां, अगदीं तटस्थ वृत्तीनें आमच्या प्रश्नांना उत्तरें दिलीं. स्वामीजींनी दिलेल्या माहितीप्रमाणें बालपणांत व विद्यार्थीदशेंत मठाशीं स्वामीजींचा तसा विशेष संबंध आला नव्हता. श्रीमद्द्वारकानाथतीर्थ स्वामीजींना एक-दोन वेळां पाहिलें असेल व त्यांची थोडीफार सेवा केली असेल तेवढेंच! मठाचा व आपला वेगळ्या पद्धतीने म्हणजे स्वामी म्हणून संबंध कधींकाळीं येईल याची त्यावेळीं मुळींच कल्पना नव्हती. जीवनाची दिशाच वेगळी होती. धर्मनिष्ठ व ईश्वरोपासक आचार्य कुटुंबांत जन्मलेले श्रीमद् विद्याधिराजतीर्थ मातापित्यांचे द्वितीय पुत्र. श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामीजींनी आपले उत्तराधिकारी म्हणून निवड केली त्यावेळीं श्रीमद् विद्याधिराजतीर्थ स्वामीजी कॉमर्स कॉलेजमध्यें शिकत होते. मातापित्यानी आपला भविष्यांतील आधार म्हणून पुत्राला उच्च शिक्षणार्थ महाविद्यालयांत पाठविलें होतें. परंतु अचानक शिष्य म्हणून आपली निवड केल्याचा आज्ञारायस श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामीजींनी काढला. या अनपेक्षित प्रकारामुळें कुटुंबांत आनंद व अपेक्षाभंग यांनी वातावरण विचित्र बनलें. आपला पुत्र उच्च विद्याविभूषित होऊन आपल्या कुलाचें नांव उज्वल करण्याबरोबरच घरसंसारांत सुखसमृद्धि आणील ही मातापित्यांची अपेक्षा भुईसपाट झाली होती. ज्याच्यावर आपण सगळी भिस्त ठेवली तो आपला पुत्र कायमचा अंतरणार ही व्यथा त्यामागें होती. त्याचबरोबर स्वामीजींविषयींची भक्ति व मठाविषयींचा आदर यामुळें घरच्या

लोकांची मनःस्थिति द्विधा होत होती. गांवच्या प्रतिष्ठित लोकांचें, स्वामीजींचा आज्ञारायस पाळावा म्हणून दडपण येत होतें. यामुळें या तरुण विद्यार्थ्याचा आयुष्यक्रम एका रात्रींत बदलला. (संन्यासाश्रम दिन : २६-२-१९६७).

या प्रसंगीं खुद्द स्वामीजींच्या मनाची कोणती अवस्था झाली? अशी पृच्छा केली असतां स्वामीजी म्हणाले, वयाचीं वीस वर्षें कौटुंबिक वातावरणांत व आधुनिक शिक्षण देणाऱ्या विद्यालय-महाविद्यालयांत गेल्यामुळें संन्यासी जीवनाची निश्चित अशी कल्पना नव्हती. अर्थात तशी सुजाणता होती. पण प्रत्यक्ष तसें जीवन आमच्या वाट्याला येईल हें माहित नव्हतें. तथापि स्वामीजींच्या आज्ञारायसाची वार्ता ऐकून आम्ही अस्वस्थ झालों नाहीं वा त्याबद्दल वाईटही वाटलें नाहीं. समाजाची वेगळ्या प्रकारें सेवा घडावी अशीं स्वामीजींची इच्छा व ईश्वरी संकेत असेल तर आपणही त्याला अनुकूल बनलें पाहिजे एवढाच विचार त्यावेळीं मनांत आला. आणि दहा वर्षांपूर्वीं विशींत पदार्पण करतानाच स्वामीजी नव्या जीवनाला सामोरे जाण्यास सिद्ध झाले.

शिष्य म्हणून दीक्षा घेतल्यानंतरचा गेल्या दहा वर्षांचा काळ, त्यामध्यें केलेली साधना, अध्ययन, नित्यकर्मे, यांविषयीं स्वामीजींनी तपशीलवार माहिती दिली. या काळांत स्वामीजींनी खूप अध्ययन, मनन व चिंतन केलें. पीठाधीशपदाची धुरा सांभाळण्यासाठीं आवश्यक शिक्षण घेतलें. ही साधना आजतागायत अविरत चालू आहे. संन्यास घेतल्यानंतरहि प्रत्यक्ष पीठाचीं सूत्रें हातीं घेण्यापूर्वीचा काल व नंतरचा काल यांमध्यें खूपच भिन्नता असल्याचें स्वामीजींनीं सांगितलें. जोंपर्यंत गुरू श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामी होते तोंवर काम करूनहि प्रत्यक्ष भार नव्हता. ताण नव्हता. पण श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामीजी वृन्दावनस्थ झाल्यानंतर(२५-३-१९७३) श्रीमद् विद्याधिराजतीर्थ स्वामीजींवर सबंध मठाचा भार येऊन पडला (पीठारोहणः ५-४-१९७३). केवळ मठच नव्हे, तर मठाचे भारतभर विखुरलेले अनुयायी व एकंदर समाज यांना मार्गदर्शन करण्याची मोठी जबाबदारी स्वामीजींच्या शिरावर आली. स्वामीजींनी ती किती समर्थपणें उचलली व मठाला कशी विज्ञानोन्मुख दिशा दिली, अनुयायांचे मठाकडील संबंध कसे दृढ केले ही गोष्ट सर्वपरिचित आहे. पंचशताब्दि महोत्सव सोहळ्यांत त्याचा खराखुरा साक्षात्कार घडूं शकेल. सुसूत्र दिनचर्या व कामाचा उरक यामुळें स्वामीजींना अल्पवयांत ही शिरावर पडलेली मठाची जबाबदारी येतांच ताण जरूर जाणवला. पण शिष्यवर्गातील जाणते लोक व अन्य मठाभिमानी यांचें सक्रिय सहकार्य लाभल्यानें तो भार सुसह्य झाला, अशी मनमोकळी कबुली स्वामीजींनीं दिली.

मठाचें मुख्य कार्य कोणतें, अशी पृच्छा केली असतां स्वामीजींची मुद्रा किंचित

धीरगंभीर बनली. आमच्या मनांतील विकल्प दूर कसा करावा याचाच विचार स्वामीजी करीत असावेत असें दिसलें. स्वामीजी म्हणाले, “हा मठ प्रामुख्यानें एका संप्रदायाचा आहे. त्या दृष्टीनें त्या समाजाची आध्यात्मिक व धार्मिक जागृति करून त्यामध्यें मंगल व उदात्त तत्त्वांचा विकास घडवून, त्या समाजाला ऐहिक व पारमार्थिक सुखाचा मार्ग दाखविणें हें मठाचें मुख्य कार्य होय. परंतु आजच्या परिस्थितींत कोणत्याहि संप्रदायाची सुखसमृद्धि समाजाच्या अन्य घटकांपासून अलग राहून साधतां येत नाहीं; म्हणूनच आजूबाजूचा समाजहि सुखी असेल याची दखल मठाच्या अनुयायांनी घेतली पाहिजे.”

याशिवाय समाजाला वेळोवेळीं मार्गदर्शन करणें, तंटे, संघर्ष यांचें वातावरण उद्‌भवल्यास त्यांचें निवारण करणें आणि हें सर्व अधिक प्रभावीपणें पार पाडतां यावें यासाठीं आध्यात्मिक साधना अखंड चालू ठेवणें हें या पीठावर बसणाऱ्यांचें जीवनकार्य आहे. स्वामीजींचें जीवन हें कांहीं एका जागीं बसण्याचें नाहीं. आरामाचें नाहीं. खुद्द स्वामीजींची घाईगर्दीची दैनंदिनी पाहिली तरी यांची कल्पना येऊं शकते. रोज पांच-सहा तास धार्मिक विधींत खर्च होतात. मठांतील पाठशाळेवर ते जातीनें देखरेख ठेवतात. श्रीक्षेत्र काशी, गोकर्ण वगैरे अनेक ठिकाणीं असलेल्या या मठांच्या कक्षेंतील एकावन्नवर मठांचा कारभार सुव्यवस्थित चालावा म्हणून काळजी घ्यावी लागते. जेथें जेथें मठाचे अनुयायी आहेत, तेथें तेथें वेळोवेळीं संचार करून, त्यांच्यांतील आत्मविश्वास बळकट करावा लागतो.

या संदर्भांत अलीकडेच घडलेली घटना स्वामीजींच्या दूरदृष्टीची कल्पना येण्यास पुरेशी आहे. केरळ राज्यांत कायंगोळ येथे मठाचे अभिमानी वास्तव्य करून आहेत. तेथें त्यांनी श्री विठोबाचें एक देवस्थान उभारलें आहे. यासंबंधाची खबर अशी कीं श्रीमद् इंदिराकान्ततीर्थ स्वामीजी एकदां दक्षिण संचारावर असताना कायंगोळ येथें गेले. तेथील कांही लोकांकडून स्वामीजींचा अनादर झाला असें सांगतात. याचा परिणाम असा झाला कीं त्या कुटुंबांना उपसर्ग होऊं लागला. तेथील लोकांनी श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामीजींना कांयगोळ मुक्कामी येऊन जुन्या प्रमादाबद्दल क्षमा करून पापमुक्त करण्याची प्रार्थना केली. श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामीजींनी निमंत्रण स्वीकारून कांयगोळला जाण्याचा निर्णय घेतला होता. पण विधिसंकेत वेगळा असल्यानें तें घडून येऊं शकलें नाहीं. तथापि गतवर्षी श्रीमद् विद्याधिराजतीर्थ स्वामीजींनीं आपल्या गुरूचा संकल्प पूर्ण केला. गतवर्षी कांयगोळ येथें चातुर्मास व्रतासह सव्वाचार महिने वास्तव्य करून स्वामीजींनी तेथील शिष्यवर्गाला आनंदित केलें. त्यांच्या मनांत घर करून बसलेल्या पापकल्पनेचें निरसन झालें आणि तेथील समाजाचें मठाशीं नातें दृढ झालें. अर्थात वरील हकीकत कोणीतरी सांगितलेली! खुद्द श्रीमद् विद्याधिराजतीर्थ

आहे असें त्यांना वाटतें. ईश्वरभक्तीपासून मिळणाऱ्या पुण्याचा संचय केल्याने, बँकेंत केलेली बचत अडचणीच्या वेळीं जशी सव्याज मिळते तद्वतच हें संचित पुण्य प्रत्येक मानवाला प्रापंचिक कटकटीच्या वेळीं तोल ढळूं न देण्यासाठीं उपयोगी पडतें. स्वामीजींचा ह्या विचार सयुक्तिक आहे हें कोणीहि मान्य करील. मठासंबंधी ऐकिवांत असलेल्या कांही गोष्टींचा आम्हीं उल्लेख केला असतां स्वामीजींनी त्यांच्यासबंधीं कसलेंहि भाष्य करण्यास नकार दिला. त्या खऱ्या आहेत असें ध्वनित करण्याचें देखील त्यांनीं टाळलें.

मठाच्या प्रदीर्घ परंपरेविषयीं बोलताना स्वामीजी म्हणाले, मठाची परंपरा पांचशें वर्षांची असली तरी प्रत्यक्षांत मठाकडे साडेतीनशें वर्षापासूनचे कागदपत्र आहेत. पूर्वीं घोड्यावरून वा मेण्यांतून संचार करावा लागे. त्यामुळें वाटेंत कागद गहाळ झाले असण्याची किंवा अन्य मठांत ठेवले असण्याची शक्यता आहे. पोर्तुगीजांच्या स्वारीच्या वेळीं यांपैकीं कांही उध्वस्त झाले असावेत. अनेक इतिहास संशोधकांनी विविध लिपींतील व भाषांतील कागदपत्रांचा अभ्यास करून मठाच्या व मठानुयायांच्या इतिहासावर प्रकाश टाकलेला आहे. तथापि या सर्व कागदपत्रांचा सुसंगत, तपशीलवार व तटस्थ अभ्यास अद्याप होऊं शकलेला नाहीं. तसा तो झाल्यास केवळ या समाजाचाच नव्हे तर एकंदर इतिहासावर फार मोठा प्रकाश पडूं शकेल. पंचशताब्दि महोत्सवाच्या निमित्ताने हें कार्य हातीं घेतलें गेलें पाहिजे.

पोर्तुगीजांच्या आक्रमणामुळें गोव्यांतील मंदिरें उध्वस्त झालीं. अशा वेळीं डळमळीत झालेली समाजांतील धर्मश्रद्धा पुन्हा बळकट करून, लोकांच्या मनांत ईश्वरभक्ती जागविण्याचें व त्याद्वारें नवीं मंदिरें उभारण्यास त्यांना प्रवृत्त करण्याचें कार्य मठाने केलें आणि त्याबद्दल अखि ल गोमंतकाने मठाचे ऋणि राहिलें पाहिजे. ज्यांचीं कुलदैवतें आज गोव्यांत आहेत अशीं अनेक कुटुंबें त्याकरतां देशोधडीला लागून जीं केरळपर्यंत पसरलीं, त्या लोकांना त्यांच्या धर्मभूमीकडे संपर्क ठेवण्याचें कार्य मठानें केले, असें स्वामीजींनी अभिमानपूर्वक सांगितलें. हें सांगताना स्वामीजींचे नेत्र एका विशिष्ट तेजानें प्रकाशमान झाल्याचें जाणवलें.

पंचशताब्दी साजरा करणाऱ्या या मठापेक्षां किंवा सारखेच प्राचीन असे अनेक मठ आहेत ही गोष्ट स्वामीजींनी मनमोकळेपणे मान्य केली आणि उदाहरणादाखल शृंगेरीच्या श्रीशारदापीठाचा निर्देश केला. आपलाच मठ श्रेष्ठ, प्राचीन अशा अहंभावाचा लवलेशदेखील स्वामीजींच्या बोलण्यांत जाणवला नाहीं. इतरांचा मोठेपणा कबूल करताना ते गांगरले नाहींत कीं स्वतःचा मोठेपणा सांगताना ते फुलले नाहींत. फक्त कांही विशिष्ट मर्यादेंत व क्षेत्रांत मठाने बजावलेल्या कार्याची स्वामीजींनी माहिती

दिली. एके काळीं समाज समुद्रगमन हें पाप मानून, अशांना वाळींत टाकीत असे. असे प्रश्न समाजासमोर उपस्थित राहिले त्यावेळीं मठाने पुढाकार घेऊन ते प्रश्न सोडविले. या प्रश्नांचा विचार करण्यासाठीं श्रीमदिंदिराकांत स्वामीजींनी वेलिंग मुक्कामीं सर्व गौड सारस्वत ब्राह्मणांची एक महासभा बोलावली व याच सभेंत असें ठरलें कीं समुद्रगमन केलेल्यांनी अल्प प्रायश्चित घेतल्यावर त्यांचा स्वीकार व्हावा. हा ठराव संप्रदायाच्या तिन्ही पीठांकडे प्रेषित करण्याचेंहि ठरविण्यांत आले. सर्वप्रथम श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधिशांनी ठराव स्वीकारून अशा वोकांस पुनित करण्यास मान्यता दिली. आजच्या काळांत आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह होतात, असे प्रश्न निर्णयार्थ आल्यास मठाची कोणती भूमिका राहील हें जाणून घेण्याची इच्छा आम्ही व्यक्त केली तेव्हां 'मठाचें सामर्थ्य हें अनुयायांच्या त्यावरील श्रद्धेवर आहे. असे प्रश्न प्रामुख्याने समाजाचे आहेत. समाजानेच त्यांचा विचार करायचा आहे. तथापि असे प्रश्न अद्याप मठासमोर आलेले नाहींत' असें स्वामीजींनी सांगितले.

सारस्वत समाजाला आपला संदेश कोणता? असें विचारतां स्वामीजी म्हणाले, सारस्वत समाज हा अतीव पुढारलेला, विचाराने प्रगल्भ व भौतिक दृष्ट्याहि प्रगत असा आहे. हा समाज कर्तृत्वशाली व स्वाभिमानी आहे. यापुढें या समाजाने आपल्या शक्ति, बुद्धि, कर्तृत्वाचा उपयोग एकंदर समाजाच्या विकासासाठीं केला पाहिजे. शेष समाजापासून तो अलग राहूं शकणार नाहीं व तसें करून चालणारही नाहीं. समाजाच्या अन्य घटकांना विश्वासांत घेऊन त्याने त्यांच्याशीं सलोखा निर्माण केला पाहिजे. यामुळे सारस्वत समाज तर विकासित होईलच, शिवाय एकंदर समाजाचें धुरीणत्व त्यांच्याकडे आपोआप चालत येईल. कर्तृत्ववान, समर्थ, बुद्धिमान वर्गाकडे समाजाचें नेतृत्व असणें हें एकंदर समाजाच्या हिताचें असतें.

मठाने एकंदर समाजाच्या कल्याणासाठीं अनेकविध सेवा सुरू केल्या आहेत. हुबळी, मुंबई येथें वैद्यकीय सेवा सोय उपलब्ध करून देण्यांत आलेली असून तिचा लाभ सर्व जाती-धर्म-पंथाच्या लोकांना मुक्तपणे घेतां येतो. याशिवाय मठाच्या जनकल्याणकारी अशा अनेक योजना आहेत व या पंचशताब्दि महोत्सवाच्या निमित्ताने साकारतील असा विश्वास स्वामीजींनी व्यक्त केला.

स्वामीजींच्या खाजगी जीवनांत, अंतर्मनांत डोकावून पाहतां आल्यास पहावें या हेतूनें मातापित्यांविषयीं आज स्वामीजींच्या मनांत कोणती भावना आहे, त्यांच्या दर्शनाने आज स्वामीजींना काय वाटतें, तें जाणून घेण्याची आम्ही इच्छा व्यक्त केली.

स्वामीजींनी सांगितलें कीं आपल्या मनांत त्यांच्याविषयीं आतां शिष्यपरिवारापैकीं एक या परती खास अशी कोणतीहि भावना नाहीं. माता स्वामीजींना नमस्कार करीत नाहींत व वडील समोर श्रीमद् भागवत ग्रंथ ठेवून नमस्कार करतात, एवढाच काय तो फरक! आपले पूर्वाश्रमींचे मातापिता म्हणून त्यांना संस्थानांतून कांहीं द्यावें, त्यांचा संसारभार हलका करावा असें मनांत देखील येत नसल्याचें बोलून दाखविलें. मातोश्रींचा 'श्रीधराली आवय' असा निर्देश करून तर स्वामीजींनी आम्हाला धक्काच दिला. मात्र यावेळीं स्वामीजींचा स्वर कांहींसा कातर झाल्याचा आम्हाला संशय आला. अर्थात स्वामीजींच्या निग्रहाची हीच कसोटी आहे यांत संशय नाहीं.

मुलाखत संपवून आम्ही उठलों त्यावेळीं अकरा वाजून गेले होते. आमच्या मुलाखतीमुळें स्वामीजींचें दैनिक कार्यक्रमाचें वेळापत्रक चुकलें होतें. सकाळचे साडेदहा ही स्वामीजींची स्नानाची वेळ आहे. त्यानंतर पूजा आदि विधीसाठीं दोन तासांपेक्षा अधिक काळ जातो. त्यामुळे स्नानास विलंब झाल्यास संपूर्ण वेळा-पत्रकच चुकतें. स्वामीजींनी हंसत हंसत आम्हाला त्याची कल्पना दिली. एक निग्रही तरुण तपस्वी आपल्या दैनंदिन स्नानासाठीं निघाले आणि आम्ही भारावल्या अंतःकरणानें मडगांवच्या परतीच्या प्रवासाला लागलों.

## ५. ऐतिहासिक पंचशताब्दि महोत्सव

गोव्यांत आणि देशांत सर्वत्र इतिहासवशात् विखुरल्या गेलेल्या सारस्वत समाजाच्या अस्मितेचा व एकतेचा प्राणरक्षक मानदंड असें ज्याला सार्थपणे संबोधतां येईल त्या श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठाचा पंचशताब्दि महोत्सव १९७७ मध्ये साजरा झाला, ही अतीव आनंदाची व समाधानाची बाब म्हणतां येईल. समाधान अशासाठीं कीं, एका समाजाच्या संधारणाचे व संघटनाचें कार्य सतत पांच शतकें यशस्वीपणें पार पाडून तो समाज अधिकाधिक ऊर्जस्वल बनविणाऱ्या मठाच्या यशोगाथेचें हें संकीर्तन होते. आाणि आनंद अशासाठीं कीं, असा हा अपूर्व सोहळा घडवून आणण्याचें व त्यांत सहभागी होण्याचें भाग्य मठानुयायांना लाभलें. हा सोहळा स्वतंत्र गोव्यांत साजरा झाला, हाहि एक विशेष होय. श्रीमठाच्या इतिहासांत यापूर्वी महत्त्वाचे टप्पे आले नाहींत असें नव्हे. पण त्या टप्प्याचें कायम स्मरण राहावें, इतिहासांत त्यांची कायमची नोंद राहावी अशा दृष्टीनें त्यांना सोहळ्याचें रूप देणें पारतंत्र्यामुळें शक्य झालें नव्हतें. पांच शतकांची गौरवशाली परंपरा असलेला असा हा मठ आहे. मठाची पंचशताब्दि साजरी करण्यामागील हेतु आत्मप्रौढीचा

नव्हता. मठाला तशा गोष्टींची गरजहि नाहीं. कारण कसल्याहि प्रकारची जाहिरातबाजी वा प्रचार न करतां गेलीं पांच शतकें मठानें आपलें अंगिकृत कार्य अखंडितपणें चालविलें आहे. हें कार्य केवळ शिष्यपरिवारालाच नव्हे, तर इतरांनाही ज्ञात आहे. आणि सर्वांनाच ह्या कार्याची कृतज्ञतापूर्वक नोंद घेणें भाग पडलेलें आहे.

श्रीमठाला तेवीस स्वामींची अखंडित परंपरा लाभली आहे आणि या स्वामींनीं अक्षरशः आसेतु हिमाचल पुण्यसंचार करून धर्म व अध्यात्म यांचा प्रचार व प्रसार केला आहे. अनेक अस्वस्थ मनांना दिलासा दिला आहे.

पंचशताब्दि महोत्सवाचा एक भाग म्हणून पर्तगाळी विकास योजनेचा शुभारंभ करण्यासाठी चैत्र शुद्ध द्वितीया शके १८९९, दिनांक २१ मार्च १९७७ हा दिवस निश्चित करण्यांत आला. ह्या दिवसाचें माहात्म्य मठाच्या व मठानुयायांच्या दृष्टीनें आगळेच आहे. त्या दिवशीं श्रीसंस्थापनेस ठीक ५०२ वर्षें पूर्ण झालीं होतीं. त्या दिवशीं ५०२ वर्षांपूर्वी फलुमारु' मठाधीश (उडपी) श्रीरामचंद्रतीर्थ बदरिकाश्रमांत गेल्यावेळीं समवेत असलेल्या माधव नामक अत्यंत चाणाक्ष, हुशार व कुलशीलसंपन्न अशा ब्रम्हचाऱ्यास संन्यासाश्रम देऊन श्रीमन्नारायणतीर्थ नामाभिधान बहाल केलें आणि श्रीवीर रामचंद्राची मूर्ती त्यांच्या स्वाधीन करून पश्चिम भारतात सारस्वत समाजाला धर्मोपदेशासाठीं प्रेषित केलें. हेच श्रीनारायणतीर्थ स्वामी महाराज प्रस्तुत मठाचे संस्थापक होत. विशेष योगायोग हा कीं शालिवाहन शकाच्या तिथीनुसार मठाचे विद्यमान स्वामीजी श्रीमत् विद्याधिराजतीर्थ यांच्या गुरुपीठारोहणाची तिथीहि चैत्र शुध्द द्वितीया हीच आहे. त्यामुळें मठानुयायांच्या दृष्टीनें हा दिवस एक प्रकारें कपिलाषष्ठीचा योग ठरला.

मठाची स्थापना झाली त्या सुमारास भारताचा पश्चिम भाग इतिहासाच्या दुर्दैवी फेऱ्यांत सांपडला होता. खुद्द गोव्यांत पोर्तुगीज अधिसत्ता प्रस्थापित होऊन त्यांनीं ख्रिस्तीकरणाचें सत्र आरंभिलें आणि अनेक लोक धर्म व संस्कृतिरक्षणासाठीं आपापल्या कुलदेवांचे स्मारक घेऊन भटकळ, मंगळूर, कोचीन सारख्या सुदूरप्रदेशांत जाऊन राहिले. सामान्यपणें वेगळ्या वंशाच्या व भाषेच्या वातावरणांत नव्यानेंच स्थायिक होणारे लोक एक-दोन शतकें कशाला, एक-दोन पिढ्या उलटल्या कीं आपल्या मूळ व्यक्तिमत्वाचा विसर पडून तेथील समाजजीवनाच्या अंवतीभंवतीच्या परिसराचा भाग बनतात. पण सारस्वत समाजाच्या बाबतींत अशी गोष्ट घडली नाहीं. आपली मूळ भूमि सोडून अनेक शतकें उलटल्यानंतरहि त्यांनी आपलें स्वतंत्र व्यक्तिमत्व, स्वभाषा, स्वसंस्कृति व स्वपरंपरा अबाधित राखिली आहे, याचें श्रेय समाजाच्या अंगभूत प्रकृतिला जसें जातें तसेंच, किंबहुना त्याहून अधिक प्रमाणांत, स्वामींचा यासाठीं महत्त्वाचा हातभार लागला आहे.

गुरुपीठांच्या पर्तगाळी मठाच्या स्वामींनीं जेव्हां जेव्हां संधि मिळाली तेव्हां तेव्हां जेथें जेथें शिष्यपरिवार पोहोंचला आहे तेथें तेथें जाऊन धर्म व संस्कृतीचा प्रचार व प्रसार केला आणि मठानुयायांना एकत्र ठेवणारा निष्ठातंतु बळकट बनविण्याचें महाकार्य पार पाडलें. मठानुयायांचे वैयक्तिक व सामाजिक प्रश्न सोडविण्यास व त्यांना एकसंघ राखण्यास मदत केली. परंतु मठाधिपतींनी हें कार्य कितीहि निष्ठापूर्वक चालविलें तरी ऐतिहासिक कारणांसाठीं त्यावर मर्यादा पडत होती. कारण मुख्य मठ व बहुसंख्य शिष्यपरिवार जेथें होता तो गोवा पोर्तुगीजांच्या सत्तेखालीं पारतंत्र्यांत दिवस कंठीत होता. तर मठानुयायी गोव्याबाहेर जेथें वास्तव्य करून होते ते प्रदेश विभिन्न व्यवस्थेखालीं विभागले गेले आहेत. परिणामीं मठाच्या शिष्यपरिवारांमधील आपसांतील संपर्क खंडित झाला. समाजाचे एका अर्थाने परस्परांना एकत्र ठेवणारे धागेच तुटले व त्यांचा गुंता झाला. मात्र गुंत्यांत अडकलेल्या या धाग्यांचें एक टोंक दृढपणें मठाकडे जोडलेले राहिलें आणि म्हणूनच परस्परांशीं संपर्क तुटूनहि शिष्यपरिवाराची निष्ठा मठाशीं दृढपणें बद्ध राहिली.

भारत पूर्वीच स्वतंत्र झाला होता. गोवाहि मुक्त झाला, अशा वेळीं मठाकडे दृढपणें बद्ध असलेल्या निष्ठेच्या धाग्याचा मागोवा घेत, त्याचीं टोकें जमवून तीं नव्यानें एकत्र जोडून एक सलग धागा पुन्हां बनविण्याचा प्रयत्न म्हणून मठाचा पंचशताब्दि महोत्सव साजरा करण्याचें ठरलें. पोर्तुगीज राजवटींत गोव्यांत खूपच धार्मिक छळ झाला. देवालयें उद्ध्वस्त झालीं. समाज भंगला. पण पर्तगाळी मठाच्या शिष्य परिवारांत बसत असलेल्या सुप्त अंशाला फुंकर घालून मठानेच तो प्रज्वलित केला. सामाजिक व आर्थिक स्वरूपाचे अनेक प्रश्न निर्माण झाले. ते स्वामींच्या आज्ञेनें व हस्तेक्षेपानें सामोपचारानें मिटविले गेले. संस्कृतीची उभारणी मंदिरांभोवतीं झालेली असल्यानें मंदिरें भंगलीं तेव्हां संस्कृतीच नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला असतां मंदिरांची पुन्हा प्रस्थापना करवून नव्याने संस्कृति विकसित करण्याचें कार्य मठानें केलें. जें गोव्यांत घडलें तेंच इतर राज्यांतहि घडलें आणि म्हणूनच केरळसारख्या सुदूर प्रदेशांतहि सारस्वत समाज एक लहानसें मंदिर उभारून एकोप्यानें राहूं शकला व त्याचा गोव्याशीं भावनिक संबंध कायम राहिला.

मठाचे विद्यमान स्वामीजी श्रीमत् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनामुळेंच मठाची पंचशताब्दि साजरी करण्याचा योग निर्माण झाला. श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी यांची दिव्यदृष्टी शिष्यपरिवाराला संघटित करून राष्ट्र व समाज कार्यासाठी अधिक प्रवण करण्याची प्रामाणिक तळमळ आणि मठाचीं सूत्रें हातीं आल्यापासून त्यांनी त्या दिशेनें चालविलेले योजनाबद्ध प्रयत्न यांचाच परिणाम म्हणून हा पंचशताब्दि महोत्सव घडून आला. स्वामीजींचा धर्म,

तत्त्वज्ञान, अध्यात्म व वेदान्त यांचा अभ्यास तर सखोल आहेच पण त्याचबरोबर आधुनिक विज्ञान, समाजशास्त्र, इतिहास आदि विषयांच्या चिकित्सक परिशीलनाची जोड त्यांच्या उपजत अभिजात प्रज्ञेला लाभलेली असल्यामुळें, त्यांच्या कार्यकालांत अल्पावधीत मठाची प्रतिष्ठा व शिष्यपरिवाराचा माथा उन्नत बनला आहे आणि शिष्यवर्ग मठाकडे अधिक विश्वासानें व भविष्यविषयींच्या अतूट श्रध्देनें आकृष्ट झाला आहे.

मठाचा पंचशताब्दि महोत्सव, साजरा करतांना विशिष्ट उद्दिष्टें नजरेसमोर ठेवून तीं साध्य करण्याच्या दृष्टीनें एक महोत्सव समिती स्थापण्यात आली. शिष्यपरिवारामधील मध्यंतरींच्या काळांत तुटलेले धागे पुन्हा जोडून, एकसंघ समाज निर्माण करणें हें पंचशताब्दि महोत्सव समितीचें प्रमुख कार्य होतें. दिनांक ८, ९ व १० एप्रिल असे तीन दिवस पर्तगाळी येथें शिष्यपरिवाराचें एक स्नेहसंमेलन घडवून आणण्यांत आलें. स्नेहसंमेलनाच्या निमित्तानें देशांत सर्वत्र विखुरलेल्या शिष्यपरिवाराला परस्पर परिचय व कुलदेवतांचें दर्शन घडावें हा या नियोजित संमेलनाचा मुख्य उद्देश असला तरी तो एकमेव हेतु नव्हता. या स्नेहसंमेलना द्वारें समाजाचे प्रश्न समजून घेण्याचा समितीचा प्रयत्न राहिला. वास्तव्यप्रदेशाप्रमाणें शिष्यपरिवाराचे प्रश्न भिन्न आहेत. ते सोडविण्याची एखादी कायम व्यवस्था करण्याच्या दृष्टीने या स्नेहसंमेलनांत एक विचार विनिमय झाला. खुल्या अधिवेशनानें या स्नेहसंमेलनाची सांगता झाली. आणि यांत सहभागी होणारा प्रत्येक मठानुयायी नव्या प्रेरणा, शक्ति व उत्साह बरोबर घेऊन परतला.

पंचशताब्दि महोत्सवाचा भाग म्हणून अनेक योजना आंखण्यात आलेल्या असून त्यांत जीर्ण मठांच्या जीर्णोद्धाराचा समावेश आहे. या योजनेंत गंगातटाकीं असलेल्या आद्य मठाचा जीर्णोद्धार व देव प्रतिष्ठायासारखी कार्ये महोत्सव सोहळ्याआधीच पार पडलीं आहेत. त्याचप्रमाणें पर्तगाळी मठाच्या जीर्णोद्धाराची योजनाहि आंखण्यांत आली. पर्तगाळी मठ हें अध्यात्म व संस्कृतीचें केंद्र व्हावें या दृष्टीनें आंखलेली ही बृहद्योजना साकारल्यानंतर शिष्यपरिवाराला राहाण्यासाठीं सर्व सुखसोयींनी सुसज्ज निवास, सभासंमेलनादि कार्यक्रमासाठीं विशाल सभागार, धार्मिक विधिव्यवस्था आणि अन्य सुविधा उपलब्ध होतील. पर्तगाळी येथें एक संस्कृत विद्यापीठ स्थापण्याची योजना विचारांत असून हे सर्व कार्यक्रम व योजना टप्प्याटप्प्यानें हातीं घ्यावयाच्या आहेत. हीं सर्व कार्यें असलीं तरी मुख्य कार्य विखंड झालेल्या समाजाला अखंड बनविण्याचें आहे. समाज अखंड बनविण्याचा प्रयत्न खूप अंशीं भौतिक असला तरी सामाजिक व आर्थिक गरजेंतून तशी आवश्यकता निर्माण झाली आहे. समाजाचा एक वर्ग सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागास राहिला तर समाजाला स्वास्थ्य लाभत

नाहीं. तसेंच एका संप्रदायाचे लोक पुढारलेले व अन्य घटक मागासले राहिले तर समाजाचा निकोप विकास होत नाहीं. हा सर्व असमतोल दूर करणें हाही मठाचा प्रयत्न राहील. त्यासाठीं शिष्यपरिवार प्रथम संघटित करून त्यांचे प्रश्न सोडवितानाच सभोंवतालच्या अन्य समाजाला उद्धरणासाठीं मदतीचा हात देणें हा मठाचा यापुढील कार्याचा भाग राहील. कारण शिष्यपरिवाराबरोबरच अन्य समाजहि समस्यामुक्त झाला पाहिजे. त्यांतच शिष्यपरिवाराचें हित आहे अशी मठाची मनोमन धारणा आहे. पुंजक्या पुंजक्यानी विकास व समृद्धी येऊन सभोंवतालचा परिसर वैराण वाळवंटासम राहिला तर वाळवंट त्या समृद्धीच्या हिरवळीला ग्रासून टाकण्याचा धोका संभवतो. या मागें मठाचा अभिनिवेश वा वृथा अभिमान नाहीं. मठानुयायांची मनोमन धारणा आहे कीं राष्ट्रीय एकात्मतेचा आरंभ समाजांतील वेगवेगळ्या घटकांमध्ये एकात्मता विकसित करूनच होऊं शकतो. समाजाचा एक घटक स्वावलंबी व समर्थ बनला तर तो अन्य घटकांनाही मदत करू शकतो. मठाच्या यापुढील प्रत्येक योजना व कार्यक्रमामागील उद्देश व दिशा या राहातील. पंचशताब्दि महोत्सव समितीनें हातीं घेतलेल्या बहुतेक योजना आता साकार झाल्या आहेत. मठाच्या अनुयायांनीं हें नवें अंगिकृत कार्य पार पाडण्यासाठीं आणि स्वत:बरोबरच एकंदर समाज आर्थिकदृष्ट्या समृद्ध वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ, समाधानाच्या दृष्टीनें परिपूर्ण व सांस्कृतिकदृष्ट्या उन्नत बनविण्यासाठीं स्वयंसेवी वृत्तीने पुढें यावें आणि त्या दृष्टीनें संकल्पबद्ध होऊन नवीन प्रेरणा, चेतना व उज्ज्वल भविष्याची दृढ आशा यांची शिदोरी गांठीशी बांधून कार्यप्रवण होण्याचा संकल्प करून संमेलनाची यशस्वी सांगता झाली.

## विद्याधिराज पुरस्कार

पंचशताब्दि महोत्सव हा पांच शतकांपर्यंत चाललेल्या समाज विघटनेची प्रक्रिया बदलून समाज संघटनेच्या कार्याच्या प्रक्रियेचा शुभारंभ ठरला . पंचशताब्दि महोत्सव हा दुरावलेल्या बांधवांच्या स्नेहमीलनाचा सोहळा होता. अनेक हरवलेलीं नातीं पुन्हा गवसलीं आणि सारस्वत समाजाच्या एकात्मतेची आवश्यकता तीव्रतेने जाणवूं लागली. इतिहासाला कलाटणी देणारा हा क्षण परमपूज्य श्रीमद् विद्याधिराजतीर्थ ह्यांच्या प्रेरणादायी कृपाशिर्वादानेच अवतरला. त्या क्षणाची एक चिरस्मृति रहावी या दृष्टीने मठानुयायी वर्गाने एक पुरस्काराची योजना आंखली. कोणत्याहि क्षेत्रांत मानवतेची उत्तम सेवा केलेल्या व्यक्तीला चैत्र शुक्ल द्वितियेला, श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजींच्या गुरुपीठारोहणाच्या तिथीला पर्तगाळ मठांत हा पुरस्कार प्रदान करण्यांत येतो. रोख रुपये पांच हजार, पुरातन वटवृक्षाची प्रतिकृति आणि मानपत्र या स्वरूपांत हा पुरस्कार दिला जातो. ( मानकऱ्यांची यादी : परिशिष्ट - ३)

## पुरस्काराचें स्मृतिचिन्ह

ज्या ईशान्यप्लवा कुशावती नदीच्या किनाऱ्यावर श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाची प्राचीन वास्तू उभी आहे, तेथून सुमारे दोनशें मीटर उत्तरेकडे एक पुरातन वटवृक्ष आहे. त्या परिसराला 'ब्रह्मस्थान' असें संबोधतात. प्राचीन काळीं पैंगी ऋषीचें तें तपस्याक्षेत्र होतें असें मानलें जातें. या वटवृक्षाला सुमारे दोनशें वीस पारंब्या असून त्याचा पूर्व-पश्चिम विस्तार सुमारे २३५ फूट पसरलेला असून व उत्तरेकडून दक्षिणेकडे तो वटवृक्ष सुमारे २२५ फूट विस्तारला आहे. किमान एक हजार वर्षांपूर्वीचा हा वृक्ष असावा असा तज्ञांचा अभिप्राय आहे. या ठिकाणीं एक ईश्वरलिंग असून एकंदर परिसर घनदाट छायेमुळें, मुक्त खेळणाऱ्या हवेमुळें व पशु-पक्षांच्या सानिध्यामुळें अत्यंत प्रसन्न असा आहे. हजारों वर्षें या स्थानाचें पावित्र्य स्थानिक लोक अत्यंत दक्षतेने सांभाळीत आले आहेत.

या वटवृक्षाच्या सान्निध्यांत, किंबहुना वटवृक्षाप्रमाणेच श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचा गेलीं पांच शतकें विकास होत राहिला आणि त्याच्या शाखा आसेतुहिमाचल पसरलेल्या असून त्याचीं पाळेंमुळें असंख्य मठानुयायांच्या हृदयामध्यें खोलवर रुतलीं आहेत. दहा शतकांचा सामाजिक इतिहास या वटवृक्षानें पाहिला आणि त्याच्याच साक्षीने श्रीमठाचा पंचशताब्दि महोत्सव वैभवाने साजरा झाला. या महोत्सवाच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'विद्याधिराज पुरस्कारा'ची योजना साकारलेली असून त्या पुरस्काराचें स्मृतिचिन्ह म्हणून पुरातन वटवृक्षाची निवड करण्यांत आली.

## ६. वारणासी क्षेत्रांत सारस्वत मठ

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ या नांवाने ख्याति पावलेल्या श्रीगुरुपीठाची संस्थापना खऱ्या अर्थाने हिमालयांत बद्रिकाश्रम येथें चैत्र शुक्ल २ या शके १३९७ या दिवशीं योगायोगाने झाली. मध्व संप्रदायाच्या द्वैत तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं श्रीमध्वाचार्य यांनी उडुपी येथें अष्टमठ स्थापन केले होते. या अष्टमठांपैकीं फलमारु मठ हा एक होय. पश्चिम भारतांत विखुरलेला वैष्णव संप्रदायाचा सारस्वत समाज या मठाचें अनुयायित्व पत्करून बसला होता.

फलमारु मठाचे दहावे आचार्य श्रीरामचंद्रतीर्थ हे हिमालयांत तीर्थ यात्रेला परिवारासह गेले असतां बद्रिनाथ येथें अचानक आजारी पडले. दुर्गम प्रदेश आणि उडुपीपासून सुदूर अशा हिमालयांत असल्याने मूळ मठाशीं संपर्क साधणेंहि शक्य नव्हतें. श्रीरामचंद्रतीर्थांनी असा विचार केला किं जर श्रीनारायण सान्निध्यांत आपणास

मुक्ति मिळाली तर फलिमारु मठाची परंपरा खंडित होईल. एक पर्यायी व्यवस्था असावी असा विचार करून त्यांनी परिवारासह यात्रेला आलेल्या गौड सारस्वत ज्ञातींतील माधव नांवाच्या एका ब्रह्मचाऱ्याला रीतसर संन्यासदीक्षा दिली व त्यास श्रीमन्नारायणतीर्थ असे नामाभिदान दिलें आणि रोज तीर्थयात्रा करून आपली प्रतीक्षा न करतां उडुपीला परतण्याचा सल्ला दिला.

संन्यास व्रताची दीक्षा घेतल्यानंतर उत्तर भारतांतील तीर्थाटनाचा संकल्प पुरा करूनच उडुपीला परतण्याचा विचार श्रीनारायणतीर्थांनी केला आणि कुरुक्षेत्र, ब्रह्मावर्त, ब्रह्महृद अशीं तीर्थक्षेत्रें करीत करीत ते त्रिभुवनांत सुप्रसिद्ध असलेल्या वारणासी क्षेत्रांत दाखल झाले. वारणासी हें एक आद्य वैष्णव स्थान असून भगवान् माधवाचें ते निवासस्थान असल्याची आख्यायिका श्रीनारायणतीर्थांनी पुराणांत वाचली होती. कार्तिक मास जवळ येऊन ठेपला आहे आणि कार्तिक मासांत पंचगंगा घाटावरील स्थानाला अनन्य साधारण महत्त्व आहे याचीहि त्यांना कल्पना होती. प्रभु रामचंद्र वनवासाला निघाले त्यावेळीं वर्षभर वारणासी क्षेत्रांत त्यांनी वास्तव्य केले याचा रामायणांतील उल्लेखहि त्यांच्या स्मरणांत होता.

श्रीनारायणतीर्थ पंचगंगा घाटाच्या त्या काळांतील प्रशांत वातावरणांत घाटावर बसले. आनंद रामायणांतील एक श्लोक त्यांना मुखोद्गत होता. त्यांनी मनांतल्या मनांत तो श्लोक उच्चारलाः

**तथा चकार रामोऽपि घट्टबंधनमुत्तमम्।**
**दृश्यते प्रत्यहं यत्र काश्यां रामः ससीतया।।**
**चकार पंचगंगायां कार्तिक स्नानमुत्तमम्।**
**काशीवासं वर्षमेकं चकार धर्मतत्परः।।** (आनंद रामायण २/६/३७-३८)

श्लोकाच्या उच्चारणाबरोबर सर्वांग रोमांचित झालें. श्रीरामचंद्राच्या पादस्पर्शाने पावन झालेल्या या पुण्यक्षेत्रांत कांहीं काळ ध्यान-चिंतन-मननांत व्यतीत केला तर उर्वरित आयुष्यांत समाजसेवेसाठीं आवश्यक असलेल्या सद्सद्विवेक बुद्धीचा सुलभपणे विकास होईल असेंहि त्यांच्या मनाने घेतलें. तासन् तास ते पंचगंगा घाटावर गंगामातेच्या अखंड प्रवाहाच्या विविध छटा न्याहाळीत ध्यानस्थ बसायचे. तिन्ही प्रहरीं गंगास्नान करावे आणि शेष वेळ आपल्या वैयक्तिक आध्यात्मिक साधनेंत व्यतीत करावा असा त्यांचा शिरस्ता होता. घाटाच्या पायथ्याशीं, गंगा-यमुनेच्या त्रिवेणी संगमांत किरणा व धूतपापा या नद्यांचे भूगर्भांतून वहात आलेले प्रवाह याच ठिकाणी आपलें तीर्थ गंगार्पण करतात. सारेंच अद्‌भुत होतें. या ठिकाणीं आपल्या संप्रदायाची एखादी मठवास्तु उभी होऊं शकली तर वारणासी पुण्यक्षेत्रीं गौड सारस्वत ब्राह्मण समाजाला हक्काचें घर मिळूं शकेल अशी कल्पना मनांत घोळत होती.

कार्तिक मास सुरू झाला आणि पंचगंगा घाटावरील भाविकांची गर्दी वाढूं लागली. कधीं कधीं माणसांचे थवेच गंगातटीं येऊन दाखल होत. भाविकांच्या गर्दीमुळें श्रीनारायणतीर्थांच्या एकांतांत विक्षेप आला. घाटाच्या एका बाजूने विशेष गर्दी नसायची. तें स्थान काशी नरेशाच्या कुटुंबियांसाठीं राखून ठेवण्यांत आलें होतें. राजघराण्यांतील मंडळी आपल्या लवाजम्यासह त्या ठिकाणीं यायची आणि इतर भाविकांच्या कोलाहलापासून बाजूला असलेल्या पंचगंगा घाटाच्या एका कोपऱ्यांत स्नान करून परतायची. नरेशाच्या कुटुंबाचा विशेष उपसर्ग पोंचत नव्हता. त्यामुळें आपल्या नेहमींच्या कोपऱ्यांत बसून ध्यान, चिंतन, मनन व जपानुष्ठान श्रीनारायणतीर्थ अबाधित ठेवूं शकले.

कार्तिक महिन्यांतीलच गोष्ट. राजकन्या आपल्या सख्या व दासींसमवेत गंगास्नानाला आली. अंगावरचे मौल्यवान अलंकार उतरून नदी किनारीं वस्त्रांवर ठेवले. नेहमीचाच तो रिवाज.

त्या दिवशीं थंडी विशेष होती. गार वारे चौफेर वाहात होते. आकाशांतील सूर्याचीं उन्हें देखील चांदण्यासारखीं शीतळ भासत होतीं. राजकन्येने गंगापात्रांत डुबकी घेतली आणि तिच्या अंगांत हुडहुडी भरली. लगबगीने किनाऱ्यावरील कोरडे वस्त्र ओढून तिनें अंगावरील ओलीं वस्त्रें सोडलीं.

हळूहळू सारी मंडळी स्नान आटोपून राजवाड्यांत परतायची तयारी करताना लक्षांत आलें कीं राजकन्येची वज्रजडित बांगडी हरवली आहे. नुकतीच काढून ठेवलेली बांगडी जाणार कुठें? शोधाशोध सुरू झाली. भर दिवसा राजकन्येची वज्रजडित बांगडी चोरण्याचें साहस करवलें तरी कोणाला? राजाचे शिपाई बांगडीच्या शोधासाठीं बाहेर पडले.

घाटाच्या एका कोपऱ्यांत एक संन्यासी जपानुष्ठानाला बसलेला त्यांना दिसला. अनेकांनी या परदेशस्थ संन्याशाला तेथें पाहिलें होतें. राजकन्येचा अलंकार हरवल्यामुळें मोठा कोलाहल झाला तरी श्रीनारायणतीर्थांच्या ध्यानांत व्यत्यय आला नाहीं. पण शिपायांनी येऊन त्यांच्या ध्यानाचा भंग केला आणि राजकन्येच्या हरवलेल्या बांगडीची माहिती देऊन त्या परदेशी संन्याशावर वहीम असल्याचें बोलून दाखविलें.

"सर्वसंग परित्याग करून संन्यास व्रताचा स्वीकार केलेल्या आम्हा संन्याशाना धन-अलंकाराचें प्रलोभन असण्याचें कारणच नाहीं. जेथें आम्ही दोन प्रहरच्या घासाची पर्वा करीत नसतों, तेथें स्वीकृत असंग्रह व अस्तेय व्रताशीं द्रोह करून संन्यास धर्माशीं प्रतारणा कां बरे करणार?"

श्रीनारायण तीर्थ यत्किंचितहि विचलित झाले नाहींत. पण त्यांची प्रांजळ भाषा शिपायांना समजली नाहीं व त्यांनी संन्याशाची झडती घेतली.

झडतींत कांहीं सांपडले नाहीं तेव्हां शिपाई हिरमुसले. दरम्यान काशी नरेशांचे वरिष्ठ अधिकारीहि घटना स्थळीं येऊन दाखल झाले होते. एका निरुपद्रवी संन्याशाचा संशयावरून छळ होत आहे हें त्यांना पाहवेना. त्यांनी हस्तक्षेप केला तेव्हां श्रीनारायणतीर्थ सस्मित मुद्रेने म्हणाले, "आम्हाला मनस्ताप झाला याचे वैषम्य वाटून घेऊं नका. उलट संशयाचें परिमार्जन झालें याचा आम्हाला संतोष आहे. पण किंचित व्यावहारिक दृष्टिकोनांतून विचार करा. वज्रजडित बांगडी घसरत घसरत गंगापात्रांत जाऊन पडूं शकते. गढूळ पाणी निवळल्यावर शोध घेतल्यास मिळूं शकते. आमच्यापुरती आम्ही गंगेच्या साक्षीने अशी प्रार्थना करतों कीं अशा भौतिक धनाचा मोह आम्हाला नाहीं आणि तो कधीं होऊं नये हीच आमची प्रार्थना असेल."

श्रीनारायणतीर्थांच्या निरपराधित्वाबद्दल अधिकाऱ्यांच्या मनांत संदेह राहिला नाहीं. त्यांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे घाटानजिक गंगापात्रांत शोध घेतला व बांगडी सांपडली.

राजघराण्यातील मंडळीने श्रीनारायणतीर्थांचीं माफी मागितली आणि एका दिव्यांतून पार पडल्याचा सुस्कारा स्वामीजींनी सोडला. त्यांच्यापुरते तें प्रकरण तेथें संपलें होतें.

परंतु एका निरपराध संन्याशाची राजसत्तेनें आगळीक केली ही गोष्ट काशी नरेशाच्या कानावर गेली. या प्रमादाचें प्रायश्चित्त घेतलें पाहिजे असें त्यांच्या मनाने घेतलें व ते तडक पंचगंगा घाटावर येऊन श्रीनारायणतीर्थां समोर नतमस्तक झाले.

"जें घडलें त्या प्रकारामुळें आम्ही लज्जित झालों आहोंत. स्वामीजींनी आम्हाला क्षमा करावी." अशी नरेशाने प्रार्थना केली.

श्रीनारायणतीर्थांनी हंसून काशी नरेशांच्या मस्तकावर हात ठेवला व म्हटलें, "झालें गेलें विसरून जा. आमच्या मनांत कसलेंच किल्मिष नाहीं." वारणासी क्षेत्रांत नित्यशः हजारों साधुसंन्यासी विहार करत असतात. पण दैवाने श्रीनारायण तीर्थांच्या चरणापाशीं काशी नरेशांना आणलें होतें. क्षेमकुशल व वास्तपूस झाली. आपल्या हातून स्वामीजींची अल्पसेवा घडावी अशी उत्कट इच्छा नरेशांनी व्यक्त केली.

श्रीनारायणतीर्थ म्हणाले, "तुमच्या राज्यांत धर्म व धार्मिकतेला नेहमी उदार आश्रय मिळत आलेला आहे. या पंचगंगा घाटाजवळ गंगामातेने प्रवाहाची दिशा बदलून ती ईशान्यप्लवा झाली आहे. आम्ही सुदूर अपरांत प्रांतांतील गौड सारस्वत ब्राह्मण, पण आमच्या मनांत काशी क्षेत्रांतील गंगामैयाबद्दल आकंठ भक्ति भरलेली आहे. आमच्या समाजाचे लोक अधिकाधिक संख्येने या ठिकाणीं पोंचावें, जगन्मातेचें त्यांना दर्शन घडावें, ईशान्यप्लवा प्रवाहामध्ये पुण्यस्नान करण्याचें भाग्य त्यांना

मिळावें यासाठीं एक मठवास्तु उभी करावी अशी आमची मनोकामना आहे. याकामीं नरेशांनी आस्था दाखविली तर तें एक पुण्यकार्य ठरू शकेल."

पश्चात्तापदग्ध झालेल्या काशी नरेशांना श्रीनारायणतीर्थांच्या उद्गारांनी शांतता मिळाली. त्यानी त्याच घाटावर बिंदुमाधव मंदिराच्या सन्मुख ईशान्यप्लवा गंगेच्या तीरावर एक मठ बांधवून घेतला आणि त्या ठिकाणीं पंचधातूमय श्रीलक्ष्मीनारायणाच्या प्रतिमेची विधिवत् प्रतिष्ठापना करून श्रीनारायणतीर्थांनी नित्य पूजाअर्चेची व्यवस्था केली आणि काशीहून ते परतले.

सारस्वत ब्राह्मण वैष्णव परंपरेंतील हा पहिला मठ होय.

काशी येथें श्रीमठाची स्थापना केल्यानंतर श्रीनारायणतीर्थ उडुपीला परत आले तोंवर असाध्य मानल्या जाणाऱ्या आजारांतून त्यांचे गुरुवर्य श्रीमद्रामचंद्रतीर्थ बरे होऊन स्वीय मठांत परतले होते. श्रीनारायणतीर्थांना पाहून गुरुस्वामींची मनःस्थिती द्विधा झाली. तीर्थयात्रेंत ज्यांनी आपली उत्तम सेवा केली व संन्यासदीक्षा घेतल्यानंतर श्रीवारणासी क्षेत्रांत आपली पताका रोवून जे परतले, त्या नारायणतीर्थांचे कार्यक्षेत्र कसें ठरवायचें? उडुपी येथें त्यांनी नेमस्त केलेल्या श्रीविद्यानिधीतीर्थांकडे पीठाधिकार जाणे हें मठानुयायी द्रविड ब्राह्मणांना हवे होते. त्या मठाची तीच परंपरा होती. त्यानी श्री विद्यानिधीतीर्थांची उत्तराधिकारी म्हणून नियुक्ति केली आणि श्री नारायणतीर्थांना गौड सारस्वत ब्राह्मण समाजाचें संघटन करून स्वतंत्र मठ परंपरा निर्माण करण्याचा सल्ला दिला. उडुपीहून श्रीनारायणतीर्थ भटकळ येथें आले आणि त्यांनी तेथे एक मठवास्तु उभी करून सारस्वत समाजामध्यें धर्मकार्यास आरंभ केला.

सर्वप्रथम श्रीनारायणतीर्थांनी परशुराम भूमीचा विस्तृत दौरा केला. उत्तर भागांत गोमंतक प्रांतांतील परिस्थितीची पहाणी केल्यानंतर ते दक्षिण भारताच्या दौऱ्यावरगेले. सर्वत्र गौड सारस्वत समाजाच्या लोकांनी त्यांचें भव्य-दिव्य स्वागत केलें. हा दौरा मठवास्तु उभारण्यापेक्षांहि आपण स्वीकारलेल्या तत्त्वज्ञानाचा प्रचार--प्रसार करण्याच्या दृष्टीने होता. दक्षिण कर्नाटकांत, केरळांत, उडुपीपासून त्रावणकोरपर्यंत संचार करून ते परतले व पुन्हा गोमंतकापर्यंत संचार करून वैष्णव संप्रदायाने स्वीकारलेल्या द्वैत मताचा प्रचार केला. श्रीमध्वाचार्य यांच्या जीवन व शिकवणीचा सखोल अभ्यास करून त्यांनी त्यांचे विचार अत्यंत प्रभावीपणे समाजासमोर मांडले. नंतर श्री वासुदेवतीर्थ यांचा शिष्य म्हणून स्वीकार करून मठपरंपरा पुढे चालविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोंपविली. (श्रीनारायणतीर्थांनी विषद केलेल्या मध्वसंप्रदायी तत्त्वज्ञानाचा गोषवारा परिशिष्ट ४ मध्यें देण्यांत आला आहे.)

# ७. पर्तगाळ येथील मठवास्तु

परशुराम भूमि गोमंतकांत काणकोण तालुक्यांतील कुशावती नदीचा प्रवाह जेथें ईशान्य दिशेला वळसा घेतो त्या किनाऱ्यावर उभारण्यांत आलेली श्री गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाची वास्तू हें मठाचें मुख्यालय असलें तरी वारणासी येथें पवित्र गंगा नदीच्या किनारीं पंचगंगा घाटावर मठाचे संस्थापक परमपूज्य श्रीमन् नारायणतीर्थ स्वामीजींनी शालिवाहन शके १३९७ मन्मथ नाम संवत्सरांत उभारलेली मठवास्तु ही मठ परंपरेतील पहिली मठवास्तु होय. सबंध काशी क्षेत्रांत केवळ पंचगंगा घाटावर पांच नद्यांचा संगम झालेला आहे. म्हणूनच या घाटाला पंचगंगा घाट असें म्हणतात. हिमालयांत गोमुख व गंगोत्री येथून आपल्या सागर संगमाच्या दिशेने निघालेल्या गंगेच्या यात्रेंतील वारणासी येथील पंचगंगा मीलन हें पवित्रतम तीर्थ मानलें जातें. प्रयाग येथें गंगा, यमुना, सरस्वती या तीन नद्यांचा संगम होत असतो. पण या ठिकाणीं किरणा व धूतपापा या दोन्ही नद्या भूगर्भांतील स्रोताच्या रूपाने आपलें तीर्थ गंगार्पण करीत असतात. शांत वेळी पंचगंगा घाटावर विशिष्ट ठिकाणीं गंगेंत प्रवेश केला तर भूगर्भांतील हे प्रवाह संवेदन आपल्या स्पर्शाने संवेदना जागृत करीत असतात. हें संगमतीर्थ गोकर्ण मठाच्या बाजूला घाटाच्या पायऱ्या संपतात तेथें असल्यानें वारणासी मठाचे महत्त्व अधिकच वाढलें आहे. या मठाच्या स्थापनेची कथाहि अद्‌भुत आहे. केवळ दैवी योगायोगानेंच श्रीनारायणतीर्थ यांच्या हातून तो मठ बांधला गेला आणि आजहि त्या पवित्रमय ठिकाणावरून तो मठ संप्रदायाच्या विविध शाखा-विस्तारांना प्रेरणारूप ठरला आहे.

परंपरेतील दुसरे स्वामी श्रीवासुदेवतीर्थ हे गुरुपीठावर अल्पकाळ राहिले. त्यांनी आंखलेल्या अनेक योजना ते कार्यवाहींत आणूं शकले नाहींत. परंतु त्यांचे शिष्योत्तम श्रीजीवोत्तमतीर्थ यांनी आपल्या सत्तर वर्षांच्या कारकिर्दींत अभूतपूर्व अशा सिद्धि मिळविल्या आणि मठाच्या पताका उत्तुंग फडकावून सर्वांच्या कौतुकास व आदरास ते पात्र ठरले. श्रीजीवोत्तमतीर्थ हे प्रकांड पंडित तर होतेच, त्याशिवाय वैयक्तिक-आध्यात्मिक साधनेद्वारे आणि देशाटने व तीर्थाटने करून त्यानी आपली वैयक्तिक योग्यता वाढविली होती. आपले जन्मगांव असलेल्या बसरूर येथे एक मठवास्तु उभी केली व श्रीगोकर्ण क्षेत्राचें महत्त्व ओळखून त्या ठिकाणींहि मठ उभा केला.

श्रीजीवोत्तमतीर्थ यांचे प्रिय शिष्य श्रीपुरुषोत्तम तीर्थ (४) यांच्या वांट्यालाहि अल्पकाळ गुरुपद आलें. गुरुवर्य वृंदावनस्थ झाल्यानंतर त्याच संवत्सरांत त्यांनी

आपली इहलोकाची यात्रा संपविली व मठाचीं सूत्रे शिष्य श्रीअणुजीवोत्तमतीर्थ यांजकडे सुपूर्द केलीं. श्रीअणुजीवोत्तमतीर्थ हे एकूण पन्नास वर्षे पीठावर राहिले. परंतु त्यांनी डिचोली येथें केवळ एकच मठवास्तु उभारली. मठ-परंपरेतील ती पांचवी मठवास्तु होय.

पर्तगाळी येथें मठ बांधायचे महाकार्य सहावे यतिवर्य, युगप्रवर्तक श्रीरामचंद्रतीर्थ यांनी केलें (शके १५६९ ते १५८७).

पर्तगाळी मठाबद्दल एक आख्यायिका आहे ती येथें नमूद करणे अप्रस्तुत ठरूं नये. श्रीरामचंद्रतीर्थ यांचा मुक्काम वारणासी क्षेत्रीं कोटितीर्थावर आसताना वारणासी येथील ईशान्यप्लवा गंगेवर बांधलेली मठवास्तु हातांतून निसटणार तर नाहीं ना अशी परिस्थिती निर्माण झाली. ज्या अर्चकाच्या स्वाधीन मठवास्तु सुपूर्द करताना नित्य-पूजाअर्चेची जबाबदारी सोपविण्यांत आली होती, त्या अर्चकाच्या वंशजांना ती वास्तू आपली खाजगी मालमत्ता बनविण्याचा मोह झाला. त्या काळीं सारे कागदपत्र अर्चकाच्याच नांवें रहात. मुळांत वारणासी अत्यंत सुदूर, आणि त्या काळांत आजच्यासारखीं संपर्काचीं वा प्रवासाचीं साधनेंहि नव्हतीं. विशेष म्हणजे काशी क्षेत्रावर यवनी राजवटीचें सावट पसरलें होतें. मठवास्तूची नोंदणी आपल्या पूर्वजांच्या नांवावर आहे, एवढ्या लेखी पुराव्याच्या आधारें वारणासी मठाची मालकी रद्द करण्याचा त्याने घाट घातला. श्रीरामचंद्रतीर्थांना कुणा मठाभिमानी व्यक्तीकडून घडल्या प्रकाराचा संदेश मिळाला. श्रीस्वामीजींनी तत्काळ कायदेशीर उपाय योजून मठाचा ताबा पूर्ववत् श्रीसंस्थानाकडे यावा म्हणून खटाटोप सुरू केला. पण इतक्या लांबून काशीतील मठावर ताबा ठेवतां येणार नाहीं आणि ईशान्यप्लवा गंगेच्या कांठावरअसलेली मठवास्तू गमावून बसावें लागेल या चिंतेंत असतांना अनपेक्षित रीत्या त्यांना दृष्टांत झाला.

स्वामीजींना असा संकेत मिळाला कीं मठाच्या मागच्या बाजूला भूगर्भात स्वयंभू चार प्रतिमा आहेत. स्वामीजींनी तो श्रीरामचंद्राचा आदेश मानून उत्खनन केले आणि बरेच पाषाण भेदल्यानंतर तेथे श्रीराम, सीता, लक्ष्मण व मारुती अशा चार मूर्ति सांपडल्या. ह्या मूर्ति मठांत आणून त्यांची प्रतिष्ठापना करण्याचा स्वामीजींचा मनोदय होता. परंतु त्याच रात्री पुन्हा असा दृष्टांत झाला की, ह्या मूर्ति घेऊन स्वामीजींनी भारताच्या पश्चिम किनाऱ्याने उत्तर दिशेकडे जावे आणि मूर्तिवाहकाना त्या भारी वाटूं लागतील अशा ठिकाणी मुक्काम करून पुढील आदेशाची प्रतीक्षा करावी. त्या आदेशानुसार दुसऱ्या दिवशी पहाटे स्वामीजी, मूर्तिवाहक व इतर शिष्यपरिवाराच्या समवेत उत्तरेच्या दिशेने संचारास निघाले. सूर्यास्ताच्या सुमारास स्वामीजी आपल्या परिवारासह गोव्यांतील पैंगीण गांवीं पोहोचले असतां थकलेल्या

वाहकांनी मूर्तीच्या टोपल्या खाली ठेवल्या.

स्वामीजींना एक नयनरम्य प्रशांत असे स्थळ तर हवे होतें. ज्या ठिकाणीं गुरांचा संचार असतो ते स्थान हिंस्त्र जनावरांपासून मुक्त असतें हें ते जाणून होते. त्यामुळें गायींच्या मागोमाग परिसराचा वेध घेत मार्गक्रमण करण्याचे त्यानी ठरविलें. एखादी स्वच्छ निर्मळ गंगा ज्या ठिकाणीं उत्तरवाहिनी अथवा ईशान्यप्लवा होईल अशा ठिकाणीं मठवास्तु उभारली तर पुढें मागे वारणासी येथील मठ हातून गेला तरी त्याची भरपाई होईल असा विचार त्यांच्या मनांत प्रबळ झाला होता. धेनूच्या रूपाने श्रीहरीचा दूत मार्गदर्शन करीत असेल तर हा सारा परिसर व्यापून टाकण्याची महत्त्वाकांक्षाहि मनांत आकार घेऊ लागली.

पहाटे स्वामीजींना स्वप्नांत पुन्हा दृष्टांत झाला. या खेपेला असा आदेश मिळाला की स्वामीजी परशुराम भूमींत दाखल झालेले असून उद्या परशुरामाची धेनु स्वतः येऊन स्वामीजींना पुढील मार्ग दाखवील. आणि खरोखरच तसेच घडले. सूर्योदयाबरोबरच श्रींच्या मुक्कामाच्या दारांत एक गाय येऊन दाखल झाली. स्वामीजींनी धेनूचे पूजन वगैरे केल्यावर गाय चालूं लागली. तिच्या मागोमाग स्वामीजींचा परिवार चालत होता. उत्तरेच्या दिशेने डोंगर-जंगले तुडवीत गाय कुशावती नदीच्या तीरावर येऊन थांबली व तेथे एके ठिकाणी तिने दुधाची धार सोडली. त्या ठिकाणी श्रीराम, सीता व लक्ष्मण ह्या तीन मूर्तीची प्रतिष्ठापना करून सध्याचा पर्तगाळी मठ स्थापन करण्यात आला. नंतर गाय पुन्हा चालूं लागली व तिने थेट रिवण येथे जाऊन दुसऱ्यांदा दुधाची धार सोडली. तेथेही एक मठ उभारून मारुतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

श्रीमद्रामचंद्रतीर्थ स्वामीनी शिष्याश्रम देऊन श्रीमत् दिग्विजय रामचंद्रतीर्थ असे नामाभिधान करून पर्तगाळी मठांत त्याना स्थापन केलें व स्वतः रिवण मठाच्या जवळच एक उत्तम गुहा बांधून त्यांत तपश्चर्या करूं लागले.

गोमंतक ही परशुराम भूमि म्हणून ओळखली जाते. भगवान् परशुरामाने गोमंतकाच्या पूर्व दिशेला असलेल्या सह्य पर्वतावरून अरबी समुद्रांत बाण मारून जी नवी भूमि बनविली, तीच ही गोमंतकभूमि. सारस्वत प्रदेशांतून ब्राह्मणकुळें आणवून त्याने गोमंतकांत यज्ञ केला आणि तो गोमंतकांतच राहिला अशी आख्यायिका आहे. परशुरामाचे देऊळ गोमंतक प्रदेशांतील काणकोण तालुक्यांतील पैंगीण गांवी आहे. हा गांवही पर्तगाळ गांवाहून जवळच आहे. या परशुराम भूमीत मठस्थापना करून श्री रामचंद्रतीर्थांनी वैष्णव धर्माची पताका आणखी उंचावली. ही घटना सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखी आहे. या घटनेपासूनच श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या दैदीप्यमान कारकीर्दीस आरंभ झाला आणि तेव्हांपासून पर्तगाळ

हेंच या मठाचे मुख्य केंद्र बनले.

या पुरातन मठवास्तूचा जीर्णोध्दार यापूर्वी श्रीशके १६२५ मध्ये श्रीलक्ष्मीकांततीर्थ स्वामीजींच्या कारकिर्दीत व दुसऱ्यांदा श्रीशके १७३१ शुक्ल संवत्सरांत श्रीमठपरंपरेतील सतरावे मठाधीश श्रीआनंदतीर्थ स्वामीजीनी केल्यानंतर मठवास्तू अजून जीर्ण झालेली नसली तरी बदलत्या काळानुरूप या समग्र क्षेत्राचा विकास व विस्तार होणे आवश्यक होते. पंतशताब्दि महोत्सव प्रसंगी (श्रीशके १८९९ ) पर्तगाळी मठ हें अध्यात्म व संस्कृतीचे प्रमुख केंद्र बनविण्याच्या दृष्टीने एक बृहद्योजना आखण्यात आली.

पहिल्या टप्प्यात दर्शनी भागांत एक भव्य वास्तू उभारून अग्रभागी दोन दालने व एक महाद्वार बांधण्यात आले आहे. डावीकडील दालनात कार्यालये, दुर्मिळ व पुरातन हस्तलिखिते व वास्तू यांचे संग्रहालय, निवडक धर्मग्रंथ व पोथ्यांचे ग्रंथालय, संशोधन कार्यासाठी एक अध्ययनकक्ष. उजवीकडील दालनांत श्रीजीवोत्तम संस्कृत पाठशाळा, विद्यार्थ्यांचे ग्रंथालय व विद्यार्थ्यांच्या निवासासाठी सर्व सोयींनी परिपूर्ण असे शयनकक्ष आहेत. तळमजला व पहिला मजला असलेल्या या दुमजली वास्तूच्या मध्यभागी मठवास्तूंत प्रवेश करण्यासाठी असलेले महाद्वार श्रीराममंदिरासमोर आहे. महाद्वारापासून जुन्या मठवास्तू दरम्यान दुतर्फा असलेल्या मोकळ्या जागेत एक विशाल सभागार बांधण्यात येणार असून त्याच ठिकाणी चावडी व सिंहासनाचीही व्यवस्था राहील.

पंचशताब्दि महोत्सवाच्या निमित्ताने पर्तगाळ मठवास्तूच्या संपूर्ण किंबहुना कायाकल्पाचें एक भव्य स्वप्न श्रीविद्याधिराजतीर्थांनी पाहिलें आणि त्या स्वप्नाला योजनाबध्द आकार देऊन तीन टप्प्यांत या जीर्णोध्दाराचें कार्य पूर्ण केलें.

अशा रीतीने पूर्णत्वाला नेलेल्या जीर्णोध्दारित मठवास्तूचे कार्य पूर्ण होऊन त्यांचे रीतसर उद्घाटन चैत्र शु. २ चा शके १९२१, म्हणजे दि. १९ मार्च १९९९ रोजीं श्रीविद्याधिराज तीर्थांच्या पवित्र हस्तें झालें व त्यांचें एक स्वप्न साकारलें. प्रभु रामचंद्राच्या गळ्यांत वास्तुरूपी माळा घालण्याची इच्छा पूर्ण झाली.

## पर्तगाळ येथील रामनवमी उत्सव

पर्तगाळी मठांत श्रीराम-मूर्तीची स्थापना झाली आणि दरवर्षी रामनवमीचा उत्सव सुरू थाटांत होऊ लागला. ह्या उत्सवासाठी श्रीरामचंद्रतीर्थांनी एक मोठा रथ तयार करून घेतला होता. रामनवमीच्या रात्री या रथांतून राममूर्तीची मिरवणूक काढीत. हा उत्सव अपेक्षेबाहेर यशस्वी झाला. परिसरांतील भाविक श्रीरामनवमी उत्सवासाठीं पर्तगाळीला येऊं लागले.

रामनवमीचा उत्सव फक्त रामनवमीपुरताच न उरता तो पंचमीपासून सुरू

होऊ लागला. आणि गरुडपूजन, ध्वजारोहण, दंडबली, होम-हवन इत्यादि कार्यक्रमांचीही या उत्सवाला जोड मिळाली. कांही वर्षातच या उत्सवाची ख्याति आसपासच्या भागांत पसरली आणिं दक्षिण कर्नाटकापर्यंतचा सारा शिष्यगण रामनवमी उत्सवासाठी पर्तगाळी मठांत जमू लागला.

रामनवमीचा उत्सव पर्तगाळी मठांत मोठ्या प्रमाणावर साजरा होतो आणि उत्तरोत्तर मठाची मंहति वाढते आहे हें पाहून सौंदे मठाधिपतींना त्यांचे वैषम्य वाटू लागले. तशांतच दोन्ही मठांत एका गांवाच्या वतनावरून वाद चालू होता आणि त्याचा निकाल पर्तगाळ मठाच्या बाजूने लागला होता. याविषयींहि वैषम्यं वाटून एका वर्षाच्या रामनवमीच्या उत्सवाच्या दिवशी सौंदे मठाधिपतींनी मंत्रबळाने आपल्या अंकीत झालेल्या नारायण भूताला - एका पिशाच्च योनीतील सेवकाला - पर्तगाळी येथील उत्सवात अपशकून करण्यासाठी पाठवून दिले.

रामनवमीचा उत्सव रंगांत आला होता. उत्सवमूर्तीची महारथातून मिरवणक निघाली होती. वाद्यनादांत, मंत्रघोषांत आणि 'पुंडलिक वरदे हरि विठ्ठल'च्या गजरांत भक्तगण रथ ओढीत होते. उत्साहांत रथ डोलत डोलत मुख्यप्राणाच्या घुडाकडे चालला होता. अकस्मात काय घडलें कुणालाच कळलें नाहीं. रथ चालायचा बंद झाला. 'ओढा, ओढा' च्या गजरांत लोक रथ ओढीत होते रथाच्या सहाही दोरांना धरून भक्तगण शक्तीची शिकस्त करीत होते, पण रथ मुळीं हलायलाच तयार नव्हता. उत्सवाला जमलेल्यांनी खाली मठांत जाऊन ताबडतोब ही वार्ता स्वामीजींच्या कानावर घातली. दिग्विजय रामचंद्रतीर्थ उत्सवाच्या पुढील कार्यक्रमाची रूपरेषा आंखण्यात गढून गेले होते. आणि इतक्यांत रथ थांबून राहिल्याची कटु वार्ता त्यांच्या कानावर पडली. क्षणभर मन अंतर्मुख करून पाहिले आणि सारा प्रकार त्यांच्या लक्षांत आला. ताबडतोब ते उठले आणि तिथेंच ठेवलेला एक नारळ घेऊन ते रथविधीकडे आले. रथाजवळ येऊन योगबळाने त्यांनी नारायण भूतास आपल्या जवळच्या नारळांत विलीन होण्यास भाग पाडले आणि तो नारळ त्यांनी मुख्य प्राणाच्या (मारुतीच्या) घुडाच्या पायाजवळ स्तंभित केला.

तेव्हांपासून महारथ मुख्य प्राणाच्या घुडाजवळ पोहोचतांच तेलांत भिजलेलीं दोन लांबलांब वस्त्रें घुडावरून खाली सोडुन जाळलीं जातात. शिवाय भूतराजास नारळांचा नैवेद्यहि अर्पण केला जातो. इतर उत्सवाच्या वेळी पालखी घुडाजवळ आली की मुख्यप्राणास आणि भूतराजास नारळाचा नैवेद्य दाखविला जातो. अर्थात ही आख्यायिका आहे. एवढे खरे की आजहि मारुती घुडाच्या पायाजवळ नारायण भुताची प्रतिमा आहे तिचे स्मरण रामनवमीच्या दिवशीं आवर्जून केलें जातें
बदलत्या युगाच्या बरोबरीने पावले उचलण्यासाठी त्यांनी समाजाला योग्य मार्गदर्शन

# ८. श्री विद्याधिराजतीर्थांचें कार्य

श्रीविद्याधिराजतीर्थ १९७३ सालीं ज्या तिथीला श्रीगुरुपीठावर आले तो दिवस श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या संस्थपनेचा दिवस होता. पांच शतकें पूर्ण करण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या श्रीमठाच्या तोंवर बावीस पुण्यवंत स्वामीजींची अखंड परंपरा लाभली होती. श्रीविद्याधिराजतीर्थ हे परंपरेंतील बाविसावे स्वामी.

श्रीगुरुपीठावर येतांच त्यांनी श्रीमठसंस्थापनेचा पंचशताब्दि महोत्सव साजरा करण्याचा संकल्प जाहीर केला आणि एकदम युद्ध पातळीवर ते सर्वच क्षेत्रांमध्ये कार्यरत झाले. आपल्या कारकिर्दीचा शुभारंभ त्यांनी वारणासी क्षेत्रांतील श्रीसंस्थानच्या आद्य मठाच्या जीर्णोद्धाराद्वारें केला व त्यांच्या श्रीगुरुपीठारोहणाच्या रौप्यमहात्सवी वर्षांत (१९९८) त्यांनी दुर्लभ अशी श्रीशैलक्षेत्राची यात्रा करून वास्को (गोवा) येथें नूतन मठवास्तु बांधली.

१९ मार्च १९९९ (चैत्र शुक्ल द्वितीया, शके १९२१) रोजीं तीन टप्प्यांनी जीर्णोद्धार व विस्तार करण्यांत आलेल्या अतिभव्य अशा पर्तगाळ येथील मुख्य मठाच्या वास्तूचें विधिवत् उद्‌घाटन केलें. या सव्वीस वर्षांत श्रीस्वामीजींनी जेवढे कार्य केले तेवढे यापूर्वीच्या पांचशें वर्षांत होऊ शकले नव्हते असे म्हटलें तर ती अतिशयोक्ति ठरू नये. पाव शतकाच्या कालावधीत श्रीस्वामीजींनी जे संकल्प केले व सारे पूर्णत्वास नेले, अशा कार्यामध्यें जुन्या मठवास्तूंचे जीर्णोद्धार व विस्तार, सारस्वत समाजाच्या नव्या वसाहती स्थापन झाल्या तेथें नूतन मठवास्तूंची बांधणी, श्रीमठाच्या कक्षेंतील देवमंदिराची डागडुजी व त्या मंदिरांमध्यें नूतन विग्रहांची प्रतिष्ठापना, यज्ञयाग व अनुष्ठानांद्वारे धर्म व धार्मिकतेच्या क्षेत्राचा विस्तार, ठिकठिकाणीं चातुर्मास्य व्रताचरण करून त्या त्या परिसरांतील समाजवृंदामध्यें कुलदेव व गुरुपीठांवरील श्रद्धा दृढतर करणे, आणि संन्यस्त जीवनाची सारी व्रते कर्तव्यनिष्ठेने पाळून आपली वैयक्तिक अध्यात्म साधना व स्वाध्यायरूपी ज्ञानार्जना महायज्ञ अखंड चालू ठेवला.

विसावें शतक शेवटच्या टप्प्यांत पोंचत असताना श्रीस्वामीजी श्रीगुरुपीठावर आले व श्रीमठाचा पाया अधिक दृढ व व्यापक बनवून, समाज अधिक संघटित व उन्नत बनवून एकविसाव्या शतकाची संभाव्य आव्हाने पेलण्याची शक्ति त्यांच्यांत विकसित केली. दोन शतकांमधील दुवा बनताना परंपरेशीं फारकत येऊं न देतां

केलें. त्यांच्या या कार्याचा विस्तृत आढावा इतिहास घेईलच.
या ठिकाणीं त्यांच्या अष्टसिद्धीच्या विविध पैलूंची आपण कल्पना घेऊ या :

## स्वाध्याय

पीठावर आल्यापासून सामाजिक व सांस्कृतिक, त्याचप्रमाणें धार्मिक कार्यांचा व्याप सतत विस्तारत राहिला तरी पूज्य श्रीस्वामीजींनी आपली स्वाध्याय साधना अखंड चालू ठेवली. या साधनेचा कळस म्हणजे कल्याणपुर येथें सुरू केलेल्या श्रीमन्न्यायसुधा पाठाची त्याठिकाणीं १९९८ मध्ये केलेली यशस्वी परिपूर्ति होय.

पर्तगाळ मठांतील जीवोत्तम वैदिक पाठशाळेची गुणवत्ता वाढवून शिस्तबध्द अभ्यासक्रमाद्वारें विद्यार्थ्यांना वेद, संस्कृत धर्मशास्त्र, ज्योतिष आदि विषयांचे क्रमबध्द शिक्षण दिलें जातें. या पाठशाळेंतून दरवर्षीं सुमारें पन्नास विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करीत असतात. पांच वर्षांच्या अभ्यासक्रमाचें हें गुरूकुल देशभर ख्याति मिळवून बसले आहे.

मठक्षेत्राच्या पलीकडे जाऊन समाजाचे प्रश्न व त्यांचीं दु:खें ओळखून तीं दूर करण्यासाठीं दोन धर्मादाय विश्वस्त मंडळांची स्थापना केलेली आहे. स्वामी द्वारकानाथ विश्वस्त मंडळ व श्री विद्याधिराज धर्मादाय विश्वस्त मंडळ हीं तीं मंडळें होत. शिक्षण, आरोग्य, सामाजिक संस्कार इत्यादि क्षेत्रांत हीं मंडळें समाजाला सहाय्य करीत आहेत.

## श्रीमन्न्यायसुधा मंगल पाठ

श्रीमन्न्यायसुधा या ग्रंथाचे रचयते, लोकविख्यात श्रीमद् जयतीर्थ गुरु सार्वभौमहोत. सुधा ग्रंथ ही त्यांची महामेरु गणावी अशी कृति आहे. जगत्प्रकाशक अशा सूर्याप्रमाणें सज्जनांच्या बुद्धींतून अज्ञानरूपी अंध:कार दूर करण्याचें सामर्थ्य या ग्रंथराजांत आहे.

श्रीवेदव्यासांनी वेदांचे विविध विभाग पाडून त्यांच्या अर्थ निर्णयासाठीं ब्रह्मसूत्रें रचलीं. भगवंताचीं विविध स्वरूप लक्षणें कोणतीं, वेदांपासून कोणता निर्णय करावा, भगवंत हा वेदांच्या सर्व पदांपासून कसा प्रतिपाद्य असतो याचें सयुक्तिक दृढीकरण करणें हा ब्रह्मसूत्राचा उद्देश होय. या सर्व सूत्रांवर श्रीमध्वाचार्य यांनी भाष्य, अणुभाष्य, न्याय विवरण व अनुव्याख्यान असे चार व्याख्यान ग्रंथ लिहिले. त्यांतील अनुव्याख्यान श्लोकरूपी असून ब्रह्मसूत्राचा अत्यंत प्रौढ विमर्षात्मक ग्रंथ आहे.

सकृत्दर्शनीं श्रीमन्न्यायसुधा ग्रंथाचे अवलोकन करताना इक्षुदंडा प्रमाणे कोणताच

रस अनुभवास येत नाहीं. पण मंथन सुरू होतांच त्याच्या दिव्य रसाचा अनुभव येऊं लागतो. या ग्रंथाच्या अध्ययनाने भारतीय तत्त्वशास्त्राचें अनन्य असदृश्य पांडित्य प्राप्त होत असतें. हा ग्रंथ श्रीकर म्हणजे भौतिक, आध्यात्मिक सकल ऐश्वर्य देणारा आहे अशी मध्वमतानुयायी लोकांची मान्यता आहे.

अशा श्रीमन्न्यायसुधा ग्रंथाचें अनन्यभावें अध्ययन व चिकित्सक परिशीलन श्रीमद् विद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी व्यासंगपूर्वक केलें. तो एक बौद्धिक मंथनाचाच अनुभव होता. त्यातून निघालेलें हलाहल पचवून जीं अमोल रत्नें प्राप्त झालीं, तो गुरुवर्यांनी मिळविलेला ठेवा आहे. या तेजस्वी रत्नांचें ओझरतें दर्शन श्रीगोकर्ण मठाधीशांनी कल्याणपुर येथें दि. ४ जुलै १९९८ रोजीं झालेल्या एका विशेष कार्यक्रमांत भक्तगणांना घडविलें. फलिमारु तथा भंडारकेरी मठाधीश श्रीमद् विद्यामान्यतीर्थ यांच्या चिकित्सक उपस्थितींत श्रीमन्न्यायसुधा मंगल पाठ झाला हें विशेष. तो एक अमृतानुभव होता. श्रीमन्महाभारत तात्पर्यनिर्णय पाठाचा शुभारंभ येथील श्रीवंकटरमण देवस्थानांत चातुर्मास मुक्कामाच्या वेळीं (१९९६) करण्यांत आला. आणि त्याच्या परिपूर्ति नंतर मंकी चातुर्मासाच्या पूर्वसंध्येंवर (१९९८) त्याच ठिकाणीं एक विशेष समारंभ आयोजित करण्यांत आला. या समारंभाला उपस्थित विद्वज्जनानी श्रीस्वामीजींचें कार्यपूर्तीबद्दल अभिनंदन केलें.

## श्री स्वामीजींच्या मार्गदर्शनाखालीं व संपूर्ण सहभागाने झालेले यज्ञयाग व इतर धार्मिक कार्यें.

गेल्या पंचवीस वर्षांत अशा प्रकारचीं धार्मिक होमहवनें मठानुयायी वर्गाकडून स्थानिक देवदेवतांच्या सान्निध्यांत पूज्य स्वामीजींच्या उपस्थितींत पार पडलीं. त्यांमध्यें सहस्त्रकुंभ महाविष्णु, महारुद्र, शतचंडी, रक्षात्रय हवन आदि कार्यांचा समावेश आहे.

१. श्रीलक्ष्मीनारायण महामाया देवस्थान, अंकोला येथें अयुतचंडी व सहस्त्रचंडी (यजमान वसंतराव धेंपे)
२. श्रीपर्तगाळ मठीं सहस्त्रचंडी
३. श्री दामोदर संस्थान जांबावली येथें अतिविष्णु व अतिरूद्र (यजमान श्री. गुरुदास दुकळे)
४. कुमठा अतिविष्णु
५. गुंडबाळा अतिविष्णु - (१९८८)

६. मुंबईंत श्रीराममंदिराच्या प्रांगणांत कोटि रामनाम महायज्ञ, सहस्त्र रजत कुंभाभिषेक, १० दिवसांच्या सोहळ्यांत श्रीकाशी मठाधीश, श्रीकैवल्य मठाधीश व त्यांचे शिष्य, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी, उपमुख्यमंत्री, श्री. गोपीनाथ मुंढे, कर्नाटक राज्याचे बृहत् उद्योगमंत्री श्री. रघुनाथराव देशपांडे यांची उपस्थिति.

७. श्रीरामनाथ देवस्थानांत महासुदर्शन हवन.

## पूज्य श्री विद्याधिराजतीर्थानी केलेले मठ जीर्णोध्दार

१. वारणासी (१९७५)
२. बसरूर, कारवार, वेंकटापुर (१९७९)
३. गोकर्ण (१९८१)
४. भटकळ (१९८१)
५. पर्तगाळ मुख्यमठ (१९८४, ८६, ९९)-(यापूर्वीचे जीर्णोद्धार : परिशिष्ट ५)
६. अंकोला (१९८८)
७. मंगळूर (नवग्रह प्रतिष्ठा) १९९१
८. गंगोळ्ळी (१९९६)
९. बेंगळूर येथील लहानशा मठवास्तूचें भव्य वास्तूंत रूपांतर (१९८५)
१०. वास्को येथें छोटेखानी मठवास्तु शेजारीं बहुमजलीं भव्य वास्तु (१९९८)

(वास्को येथें श्रीइंदिराकांत सभागृह या नांवाची एक मठवास्तु श्रीद्वारकानाथतीर्थ यांनी बांधून घेतली होती. ही वास्तु वास्को शहराच्या वाढत्या गरजा भागवूं शकत नाहीं हें पाहून, मूळ वास्तूलगत नवीन मठवास्तु बांधली आहे.)

## पूज्य श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी आपल्या कारकिर्दींत बांधलेल्या नवीन मठवास्तु.

१. यल्लापूर (१९८३)
२. मंकी (१९८३)
३. हुबळी (१९८९)
४. बदरिकाश्रम (१९८९)
५. बेळगांव (१९९०)
६. दाण्डेली (१९९२)
७. मडगांव (१९९३)
८. परवरी शीलान्यास (१९९८)

## जुन्या मठांमध्यें सभा संमेलनासाठीं उपयुक्त अशा कल्याण मंडपांची उभारणी

१. भटकळ (श्रीनारायणतीर्थ कल्याण मंटप) - १९८१
२. मंगळूर (श्रीद्वारकानाथ भवन) - १९८२
३. रिवण (श्रीरामचंद्रतीर्थ मंडप) - १९८४
४. गंगोळ्ळी (श्रीद्वारकानाथतीर्थ सभागृह) - १९८४
५. अंकोला (श्रीविद्याधिराज सभागृह) - १९८९
६. डिचोली (श्रीअणुजीवोत्तमतीर्थ मंडप) - १९९६

## वृंदावनाचे जीर्णोध्दार

मठ परंपरेंतील यतिवर्यांच्या पुढील वृंदावनांचे जीर्णोध्दार श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी आपल्या कारकीर्दींत केले.

| | | |
|---|---|---|
| भटकळ | (१) | श्री नारायणतीर्थ (१९७४) |
| | (२) | श्री जीवोत्तमतीर्थ - (१९७४) |
| पर्तगाळ | (२२) | श्री द्वारकानाथतीर्थ - (१९७४) |
| गोकर्ण | (४) | श्री पुरुषोत्तमतीर्थ - (१९७७) |
| अंकोला | (७) | श्री दिग्विजय रामचंद्रतीर्थ -.(१९९०) |
| | (११) | श्री रमाकांततीर्थ - (१९९०) |
| | (१४) | श्री भूविजय रामचंद्रतीर्थ - (१९९०) |
| डिचोली | (१५) | श्री रमानाथतीर्थ - (१९९४) |
| पर्तगाळ | (१६) | श्री आनंदतीर्थ स्वामी - (१९९५) |
| होन्नावर | (१३) | श्री श्रीकान्ततीर्थ स्वामी - (१९९५) |
| पर्तगाळ | | श्री नरहरितीर्थ (शिष्यस्वामी) - (१९९५) |
| | | श्री व्यासतीर्थ (शिष्यस्वामी) - (१९९५) |
| होन्नावर | (८) | श्री रघुचंद्रतीर्थ |
| वेंकटापूर | (१०) | श्री लक्ष्मीकांततीर्थ |
| डिचोली | (५) | श्री अणुजीवोत्तमतीर्थ - (१९९५) |

## पूज्य श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजींकडून नूतन विग्रह प्रतिष्ठा कार्य पुढील देवमंदिरांमध्यें झालें.

१. वेंकटापुर- श्री लक्ष्मी व्यंकटेश
२. रामनाथी - श्री रामनाथ नूतन लिंग प्रतिष्ठा
३. म्हाडदोळ - देवतांची प्रतिष्ठा - (१९७७)

४. मादनगेरी - श्री वीरविठ्ठल प्रतिष्ठा - (१९७८)
५. मुर्डेश्वर - श्री लक्ष्मी-वेंकटेश - (१९७७)
६. माशेल - श्री देवकीकृष्ण देवप्रतिष्ठा - (१९७९)
७. बांदोडें - श्री महालक्ष्मी - (१९९०)
८. - श्री नारायण प्रतिष्ठा - (१९९१)
९. आकें (मडगांव) - श्री मारुति प्रतिष्ठा (१९९२)
१०. खोल (काणकोण) - श्री लक्ष्मी नारायणाची पुनःप्रतिष्ठा - (१९९८)
११. कार्गल - श्री चौडेश्वरी आणि सप्तदेवतांची प्रतिष्ठा - (१९९८)

## ९. केल्याने तीर्थाटन...

पंचमहाभूतांनी व्यापलेला भूतल विपुल विविधतेने भरलेला आहे. बर्फाच्छादित हिमशिखरें आणि भूगर्भांतील हिरे व सोन्याच्या खाणी, सुपीक भूमि, नापीक भूमि, तऱ्हेकवार जलाशय, वृक्षवल्ली आणि वनस्पतींचे अनंत प्रकार, जलचर आणि भूतलावर संचार अथवा आकाशांत विहार करणारे प्राणी ... देवाच्या दुनियेंत नजर टाकूं तिथें अद्भूत आश्चर्य पसरलेलें आहे. उकळत्या पाण्याचे निर्झर, शीतजलाचे प्रवाह, औषधी गुणधर्म असलेली हवा, पाणी आणि वनस्पती ही सारी देवाची निर्मिती आहे.

भूतलावर देवाने कांहीं स्थळें अशीं निर्मिलीं कीं जेथील वैशिष्ट्यांमुळें तीं तीर्थस्थाने म्हणून मान्यता पावलीं. तनमनाची शुद्धि करणारीं हीं तीर्थस्थाने भारतांत मुबलक आहेत. हीं सारीं स्थाने हजारों वर्षांपासून आपल्या ऋषिमुनीनी व साधुसंतांनी पवित्र पावन तीर्थक्षेत्रें मानलीं. अर्थात त्या प्रदेशांचें, तेथील जलाशयांचें निरीक्षण परीक्षण करूनच पवित्र असल्याचा निर्वाळा संतमहंतांनी दिला. निसर्गशक्तीचें त्या ठिकाणीं केंद्र असतें. पृथ्वीच्या चुंबकीय शक्तीचा इष्ट प्रभाव त्या केंद्रावर पडत असावा, न पेक्षां केवळ बाह्य दृष्टीला शांत, निर्मळ व प्रसन्न सुंदर वाटणारीं एकापेक्षा एक अधिक सरस अशीं स्थाने वगळून तपस्वी महर्षींनी विशिष्ट स्थाने निवडलीं नसतीं. तीर्थस्थानाची निवड झाल्यानंतर संतांच्या समागमाने तेथील पावन शक्ती वृद्धिंगत झाली. धर्म व धार्मिकतेचें चिंतन, मनन व वेदाध्ययन, यज्ञयाग यांसारख्या प्रवृत्तींमुळें तीर्थस्थानाचें वायुमंडळ पुण्यमय व्हायला मदत झाली. अशा तीर्थांमध्यें वास करताना आत्मानंदाचा जो अनुभव येतो तो वेगळाच!

संन्याशांसाठीं तीर्थयात्रा एखाद्या आवश्यक व्रतासारखी असते. संन्याशी हे प्रकृतीने व धर्माने परिव्राजक असतात. भौतिक समृद्धीच्या वातावरणांत अधिक

काळ राहिल्याने, तेथील सुख-सोयींबद्दल मोह निर्माण होण्याचा, चित्त विचलीत होण्याचा धोका असतो. तसें झालें तर तो संन्यस्त व्रताचा द्रोह ठरेल. त्या दृष्टीनेही अखंड परिभ्रमण करण्याचा शिरस्ता संन्याशांनी पाडून घेतला आहे.

## अष्टमहाक्षेत्र यात्रा

अष्टवैकुंठ म्हणवून घेणाऱ्या या खालील आठ क्षेत्रांमध्यें श्री विष्णु भगवंत स्वयं प्रगट झाला असें गणले जातें. हीं क्षेत्रें क्रमशः अशीं आहेत :-

१. **श्रीरंग** - हें भूतलावरील वैकुण्ठधाम आहे. दक्षिण भारतांत त्रिशिरापल्ली अथवा तिरुचिनापल्ली नगरापासून तीन मैल अंतरावर आहे. येथें श्रीरंगनाथ भगवान श्रीरंगलक्ष्मी समवेत प्रणवाकार विमानांत (गर्भगृह) दक्षिणाभिमुख होऊन शेषशय्येवर पहुडले आहेत. येथें कावेरी नदी, चंद्रपुष्करिणी आणि पुन्नाग वृक्ष आहेत.

कावेरीच्या दोन धारांमध्यें श्रीरंग द्वीप वसले आहे. या मंदिराचा विस्तार भारतांतील इतर कुठल्याहि मंदिरांत पहायला मिळत नाहीं. (- तीर्थांक पृ. ४९० व ३७१)

२. **तिरुपती** – वेंकटाचल पर्वतावर आकाशगंगा, पापनाशनतीर्थ, वगैरे तीर्थस्थानें आहेत. श्रीवेंकटेश्वर भगवंताचे स्थान ज्या पर्वतावर आहे, त्याला तिरुमलई असें म्हणतात. कपिलतीर्थामध्यें स्नान करून, कपिल भगवंताचें स्मरण करून यात्री पर्वतारोहण करतात. ह्या पर्वताचें नांव वेंकटाचल असें आहे. असें म्हणतात कीं साक्षात् श्रीव्यंकटेश येथे पर्वतरूपांत स्थित आहे. यावरून याला शेषाचल असेंहि म्हणतात. पर्वतावर स्वामी पुष्करणी तीर्थांत स्नान करून वराह भगवंताचें दर्शन करून भगवान् वेंकटेशाचें दर्शन घेतात. (- तीर्थांक पृ. ३४६) .

३. **श्रीमुष्णम्** – चिदंबरापासून २६ मैल दूर हें क्षेत्र आहे. वराह भगवानाचा अवतार इथेंच झाला होता. ह्या देवळांत श्रीदेवी–भूदेवीसह यज्ञवराहाची सुंदर मूर्ती आहे. (- तीर्थांक पृ. ३५९)

४. **तोताद्रि** – तीर्णवल्लीपासून थोड्या अंतरावर हें स्थळ आहे. मंदिराच्या गर्भागारांत शेष फणांच्या छत्राखालीं श्रीदेवी–भूदेवीसहित भगवान विष्णूची श्रीमूर्ति विराजित आहे. (- तीर्थांक पृ. ३९०)

५. **पुष्कर** – जलरूपनारायण स्थित हें एक मोठें सरोवर असून घाटावर ब्रह्मदेवाचे मंदिर आहे. हे क्षेत्र परशुरामाचे वडील जमदग्नि ऋषींचें तपोस्थान आहे. (- तीर्थांक पृ. ८६)

६. **नैमिषारण्य** – हें स्वयंव्यक्त क्षेत्र असून येथें वनरूपीनारायण आहे. येथें चक्रतीर्थ आणि गोमती नदी आहे. (- तीर्थांक पृ. ५०९ व ११०)

७. **बद्रिकाश्रम** – इथें लक्ष्मी समवेत बद्रिनारायण पूर्वाभिमुख आहे. ऋषिरूप

नरनारायण-स्वरूप विराजित आहे. (- तीर्थांक पृ. ५०९, ५८ व ५६)

८. **शालिग्रामक्षेत्र** (मुक्तिनारायण) – याला मुक्तिनाथ असेंहि म्हणतात. शालिग्राम शिला येथे मिळतात. येथे चक्रतीर्थ व गंडकी नदी आहे. (- तीर्थांक पृ. ५०९,१५४ व १५५)

> **।। शालिग्रामशिला यत्र तीर्थं तत् क्रोशयुग्मकम् ।।**
>
> –भगवान शालिग्राम जेथें विराजमान असतात, तेथें दोन कोसांपर्यंत तीर्थक्षेत्र विस्तारतें. (–बृहद्धर्म पुराण, पूर्वखण्ड-१४/२८)

अष्टोत्तरशत तीर्थांमध्ये अष्टवैकुंठ भारतवर्षांत आहेत. (परिशिष्ट ६ पहा) त्यांत चार क्षेत्रें दक्षिण भारतामध्यें (म्हणजे विंध्य पर्वताच्या दक्षिणेस) व चार उत्तर भारतामध्यें आहेत. तिरुपति (आंध्र प्रदेश) श्रीरंग, श्रीमुष्ण, तोताद्रि हीं तीन तमीळनाडुमध्यें आहेत. बद्रिकाश्रम (गढवाल जिल्हा, हिमाचल प्रदेश); पुष्कर (राजस्थान) नैमिषारण्य (उत्तर प्रदेश) व शालिग्रामक्षेत्र (नेपाल) मध्यें आहे.

### स्वयं व्यक्त अष्टमहाक्षेत्र

**आद्यमेतत्स्वयं व्यक्तं विमानं रङ्ग संज्ञकम् ।**
**श्रीमुष्णं वेङ्कटाद्रिं च शालग्रामं च नैमिषम् ।।**
**तोताद्रिं पुष्करं चैव नरनारायणाश्रमम् ।**
**अष्टौ मे मूर्तयः सन्ति स्वयं व्यक्ता महीतले ।।**

–श्रीरङ्ग, श्रीमुष्ण, वेङ्कटाचल, हरिक्षेत्रके शालग्राम, नैमिष, तोताद्रि, पुष्कर आणि बदरिकाश्रम - या आठ स्वयं प्रकट स्थानांत भूतलावर भगवंताचे आठ श्रीविग्रह स्वयं प्रकट झाले.

## चतुर्धाम यात्रा

१ द्वारावती (द्वारका) :- हें क्षेत्र समुद्र किनाऱ्यावर गोमती नदीच्या मुखावर आहे. येथें द्वारकाधीश भगवान् श्रीकृष्णाचें मंदिर आहे. हें स्थान त्रेतायुगांतील आहे. (- तीर्थांक पृ. ४१०)

२ जगन्नाथपुरी :- येथील मुख्य जगन्नाथ मंदिर अत्यंत विशाल आहे. कलियुगाचें पावनकारी धाम म्हणून गणलें जाते. येथील गर्भगारांत श्री जगन्नाथ, सुभद्रा तथा बलरामजीच्या मूर्ति आहेत. (- तीर्थांक पृ. १९७)

३ रामेश्वरः- मंदिरांत रामेश्वर नावानें शिवलिंग विराजित आहे. हे क्षेत्र त्रेतायुगांतील आहे. (- तीर्थांक पृ. ३७४)

४ बद्रीकाश्रम :- (अष्ट महाक्षेत्रांत अंतर्भूत)

## मोक्षदायिनी सप्त पुरी

१. **काशी** :- पुराणांनुसार हे एक आद्य वैष्णव स्थान आहे. एके काळी ही भगवान् माधवाची पुरी होती, असे सांगण्यांत येते कीं एकदां भगवान् शंकराने ब्रह्माचें एक शिर कापलें असता तें शंकराच्या हाताला चिकटून राहिलें. शंकर बारा वर्षेपर्यंत बद्रिनारायण, कुरुक्षेत्र, ब्रह्महृद आदि क्षेत्रांतून फिरत राहिला. पण चिकटलेलें ब्रह्माचें शिर सुटेना शेवटीं शंकर काशीच्या सीमेंत प्रवेश करूं लागला तेव्हां ब्रह्महत्येने त्यांचा पिच्छा सोडला आणि तिथें स्नान करतांच हाताला चिकटलेलें शिर सुटलें. भगवान विष्णूची प्रार्थना करून शंकराने त्या नगरींत नेहमी वास करण्यासाठी जागा मागून घेतली. (- तीर्थांक पृ.१२६/१२७)

२. **कांची** :- कांची ही हरिहरांची पुरी आहे. याचे शिवकांची व विष्णुकांची असे दोन भाग आहेत. शिवकांची मध्यें एकाम्रेश्वर देवस्थान आहे फर्लांगांवर कामाक्षी देवीचे मंदिर आहे. शिवकांची देवस्थानापासून पांच किलोमीटरांवर विष्णुकांची देवालय आहे. (- तीर्थांक पृ. ३५४ ते ३५७)

३. **मायापुरी (हरिद्वार)** :- हिला गंगाद्वार, कुशावर्त असेंहि अपरनाम आहे. (तीर्थांक पृ. ६१-६२)

४. **अयोध्या** :- सप्तपुरींमध्यें प्रथम पुरी अयोध्या आहे. सूर्यवंशी राजा लोकांची ही राजधानी. (तीर्थांक पृ. १४२)

५. **द्वारावती (द्वारका)**:- (चतुर्धाम यात्रांत अंतर्भूत)

६. **मथुरा** :- द्वारकाधीश मंदिर व विश्रामघाट (तीर्थांक पृ. ९५, ९६)

७. **अवंतिकापुरी (उज्जैन)**:- महाकालमंदिर व क्षिप्रा नदी हरसिध्दी देवी **अशीं** प्रधान मंदिरें आहेत. (तीर्थांक पृ.२१४)

## पंचनद (गंगा) वारणासी

वारणासी या तीर्थक्षेत्राला काशी, बनारस या नांवानेंही ओळखतात. पवित्र गंगा नदीच्या किनाऱ्यावर वसलेली ही नगरी भारतीय संस्कृतीचें व हिन्दु आचारविचारांचे हार्द आहे. नगाधिराज हिमालय हें अनेक तीर्थाचें माहेर असले तरी सामान्य जनांसाठीं तो परिसर दुर्गम असल्यामुळें धर्म, संस्कृति, अध्यात्म यांचे केंद्र वारणासीच बनले. आसेतुहिमाचल विस्तारलेल्या या देशाच्या कानाकोपऱ्यांतील ब्राह्मण विद्यार्जनासाठी अणि आपल्या जिज्ञासेच्या पूर्तिसाठी, धर्मशास्त्राचा अन्वयार्थ समजून घेण्यासाठी किंवा केवळ उदात्त वातावरणांत वेदांचें श्रवण करण्यासाठीं काशीनगरींत एकत्र होत

असत. या नगरीने अनेक शतके धर्मशास्त्रावरील वादविवाद ऐकले आणि भारतीय संस्कृतीला उदात्तता व तेजस्विता देण्याचें कार्य अविरत चालू ठेवलें.

काशी शहराचें महत्त्व व महात्म्य एवढ्याने संपत नाही. खऱ्या अर्थाने काशी ही देवभूमि आहे. त्या भूमीचीं वर्णने करणारे असंख्य ग्रंथ उपल्ब्ध आहेत. प्रत्येक ग्रंथामध्ये काशीची वेगवेगळीं वैशिष्ट्यें नमूद केलेलीं आहेत. ब्रह्मवैवर्त पुराणामध्ये काशीरहस्यम् नावाचा एक वेगळाच खंड आहे. सव्वीस अध्याय व २७०० श्लोकांच्या या खंडांत काशीचें सर्वार्थाने सुंदर शब्दांत वर्णन केलेलें आहे. काशी म्हणजे अनावृत ब्रह्मस्वरूप असून त्या नगरीविषयी जाणणे म्हणजे सर्वज्ञ होण्यासारखेच आहे. श्रीकाशीखण्ड नांवाच्या ग्रंथांतहि काशीनगरीचे तपशीलवार वर्णन वाचायला मिळते. त्या काशी खंडाच्या ५९ व ६० व्या अध्यायांत पंचनद व बिन्दुमाधव यांचे वर्णन व कथन करण्यात आले आहे. पंचनदला पंचगंगा घाट असेंहि म्हणतात. या पंचगंगा घाटावर श्रीसंस्थानचा पुरातन मठ आपली पताका उंच फडकावीत दिमाखाने उभा आहे.

पंचगंगा घाट हे भगवान श्री विष्णूचे निवासस्थान मानलें जातें. भूलोक, भुवर्लेक व स्वर्लेक या तिन्ही लोकांमध्ये काशी क्षेत्र परमपवित्र मानण्यांत येते आणि या परमपवित्र काशीमध्ये भगवान विष्णूने आपल्या निवासासाठी निवडलेले पंचनदतीर्थ श्रेष्ठतम व पवित्रतम असे स्थान ठरते.

विशाल काशी नगरींत पंचगंगा घाटावरच श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाची शाखा उभारण्यासाठी आद्य मठाधीशांना कोणती गोष्ट प्रवृत्त करून गेली याचा आपण अंदाज करूं शकतो. काशी खंडातील पंचनद महात्म्यांत त्या घाटाबद्दल काय लिहिले आहे ते पाहूं या.

श्रीकाशीखंडात अगस्त्य ऋषीने षडानन कुमार कार्तिकेय यालां प्रश्न विचारले व कार्तिकेयाने जिज्ञासेचे समाधन केले अशा स्वरूपात हे वर्णन येते.

पंचनद हे इतके पवित्र तीर्थ आहे की त्याचे नांव उच्चारतांच पाप नष्ट होत असते असे सांगून कार्तिकेय म्हणतात, ‘खुद्द तीर्थराज प्रयाग या पंचगंगा घाटावरील पंचनद तीर्थात वास करीत असतात’.

देशांत अनेक तीर्थे आहेत. या तीर्थावर वेगवेगळ्या भागांतील लोक स्नान करून आपल्या विविध प्रकारच्या पापांतून मुक्त होत असतात. लहान सहान तीर्थे आपण वर्षभरांत गोळा केलेलीं पापें माघ महिन्यांत सूर्य मकर राशींत असताना प्रयागला जाऊन ती तीर्थराजाकडे सुपूर्द करीत असतात. आणि हीं सारीं पापें घेऊन तीर्थराज-प्रयाग काशीला येतात. आणि पंचनद तीर्थावर एक दिवस स्नान करून ती तेथे विसर्जन करीत असतात.

अशा या पंचनद तीर्थाची उत्पत्ती कशी झाली याची एक कथा या खंडात वाचायला मिळते.

कार्तिक महिना हा पंचनद तीर्थाच्या दृष्टीने पवित्रतम मानण्यांत आला आहे. या पचनदतीर्थाला सत्ययुगांत धर्मनद, त्रेतायुगांत धूतपापा, द्वापारयुगांत बिंदुतीर्थ व कलियुगांत पंचनद असे नांव प्राप्त झालेले आहे. सत्ययुगांत शेकडो वर्षे तपश्चर्या करून मिळणारे फळ केवळ कार्तिक मासांत पंचनद तीर्थात स्नान केल्यावर मिळू शकते. आणि तेवढेच पुण्य कार्तिक महिन्यांत एकदांच पंचनद तीर्थांत स्नान केल्याने मिळूं शकते.

**व्रतिनः कार्तिके मासि स्नातस्य विधिवन्मम।**
**दामोदर गृहाणार्घ्यं दनुजेन्द्रनिषुदन।।**

श्रीविष्णूचे स्मरण करून व्रतस्थ लोक वरील श्लोकाचे उच्चारण करतात व अर्घ्य अर्पण करतात. श्लोकाचा भावार्थ असा.

'दैत्येंद्र विघातक दामोदरा, मी पूर्ण कार्तिक महिना या बिन्दुतीर्थांत विधिपूर्वक स्नान केले आहे. माझ्या अर्घ्याचा स्वीकार करावा.'

स्कन्द पुराणांत विष्णू भगवान अग्निबिंदू ऋषीला सांगतात, 'सर्व स्थानांमध्ये आनंदवन पवित्र आहे. त्याहून पवित्र आहे पंचनद तीर्थ. कारण येथे मी स्वतः निवास करीत आहे.' (स्कन्दपुराण, चतुर्थ खण्ड, बिन्दुमाधव महात्म्य अध्याय सात )

## वारणासी येथील पंचगंगा घाट

वारणासी क्षेत्रीं पंचगंगा घाटावर भव्य जीर्णोध्दारित मठवास्तू श्रीसंस्थानाची पताका डौलाने फडकावीत उभी आहे. वारणा, असि व गंगा, यमुना, सरस्वती, किरणा तथा धूतपापा या पाच नद्यांचा येथे संगम होत असल्यामुळें या तीर्थाला पंचगंगा तीर्थ असें म्हणतात. वारणासींतील तें स्थान पवित्रतम मानलें जातें.

काशी खंडांत असें नमूद करण्यात आलें आहे की, अग्निबिंदू ऋषीला वर देऊन भगवान् विष्णूने बिंदुमाधवाचे रूप घेतलें व ते तेथें प्रादुर्भूत झाले.

**प्रयागे माघमासे तु सम्यक्स्नातस्य यत्फलम्।**
**तत्फलं स्याद्दिनैकेन काश्यां पञ्चनदे ध्रुवम्।।**

**(काशी खंड. ५६/११६)**

ह्या तीर्थाचें महात्म्य फार मोठें आहे. प्रयाग येथे महिनाभर स्नान करून मिळणारे पुण्य पंचगंगेत केवळ एका दिवसाच्या स्नानाने मिळतें.

या तीर्थांचे दुसरें वैशिष्ट्य असें की त्याची तीर्थ देवता विष्णू असून कार्तिक महिना हा स्नानासाठीं अनुरूप मास मानला जातो.

अशा पवित्र स्थानी श्रीसंस्थानचा मठ श्रीमठाचे संस्थापक श्रीनारायणतीर्थ यांनीच उभारला. विशिष्ट परिस्थितींत काशी नरेशाच्या भक्ति व आदरास ते पात्र ठरल्यावर घाटावर बसून चिंतन करणाऱ्या या सारस्वत मुनीला काशी नरेशांनी तेथें बिंदुमाधव सान्निध्यांत मठ वास्तू उभारण्यासाठीं जागा दान केली.

काशींतील उंच पंचगंगा घाट हें पवित्रतम स्थान मानलें जातें. शिवाय वारणासींत पंचगंगा ईशान्य वाहिनी झालेली आहे. देव मंदिरासाठी जागा निवडतांना ज्या ठिकाणी जलप्रवाह ईशान्येकडे वळतो तें ठिकाण निवडण्याची शिफारस तंत्रसार संग्रहांत ठळकपणे येऊन जाते.

**प्रागुदक्प्रवणे देशे कुर्याद्देवालयं सुधीः ।।**

**(श्रीमध्वाचार्य लिखित तंत्रसारसंग्रह अ ३-४५)**

आनंद रामायणांत भगवान् रामचंद्रांच्या तीर्थयात्रांची माहिती देणारे एक स्वतंत्र यात्राकांड आहे. प्रभु रामचंद्रांनी केलेल्या यात्रांचे विवरण तेथे वाचायला मिळते. अशा यात्रांमध्ये कार्तिक मासांत त्यांनी पंचगंगा घाटावर गंगास्नान केल्याचा उल्लेख आहे. त्यांनी वर्षभर काशीला वास्तव्य करून तेथे घाट बांधले आणि तेथून ते च्यवनाश्रम शोण, गंगासंगम, गंगा-गंडकी संगम, नारायणी-गंडकी संगम, हरिहर क्षेत्र (सोनपूर), राजगृह इत्यादि ठिकाणी गेल्याचा उल्लेख आहे.

आनंद रामायणांतील पंचगंगा घाटावरील कार्तिक स्नानाशीं संबंधित श्लोक पुढीलप्रमाणे आहे.

**तथा चकार रामोऽपि घट्टबन्धनमुत्तमम् ।**
**दृश्यते प्रत्यहं यत्र काश्यां रामः ससीतया ।।**
**चकार पंच गंगायां कार्तिक स्नानमुत्तमं ।**
**काशीवासं वर्षमेकं चकार धर्मतत्परः ।।**

(आनंद रामा. २/६/ ३७-३८)

संपूर्ण कार्तिक मासांत पंचगंगा घाटावर स्नान करणे शक्य झाले नाही तर कार्तिक शुक्ल त्रयोदशी, चतुर्दशी व पौर्णिमा असे तीन दिवस गंगास्नान केल्यानेही कार्तिक स्नानाचे पुण्य पदरी पडते असे म्हणतात.

**वारणस्यां पञ्चनदे त्र्यहं स्नानास्तु कार्तिके ।**
**अमी ते पुण्यवपुषः पुण्यभाजोऽति निर्मलाः ।।**

काशी क्षेत्रांतील पंचगंगा तीर्थांत पांच नद्यांचा संगम, झालेला आहे. गंगा रत्नमालेत त्याबद्दल असे वर्णन येऊन जातें:

**'गंगा भारति सूर्य सूनु किरणा बा धूतपापा तसे।**
**पांची एकवटोनि तीर्थ निपते ते पंच-गंगा असे'।।**

या पवित्र ठिकाणी आद्य मठ उभा झाला तर वैष्णव संप्रदायी सारस्वत समाजाला तो तारक ठरेल ही श्रीनारायणतीर्थांची श्रध्दा पांच शतकांच्या इतिहास अवलोकनानंतर किती सार्थ होती याची कल्पना करूं शकूं.

श्रीसंस्थानचें मुख्यालय गोव्यांत कुशावती तीर्थी पर्वतरांगांच्या पायथ्याशीं उभारण्याचें श्रेय श्रीमठ परंपरेंतील सहावे स्वामी परमपूज्य श्रीरामचंद्रतीर्थ यांना दिलें जातें. श्रीरामचंद्रतीर्थ काशीयात्रेला गेले असतां प्राचीन मठवास्तुच्या आवारांत पंचगंगा घाटावर चिंतनासाठी बसले होते. भूगोल लक्षात घेतां परशुरामभूमीत मुख्यालयास अनुरूप अशी मठवास्तू उभारण्याची प्रेरणा त्याना तेथे झाली आणि ज्या ठिकाणी कुशावती नदी सह्याद्रि पर्वतरांगांच्या पायथ्याशी ईशान्य वाहिनी झालेली त्याना दिसली तेथे त्यानी पर्तगाळ मठवास्तू उभी केली असें मानण्यास पुरेसे दाखले उपलब्ध आहेत.

पर्तगाळ मठस्थापनेबद्दल अनेक आख्यायिका प्रचलित असल्या आणि त्या निराधार ठरवितां येत नसल्या तरी जागेच्या निवडीमागें ईशान्यवाहिनी जलप्रवाहाचे महात्म्य प्रेरणारूप ठरलें यांत शंकाच नाही.

इतिहासाच्या प्रदीर्घ कालावधीत वारणासी क्षेत्रावर परकी राजवटीच्या जुलमाचीं अभ्रें आलीं, पण गंगेच्या पात्रांत तेहतीस फूट उंचीच्या चबुतऱ्यावर उभा असलेला गोकर्ण मठ सुरक्षित राहिला... तरी या वास्तूवर अनेकांची वक्रदृष्टि अनेकदां गेली. श्रीव्यासतीर्थ शिष्य स्वामीजी विद्याभ्यासासाठीं येथें गेले असतां आपल्या गुरुवर्यांना त्यांनी पाठविलेला संदेश फारच बोलका आहे. 'या मठवास्तूवर अनेकांच्या वक्र नजरा फिरून फिरून जात असल्याने गुरुवर्यांनी जातीने त्या मठवास्तूंत अधूनमधून वास्तव्य केल्याशिवाय वास्तू सुरक्षित राहणार नाहीत.' या तगाद्यामुळेंच श्रीलक्ष्मीनारायण तीर्थ वारणासीला गेले व तेथील जीर्ण होऊ लागलेल्या मठवास्तूच्या जीर्णोध्दाराचे कार्य हाती घेतले. ते पूर्ण होण्यास आठ वर्षे लागली. जीर्णोद्धार चालू असतांना श्रीस्वामी वारणासी मुक्कामाला जात होते आणि कल्पवास काळांत प्रयागराजची यात्रा करीत. कल्पवासकाळ पूर्ण होतांच मुख्यालय असलेल्या श्रीपर्तगाळ मठीं रामनवमीच्या उत्सवासाठी परतण्याचा शिरस्ता असायचा. शेवटच्या यात्रेहून परतत असताना फाल्गुन वद्य ७ मी च्या दिवशीं, रामनवमीला सतरा दिवस असतांना, वार्धक्य व परिश्रमाने थकलेला देह त्यांनी नाशिक तीर्थी गोदावरी तटीं ठेवला. (शके

१६२३). त्या स्थानावर श्रीमठाने जमीन संपादन केलेली असून तेथेहि मठवास्तू उभारण्याचा श्रीविद्याधिराजतीर्थांचा मनोदय आहे.

आज पंचगंगा घाटावर जी जीर्णोध्दारित भव्य मठवासर उभी आहे, तिचा जीर्णोध्दार विद्यमान गुरूस्वामी श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर यांनी १९७५ सालीं करविला आणि तदनंतर जेव्हां त्यांनी तेथे वास्तव्य केलें तेव्हां मठानुयायी वर्गालाहि अनायासें वारणासी यात्रा करण्याची सुसंधि लाभली. श्रीस्वामीजींनी १९७९ सालीं वारणासी मठांत चातुर्मास व्रताचरण केलें. त्या प्रसंगीं वारणासीमधील अ. भा. महाराष्ट्र तीर्थ पुरोहित संघाने श्रीस्वामीजींना संस्कृत भाषेंतून जें मानपत्र अर्पण केलें तें अर्थपूर्ण व बोलकें आहे. (परिशिष्ट ७ पहा)

## प्रयागचा कल्पवास

गंगा, यमुना व सरस्वती या तीन लोकमातांचें संगम क्षेत्र तीर्थराज प्रयाग. भूतलावरील समस्त तीर्थांचा तो अधिपति. वेदकाळापासून या तीर्थक्षेत्राचें महात्म्य ऋषिमुनींनी पदोपदीं प्रतिपादलेलें वाचायला मिळतें.

भारतांत तीर्थक्षेत्रें अनेक असलीं तरी प्रयागचें महत्त्व वेगळें आहे. सारस्वत संप्रदायांची जननी मानली जाणारी वैदिक सरस्वती या ठिकाणीं गंगा तथा यमुनेच्या संगमांत गुप्तपणे सामील होत असल्याच्या मान्यतेमुळे सरस्वतीच्या लेकरांसाठी तीर्थराज प्रयाग हें पवित्रतम तीर्थस्थान बनलें आहे.

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या परंपरेंतील विद्यमान तेविसावे गुरुस्वामी परमपूज्य श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर यांनी श्रीमुखसंवत्सरांत सन (१९९३) मकर मासांत प्रयाग क्षेत्रीं कल्पवास व्रताचरण केलें तेव्हां समस्त सारस्वत समाजाचे लक्ष पुन्हा एकदां यां त्रिवेणी संगमाकडे वळलें.

यापूर्वी श्रीस्वामीजीनी चतुर्धाम (रामेश्वर, बद्रिकाश्रम, द्वारका व जगन्नाथपुरी) यात्रा केली तेव्हां सारस्वत समाज बांधवांना गुरुसमवेत तीर्थाटन करण्याची संधि प्राप्त झाली होती. स्वामीजीनी सप्तमोक्षपुरीची - अयोध्या, मथुरा, माया (हरिद्वार), काशी, कांची, अवंतिका (उज्जैन) व पुरी-दिग्विजयी यात्राही शिष्य-परिवारासह वैभवाने पूर्ण केली होती. किंबहुना गुरुपीठावर आल्यापासून श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी आसेतु-हिमाचल देशाटन करून देवदैवतांचें संदर्शन व विविध तीर्थस्थानांमध्यें शास्त्रसंमत पूजाअर्चना करून समाजाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. या सर्व यात्रा करतांना स्वामीजींचा एक कटाक्ष राहिलेला आहे आणि तो म्हणजे श्रीमठ परंपरेंतील पूर्वस्वामीजींनी केलेल्या सर्व यात्रा संदर्शनाची पुनरुक्ति आपणाकडून घडावी हा होय.

हिमालयांत बदरीकाश्रमांत चातुर्मास व्रताचरण करून नंतर अल्पावधींत तेथें मठवास्तू उभारलेल्या श्रीमद् विद्याधिराजतीर्थांनी प्रयागतीर्थांतील कल्पवासाची योजना कां आंखली? मठाच्या इतिहासाच्या विविध स्वामीजींनी आठदां कल्पवास व्रताचरण केलें होतें, ही गोष्टच विद्यमान स्वामीजींना प्रेरणा देती झाली यांत संशय नाही. पण त्या निमित्ताने तीर्थराज प्रयागची महति आणि कल्पवास व्रताची पुण्याई सारस्वत समाजाला विदित होऊं शकली.

त्रिवेणी संगमांतील पाण्याची पातळी पावसाळ्यात व्यापक प्रमाणांत वाढते आणि सारा परिसर जलमय होऊन जातो. प्रयाग क्षेत्रांत महापुरांचे पाणी अडविण्याचें काम एका दिशेने भक्कम पुरातन विशाल किल्ल्याचे तट करतात तर दुसरीकडे खास बांधण्यांत आलेले बांध. पावसाळा संपतांच पुराचें पाणी ओसरूं लागतें आणि समुद्रकिनारीं असतें तसें धवल रेतीचें वाळवंट तेवढें शिल्लक राहतें. या वाळवंटांतच कल्पवास व्रताचरण करावयाचें असतें.

धर्मशास्त्रानुसार मकरमासांत म्हणजे पौष पौर्णिमेपासून माघ पौणिमेपर्यंत कल्पवास व्रताचरण करावयाचें असतें. नदीच्या वाळवंटांत त्रिवेणी संगमालगत दृश्य-अदृश्य अशा तिन्ही पवित्र नद्यांच्या प्रवाहाचे नादनिनाद कानी पडतील अशा ठिकाणीं जप, तप, चिंतन-मनन करून भगवद् आराधनेंत एक महिना व्यतीत करावयाचा असतो. त्रिवेणी संगमांत नित्य स्नान अखंड आराधना करण्यासाठीं देशाच्या विविध भागांतून लक्षावधी साधुसंन्यासी, संतमहंत व श्रध्दाळू भाविक संगमतीरीं एकत्र येऊन त्या ठिकाणी पर्णकुटी बांधून महिनाभर व्रताचरण करीत असतात. अशा पद्धतीने व्यतीत केलेला मास हा कल्पसमान असतो, असे धर्मशास्त्र सांगतें. एक हजार चतुर्युगें म्हणजे ४३२ कोटी वर्षें, म्हणजेच एक कल्प होय. जीवन-मरणाच्या फेऱ्यांत प्रत्येक प्राण्याला पुनरपि जनन व पुनरपि मरणाचे फेरे ४३२ कोटी वर्षेपर्यन्त करावे लागतात व ते पूर्ण होईपर्यन्त त्या आत्म्याला सद्गति लाभत नसते. मात्र कल्पवास व्रतामुळें संचित होणाऱ्या पुण्याईच्या जोरावर जनन-मरणाचे हे फेरे टाळतां येतात. त्यावर्षीं प्रयागराज तीर्थस्थानी संगमाजवळ 'जीवोत्तम आश्रम' उभारण्यांत आला फेब्रुवारी दरम्यानचा काळ ध्यान, चिंतन व पूजाआराधनेंत व्यतीत केला. या निमित्ताने शेंकडो मठानुयायी भाविकांनीहि तीर्थयात्रा करून त्रिवेणी संगमांत स्नान करण्याची व त्या पवित्र ठिकाणी गुरुवर्यांचे आशिर्वाद प्राप्त करण्याची दुर्मिळ संधि साधली.

कल्पवास यात्रेसाठी परमपूज्य श्रीस्वामीजी श्रीक्षेत्र वारणासीहून प्रयागला गेले आणि तेथून नैमिषारण्य मार्गें वारणासीला परतले. नैमिषारण्य यात्रेची प्रेरणा ही पुरातन ग्रंथांतील त्या स्थळाची महति वाचूनच श्रीस्वामीजीना झाली. प्राचीन काळीं

तेथील गगनस्पर्शी विशाल वृक्षांच्या शीतल छायेंत बसून ऋषिमुनि व ज्ञानी तपस्वी तपःसाधना करायचे. ऋषिश्रेष्ठांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या या स्थानाचे दर्शन कल्पवासाहून वारणासीला परतते वेळीं श्रीस्वामीजींनी घेतलें. पण या यात्रेंत श्रीस्वामीजींनी श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ कक्षेंतील वारणासी येथील पुरातन मठवास्तूंत वास्तव्य केलें हें विशेष.

या सर्व यात्रा व कल्पवासाच्या कालावधींत पश्चिम भारतांत सर्वत्र विखुरलेल्या सारस्वतांनी श्रीस्वामीजींबरोबर ही तीर्थयात्रा घडते ही गोष्ट भाग्याची मानून ते विविध यात्रांमध्ये सामील झाले. कांहीं क्षेत्रांच्या, विशेषतः बदरीनाथ क्षेत्राच्या, यात्रेंत सहभागी होऊं इच्छिणाऱ्या भाविकांची संख्या इतकी प्रचंड होती कीं मुंबई ते बदरीनाथ व परत मुंबईपर्यंत त्या सर्वांचा प्रवास सुखकर व आनंददायी व्हावा यासाठीं खास वाहने, प्रत्येक वाहनांत जाणकार मार्गदर्शक यांची व्यवस्था तर करावी लागलीच, त्याशिवाय प्रवासांत व मुक्कामांत त्यांच्या आहार व निवासाचीहि व्यवस्था करावी लागली. ही सर्व व्यवस्था निर्दोष राहील याची दक्षता श्रीस्वामीजींनी जातीने घेतली. परिणामी श्रीस्वामीजींबद्दलच्या भक्ती व आदराच्या भावनेला कृतज्ञतेची जोड मिळूं शकली.

## गंगेने न्हाऊं घातलें !

कालयुक्त नाम संवत्सरीं कार्तिक शु. ११ शी (शनिवार दि. ११-११-७८) या दिवशीं श्रीस्वामी महाराज सकाळीं ८-०० वाजतां अयोध्या नगरांत शरयू नदीतीरावर जाऊन नदींत स्नान करून तीरावरील पंड्या लोकांकडून आपल्या हातून संकल्पपूर्वक गोपूजा व गोदान करवून घेतलें. नंतर स्वामीजींनी काळा राममंदिर वगैरे क्षेत्रदेव व देवमंदिरांचे संदर्शन करून दुपारीं १२-०० वाजतां तीन मोटारगाड्यांतून २०० कि.मी. अंतरावरील प्रयाग क्षेत्राकडे प्रयाण घेतलें. सायंकाळीं श्रीस्वारी प्रयाग क्षेत्रांतील त्रिवेणी संगमावर येऊन पोंचली त्यावेळीं सूर्यास्त झाला होता. मध्यम आकाराच्या (साधारण तीन टन माल भरण्याएवढ्या) तीन होड्या भाड्याने घेऊन स्वामीजी संगमाजवळ जात असतांना सर्वत्र काळोख झाला. वाराहि जोराचा सुटला होता. वाऱ्याच्या दाबामुळें नदीला समुद्रासारख्या लाटा येऊं लागल्या होत्या.

स्वामीजी अवगाहन स्नानाची (संगमांत उतरून पाण्यांत बुडून स्नान) तयारी करण्याकरितां उद्युक्त झाले असतां बरोबर असलेले नरसिंह भटजी यांनी स्वामीजींनी आतां स्नान करूं नये असें सुचविलें. वाऱ्याच्या दाबाने एका बाजूला लाटा उसळत होत्या तर दुसऱ्या बाजूने पाण्याला धारहि लागली होती. त्यामुळें साहजिकच नरसिंह भटजींना स्वामी संगमांत उतरणार याची भीति वाटली व ते स्वामीजींना आपल्या

स्नान करण्याच्या विचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करूं लागले. परंतु कार्तिक एकादशींचें स्नान संगमांत उतरून करण्याचा स्वामीजींचा निर्धार होता. नरसिंह भटजी स्वामीजींना विनवीतच होते. त्यावेळीं स्वामीजींनीं सांगितलें, "आम्ही आमच्या हाताला उत्तरीयाची गांठ मारतों आणि दुसरें टोंक तुमच्या हातांत देतों. तुम्ही तें घट्ट पकडून ठेवा. तुम्ही वस्त्र ओढल्यावर आम्ही सुखरूपपणें वर येऊं शकतों. त्यामुळें तुम्हाला घाबरण्याचे कारण नाहीं." पण नरसिंह भट यांचे समाधान झाले नाही. ते आपलें म्हणणें सोडिनात. स्वामीजीं बरोबर रंगप्पा पांडुरंग कामत हेहि होते. त्यांना मध्यस्थ धरून स्वामीजींना स्नानापासून परावृत्त करावें अशी विनंती नरसिंह भट यांनी केली.

होडिवाल्यांनीहि स्नान करण्यास कोणत्याच प्रकारचा धोका नसल्याची ग्वाही दिली. तीनहि होड्या तीन बाजूंना त्रिकोणाकृति उभ्या करून मध्यें सुरक्षित अशी कुंडासारखी जागा तयार करण्याची तयारी दर्शविली. तरी नरसिंह भटजी तयार होईनात.

"येथील देशकाळ परिस्थिती आमच्या ओळखीची नाहीं. तेव्हां स्वामीजीनी इथें स्नान करूं नयेच". असा ते हट्ट घेऊन बसले. स्वामीजी ऐकेनात हें पाहून त्यांचा कंठ भरून आला. रुध्द कंठाने ते स्वामीजींना म्हणाले, "स्नान करायचेंच असल्यास स्वामीजींनी होडींत पाटावर बसून स्नान करावें. होडीच्या कांठाजवळूनच संगमाचें पाणी वहात आहे. तें घेऊन स्वामीजींनी स्नान करावें. पाणी गंगेचें असल्याने त्या पाण्यानेंहि गंगास्नानच केल्या सारखें होईल."

स्वामीजींनी संगमांत उतरावें कीं न उतरावें असा वादविवाद चालत असतानाच गंगानदीची एक जोरदार लाट स्वामीजी बसलेल्या होडीच्या एका बाजूला आपटली आणि वर उसळून होडींत पाटावर बसलेल्या स्वामीजीना सचैल स्नान घडवून गेली.

स्वामीजी म्हणाले, "आतां आम्ही सत्तर टक्के भिजलों आहोंत, तेव्हां संगमांत उतरून पूर्ण स्नान करायलाच हवें."

"स्वामीजींना गंगेनेच स्नान घातलें तेव्हां स्वामीजींनी संगमांत स्नान करावें अशीच गंगामैयाचीहि इच्छा दिसते. तेव्हां आतां स्नानाला विरोध करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. स्वामीजींच्या इच्छेप्रमाणेंच होऊं द्या." असें रंगाप्पा पांडुरंग कामत यांनी म्हटले व नरसिंह भटजींनी मनांत कोणताहि विकल्प ठेवूं नये असा दिलासा दिला.

स्वामीजींनी संगमांत उतरून स्नान केलें. नंतर होडींत बसून थोडा वेळ जपानुष्ठान केलें व नंतर तीरावर येऊन मोटार-गाड्यांतून काशीला प्रयाण केलें.

श्री. रंगाप्पा कामत मागाहून उद्गारले 'आमच्या कडून स्वामीजींनी त्रिवेणी संगमांत उतरण्यास विरोध झाला, तरी गंगा स्वामीजींना स्नान घडवून गेली. स्वामीजींच्या

दृढनिश्चयाचा व तपोनिष्ठेचा हा चमत्कारच होय.'

## १०. गंडकी यात्रेची पार्श्वभूमि

अनादिकालापासून हिमालय हे भारतीय जनमानसाचे एक आकर्षण केंद्र बनून राहिलेले आहे. स्वर्गाला माथा टेकवून बसलेल्या या नगाधिराजाची हिमाच्छादित शिखरे भारतीयांसाठी अनाकलनीय व दुर्गम अशी तीर्थक्षेत्रें आहेत. अथांग नील आकाशांत बिहार करणारे कृष्णधवल मेघ त्या शिखराशी हितगुज करतात आणि तेथील देवभूमीचे बारकाईने अवलोकन करू शकतात याचा हेवा भारतीय जनमानसाला सदैव वाटत आला आणि त्यासाठी त्या कृष्णधवल मेघांमार्फत देवलोकांत संदेश पाठविण्याची कल्पना आपल्या लोककाव्यामध्ये रूढ होऊ शकली.

भारताच्या उत्तर सरहद्दीवर पहुडलेला हिमालय असला तरी आपल्या धर्म संस्कृतीचा व राष्ट्रीय अखंडत्वाचा तो रखवालदार आहे अशीही एक भावना भारतीय मानसांत दृढ झालेली आहे. त्यामुळे सागरतीरावर राहणाऱ्या जनसमुदायापासून थेट हिमालयाच्या पायथ्यापर्यंत देशांत सर्वत्र बिखुरलेल्या लोकांच्या मनात आयुष्यात एकदा तरी हिमालयाची यात्रा करावी अशी सुप्त-व्यक्त अभिलाषा घर करून राहिलेली आहे. जे भाग्यवान हिमालयाच्या उत्तुंग शिखरांचे गिर्यारोहण करून परतले त्यांनी येताना आपल्या यात्रेची कटु-मधुर संस्मरणे बरोबर आणली आणि तीं स्वकीय समाजाला कथन केलीं. या संस्मरणापासून प्रेरणा घेऊन नवे यात्रेकरू तयार झाले. ही प्रक्रिया अव्याहत चालू राहिली. हिमालयांत दुर्लभ अशी पुण्यक्षेत्रे आहेत आणि त्या प्रत्येक क्षेत्राशी निगडीत चित्तवेधक पौराणिक आणि लोककथांचे वलय आहे. या कथा यात्रेकरू जितक्या अवीट आवडीने सांगतात तितक्याच श्रध्देने इतर लोक त्या ऐकतात.

लोकमाता गंगा स्वर्गातून हिमालयांत अवतरली आणि तेथून ती प्रवाही बनून मैदानात उतरली आणि सागर संगमापर्यंतच्या आपल्या यात्रेत तिने नद्या-नाले व जलस्त्रोत आपल्या प्रवाहाशी एकरूप करवून अनेक तीर्थस्थाने निर्माण केली, आपल्या दीर्घ प्रवासांत वाटेतील परिसरांतील लोकजीवन समृद्ध केले, सारी भूमि सुजलाम् - सुफलाम् करून संस्कृतीच्या अभ्युदयाला हातभार लावला. याच गंगामैय्याच्या दर्शनाने व स्नानाने पापक्षालन होऊन मानवी जीवन सार्थकी लागते ही भावनाही बळावली आहे. जी गोष्ट गंगेची, तीच हिमालयातींल इतर नद्यांची. या लोकमातांचे दर्शन घेऊन त्यांच्या उगमापासून संगमापर्यंत आणि पुन्हा संगमापासून उगमापर्यंत परिक्रमा करण्याची प्रथाही अनंत वर्षे प्रचलित आहे. पण हिमालय केवळ लोकजीवनाचा

स्रोत असलेल्या नद्यांचे उगमस्थान नव्हे, तेथे इतरही अनेक पूजनीय, दर्शनीय अशा गोष्टी आहेत. मानस सरोवर, गौरीशंकर, कैलास, नीलकंठ आदि शिखरे; गंगोत्री-यमुनोत्री, केदार व बद्री सारखीं तीर्थस्नाने, शुद्ध हवेतील मानवी कोलाहलापासून मुक्त अशी तपस्या केंद्रे हे सारे हिमालयाचे वैभव आहे. हिमालय हे केवळ पर्यटन केंद्र नव्हे. तेथे पर्यटकांना आनंद मिळतोच; पण ती साधकांची तपोभूमि आहे. भारतीय अध्यात्म साधनेचे ते खुले विद्यापीठ आहे. म्हणूनच सर्व प्रकारचे साधक, उपासक आवर्जून हिमालयाची यात्रा करतात.

एके काळी हिमालयाची यात्रा फारच जिकिरीची व अवघड होती. समुद्र सपाटी पासून हजारो फूट उंचीवर असलेल्या हिमालयाच्या कुशीतील तीर्थस्थानांपर्यंत पायी यात्रा करावी लागे. अलिकडच्या काळांत वाहनांची साधने उपलब्ध झाल्याने व विशेष म्हणजे सर्व प्रमुख तीर्थस्थानामध्ये भोजन व निवासाची सोय उपलब्ध असल्याने हिमालयाची यात्रा आतां सुलभ बनली आहे.

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या अनेक स्वामीजींनी हिमालयातील तीर्थस्थानांच्या यात्रा केल्याच्या नोंदी मठाच्या दफ्तरांत सांपडतात. अलिकडेच श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजीनी बदरीनाथची यात्रा केली व तेथे चातुर्मास्यव्रताचे आचरणही केले. इतकेच नव्हे, तर बदरीनाथ येथे एक मठवास्तू बांधून ती समाजाला अर्पण केली. त्यामुळे मानवी गजबजापासून दूर असलेली ही तीर्थस्थाने यात्रेकरूसाठी आता खुली झालेली आहेत.

गेल्या काही शतकांमध्ये भारत वर्षाचा इतिहास बदलला आणि इतिहासा बरोबरच भूगोलही थोड्याफार प्रमाणात बदलत राहिला. मानवी संपर्क व संस्कृतीच्या पल्याड असलेले प्रदेश यात्रेकरूंच्या बर्दळीने गजबजू लागले तर दुसरीकडे राष्ट्रीय सरहद्दी हिमालयाच्या पाठीवर उभ्या झाल्या. त्यामुळे या आपल्या प्राचीन सांस्कृतिक व आध्यात्मिक ठेव्याचा काही भाग आपल्या आवाक्याबाहेर जाऊन बसला.

नेपाळ हे जगातील एकमेव हिंदू राष्ट्र. या नेपाळ देशाला भिडून सध्या चीनचा भाग बनलेल्या तिबेटचा प्रदेश आहे. नेपाळ व तिबेटच्या सरहद्दी हिमालयांत एकमेकांना भिडतात. या दोन देशांमध्ये विशाल निर्जन प्रदेश आहे, जो अनेक ठिकाणी खडकाळ, अनेक ठिकाणी रेताळ व बऱ्याच ठिकाणी हिमाच्छादित आहे. तेथवर जाण्यासाठी वाहनाची सोय नाही आणि सरकारी निर्बंधही आहेत. परंतु आपल्या प्राचीन ऋषिमुनींना हे क्षेत्र अवगत होते आणि त्यांनी तेथवर यात्रा करून तेथील तीर्थांची विलोभनीय वर्णने लिहून ठेवलेली वाचायला मिळतात.

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या परंपरेतील तिसरे यतिवर्य श्री जीवोत्तमतीर्थ हे शके १४४० ते शके १५१० (इ.स. १५१८ ते १५८८) या

कालावधीत श्रीगुरुपीठावर होते. त्यांची विद्वत्ता व पुण्याई अपूर्व होती, असा उल्लेख त्यांच्या समकालीन मठाधिशांनी व इतिहासकारांनी लिहून ठेवलेला वाचायला मिळतो. त्यांनी आपली तपसाधना करताना आसेतु-हिमालय अनेक यात्रा केल्या आणि आपलें जीवन अनुभवसंपन्न केलें. या यात्रांच्या जोडीला उपजत बुद्धि व ज्ञानसाधना यांच्या मदतीने त्यांनी आपल्या मनाची खोली, बुद्धीची विशालता आणि दृष्टीची व्यापकता विस्तारली. आजही मठाच्या नांवांत त्याचें नांव ठळकपणें अनुस्यूत झालेलें आपण पाहातों.

श्रीजीवोत्तमतीर्थ हे मूळ बसरूरचे. मठपरंपरेंतील दुसरे स्वामी श्रीवासुदेवतीर्थ यांनी माघ शुद्ध दशमी शके १४३९ रोजी त्यांना आश्रमदीक्षा दिली. श्रीजीवोत्तमतीर्थांची सारी कारकीर्द असामान्य व तेजस्वी होती. ते एक थोर तपस्वी म्हणून ओळखले जातात. त्यांनी आसेतु-हिमालय पायीं भ्रमण करून देशदर्शन व तीर्थयात्रा केल्या. श्रीमठाच्या स्वामीजींच्या आराध्य दैवताचें स्थान मिळविणारी श्रीवीरविठ्ठल प्रतिमा श्रीजीवोत्तमतीर्थांना शिला नदीच्या परिसरांतील यात्रेंत सांपडली होती. त्यांचा अध्यात्मविद्येतील अधिकार फार मोठा होता. ज्ञानसाधना व योगसाधना अचाट होती. आपण केलेल्या यात्रांचे वर्णन मोजक्या, समर्पक व सूचक शब्दांत श्रीजीवोत्तमतीर्थांनी लिहिले आहे. 'तीर्थावळ' या नांवाने प्रसिध्द असलेल्या काव्यांत गंडकी यात्रेबद्दल ते म्हणतातः

'तेथून जातां उत्तरप्रांता कुंटली शरीराची आशा।<br>
श्रीशैलपर्वत उल्लंघोनि जातां बहुत झालो खासावीस।<br>
विषाचा ल्हारी आंगि चडोनियां पडलों श्वासोश्वास।<br>
सुरम्ये गाईचे भेटले कल्प चंवरां तियेचें पुच्छ।<br>
तियेचे दुग्धें स्नान विट्ठला करितां बहुत मनिं उल्हास।<br>
मानस सरोवर पाहिलें तीर्थ तैसें निळे आकाश।<br>
स्वर्णाच्या खाणि चोहोंकडे अदृश्य क्रीडति हंस।<br>
परतोनि येतां गेलो उत्तर दिशे मुनि जनिं करितिल वास।<br>
अवघड देखिले गंडकेच्या आधिं करोनि बहुत प्रयास<br>
मुख्य क्षेत्र तीर्थ पाहिलें जें का शालिग्राम असंख्यात।<br>
देवांचा पर्वत पाहिलें विष्णुक्षेत्र दिसेल चाळीस कोस।<br>
धन्य झालों।।'

भारतांतील हिंदू लोक ज्या शाळीग्रामाची पूजा करतात ते शाळीग्राम केवळ गंडकी नदींत सापडतात हे विशेष. अर्थात त्या प्रदेशाची भौगोलिक रचना व तेथील वातावरण यामुळेच शाळीग्राम तयार होत असावेत.

# सृष्टीचें अद्‌भुत : शालिग्राम

शालिग्राम केवळ गंडकी पात्रांतच मिळतात. वरकरणी काळा दगड, त्यांत एक छिद्र, छिद्रांत किंवा बाहेर चक्रांची खूण, (शंख, गदा, पद्म, धनुष्य इत्यादि चिन्हेही आढळतात.) कित्येक चमकतात, कित्येक पारदर्शी असतात, कित्येकांवर पिवळी रेषा असते. शालिग्राम घरांत ठेवणें शुभकारक मानलें जातें. त्याला स्पर्शिलेलें जल तीर्थ होत असतें. शालिग्रामाची शास्त्रोक्त पूजा केली किंवा केवळ तुलसीदल अर्पण केलें तरी तो समस्त मनोकामना पूर्ण करतो, जन्मो-जन्मीच्या बन्धनातून मुक्ति देऊन परमानन्दाची मोक्षप्राप्ति करून देतो असें श्रद्धाळू लोक मानतात.

शालिग्राम हें महाविष्णूचें विग्रहरूप मांनलें जातें. शालग्राम अथवा सालिग्राम ही विशिष्ट प्रकारची शिळा होय. निसर्गाची ती एक अद्‌भूत देणगीच म्हणावी लागेल मानवनिर्मित विग्रहाहून ती श्रेष्ठ मानली जाते.

पुराणांत सालिग्रामाची महिमा विविध प्रकारे वर्णिली आहे.

वर सांगितल्याप्रमाणें शालग्राम किंवा सालिग्राम हे हिमालयांतून उतरून खालीं वाहणारी गंडकी हें शालिग्रामांचें जन्मस्थान. नारायणी, शालिग्रामी, हिरण्वती आणि हिरण्यवती या नांवांनी परम पवित्र ठरलेल्या या नदीचा उल्लेख महाभारताप्रमाणेच कित्येक इतर प्राचीन ग्रंथांमध्यें वाचायला मिळतो.

देवतातुल्य सालिग्रामांच्या उपलब्धिमुळें पुराणांनी गंडकी नदी परमपवित्र मानली आहे.

**तस्याम् भवा ये चाश्मनः चक्रचिन्हैरलंकृताः ।**
**ते साक्षाद् भगवन्तोहि स्व स्वरूपधराः तरा ॥**

अशी तिची ख्याती आहे. सालिग्राम हे गंडकी नदींत रूपित झालेली अमोनाईट शिळा म्हणवीत असून त्यांची ओळख त्यांच्यावरील चक्रानुसार केली जाते. अधिकांश सालिग्रामांमध्ये लांबट छिद्र असतें. त्याला 'वदन' असें म्हणतात. सालिग्रामाचा आकार आणि चक्रसंख्या यांवरून ते विष्णूच्या कोणत्या मूर्तीचें प्रतीक तें ठरविण्यांत येतें. सालिग्राम बहुतेक काळ्या रंगाचे असतात, पण त्यांत पांढरा, तपकिरी, आदि रंगही सांपडतात. रत्नगर्भासारखे सालिग्राम पारदर्शी असतात. वदन, चक्र नसलेले सालिग्रामहि आहेत. काली गंडकी (कृष्ण गंडकी) च्या मूलस्थानीं दामोदर कुण्ड नांवाचें तीर्थ (तलाव) आहे. गंडकी नदीच्या खालचा भाग मुक्तिनाथ क्षेत्र नांवाने प्रसिद्धि पावला आहे. आणि त्यालाच शालग्राम क्षेत्र असेही म्हणतात.

**शालग्रामशिलाम् दृष्ट्वा यांति पापानि देहिनाम् ।**
**सिंहं दृष्ट्वा यथा यान्ति वने मृगगणा भयात् ॥**

सिंहाला पाहतांच जसे जंगलांतील हरण पळून जातात, तसेच सालिग्राम शिलेच्या दर्शन मात्रे माणसांचीं समस्त पापें दूर होतात, असें शास्त्रवचन आहे.

## यात्रेमागील मनोभावना

परम पूज्य श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी हे श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ परंपरेतील तेविसावे यतिवर्य असून बाविसावे स्वामी श्रीमद् द्वारकानार्थतीर्थ यांनी त्यांना सन् १९६७ मध्ये संन्यासदीक्षा दिली. सन् १९७३ सालीं त्यांचे गुरुपीठारोहण झाल्यापासून त्यांनी सर्वच क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व कामगिरी बजावली आहे. समाजांत धर्म, अध्यात्म व स्नेह-सहकार्याची भावना वृध्दिंगत करीत असतानाच त्यांनी देवमंदिरे व मठवास्तूंचे जीर्णोध्दार केले. हिमालयांत बद्रीनाथ येथे चातुर्मास व्रताचरण करून तेथे एक मठवास्तू उभारली. प्रयागक्षेत्रीं कल्पवास केला. परंपरेतील गुरुवर्यांनी जी जी साधना, सेवा, तपश्चर्या केली ती आपल्या हातूनहि घडावी असा त्यांचा ध्यास राहिलेला होता. याच भावनेने ते गंडकी यात्रेला जाऊन आलेत. कोणतीहि साधन-सुविधा नसताना श्रीजीवोत्तमतीर्थांनी खडतर अशी गंडकी यात्रा केली तर आजच्या युगांत आपण ती सहज करूं शकूं अशी त्यांची मनोभावना होती. परंतु यात्रा ही पायीं झाली पाहिजे हा त्यांचा आग्रह होता.

पुराण साहित्यामध्ये मुक्तिनाथ व गंडकी प्रदेशाचे महत्त्व व महात्म्याचे रसाळ वर्णन वाचायला मिळते. श्री विष्णूची जी १०८ धामे आहेत, त्यातील एक मुक्तिनाथ येथे आहे असे मानले जाते. या मुक्तिनाथ धामी जो एखादी रात्र मुक्काम करील त्याचे सारे जीवन यथार्थ व कृतार्थ होते अशीही मान्यता आहे.

गंडकी नदीबद्दल विविध प्राचीन, अर्वाचीन ग्रंथांमध्ये उद्‌बोधक माहिती लिहिलेली वाचायला मिळते. नेपाळमध्ये पहाडाच्या खोऱ्यांतून तिचा उगम होतो. गंडकीच्या वेगवेगळ्या उगमांस सप्तगंडकी हें नांव देण्यात आलेलें आहे. ही धवलगिरी व गोसेनस्थान या पर्वतांमधून वाहते. यांतील मोठ्या प्रवाहास त्रिशूलगंगा हे नांव आहे. नेपाळांत या नदीत शाळीग्रामी अशी संज्ञा असून भारतांत ती नारायणी या नांवाने ओळखली जाते. ग्रीक भूगोलशास्त्रज्ञ हीस 'कोंडोचेटस्' असे म्हणत. महाकाव्यांतील सदानीरा ती हीच असे लासेन म्हणतो. या नदीच्या जलाशयांत शाळीग्राम सांपडतात. या गंडकी नदीचे महत्त्व व महात्म्य अनादि काळापासून लोक श्रध्देने प्रतिपादित आले आहेत. गंडकी नदीचे तीर्थ प्राशन केल्याने माणूस तत्काळ पापमुक्त होत असतो. साळग्रामी या नांवानेहि ती ओळखली जाते. बौद्ध साहित्यांत तिचा हिरण्यवती असा उल्लेख आहे. महाभारतांत श्रीकृष्ण, अर्जुन व भीम इंद्रप्रस्थाहून गिरीव्रजाला जात असतांना त्यांनी अग्नीची उत्पत्ती करणाऱ्या सर्व तीर्थांपासून बनलेली ही

गंडकी नदी पार केल्याचा उल्लेख आहे. गंडकी स्नानामुळे अश्वमेध यज्ञ केल्याचे फळ मिळते.

महाभारतकार महर्षी वेदव्यासांनी गंडकीची गणना पापहारक अशा सात पवित्र नद्यांमध्ये केलेली आहे. पुराणानुसार विष्णूच्या गालावरील घर्मबिंदूपासून ही नदी उगम पावली (१४४). हिच्या पात्रांत जे गोटे आढळतात त्यावर चक्र असते असे पद्मपुराण म्हणते. (१.३८-३०) आख्यायिका अशी आहे की, गंडकीने विष्णूला प्रसन्न करण्यासाठी दीर्घकाळ तपश्चर्या केली. विष्णु प्रसन्न झाल्यावर तिने वर मागितला, "तूं माझा पुत्र हो." विष्णूने तत्काळ तथास्तु म्हटले व सांगितले :

**'शाळग्रामशिलारूपी तव गर्भगतः सदा।**
**तिष्ठामि तव पुत्रत्वे भक्तानुग्रहकारणात्।**
**मत्सान्निध्यान्नदीनां त्वमतिश्रेष्ठा भविष्यसि।'**

- हे गंडकी, शाळीग्राम शिलेच्या रूपाने मी तुझ्या उदरांत पुत्र म्हणून सदैव राहीन व भक्तांवर अनुग्रह करीन. माझ्या सान्निध्यामुळें तूं सर्व नद्यांमध्ये अतिश्रेष्ठ होशील.

या पार्श्वभूमीवर श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी बहुधान्य संवत्सरात गंडकी यात्रा करण्याचा जो निर्णय घेतला त्याचे महत्त्व सहज लक्षांत येईल. चातुर्मासाचे आचरण कर्नाटकांत मंकी येथे करून श्री काशी क्षेत्री गंगातटी पंचगंगा घाटावरील स्वीय मठीं अल्प मुक्काम करून गंडकी यात्रेला प्रयाण केले. यात्रेहून परतल्यानंतर काशी येथे पंचगंगा घाटावर कल्पवास केला.

## ११. गंडकी यात्रेची वासरी

परमपूज्य श्रीविद्याधिराजतीर्थांचा उत्तर कन्नड जिल्ह्यांतील मंकी या सागर तीरावरील चिमुकल्या खेड्यांत चातुर्मास व्रताचरण निमित्त मुक्काम होता. गंडकी यात्रेची सारी रूपरेषा मंकी येथील नव्याने बांधण्यांत आलेल्या श्रीव्यंकटरमण देवस्थानांत निश्चित झाली. भाद्रपद पौर्णिमेला (शके १९२०) व्रतसमाप्ति व्हावयाची होती. गंडकी यात्रेचें वेळापत्रक पाळावयाचें झाल्यास दिग्विजय उत्त्सवाला फांटा देणे क्रमप्राप्त झालें होतें. मंकीकरांचा थोडासा विरस झाला. परंतु एका दिव्य यात्रेचा शुभारंभ आपल्या गांवांतून व्हावयाचा आहे; त्यांत अडथळे आणूं नयेत या भावनेने त्यांनी आनंदाने व्रतसमाप्तीचा औपचारिक समारंभ मध्यान्हापूर्वीच पूर्ण करून काढला. पूज्य श्रीस्वामीजींना सोमवार दि. ७ सप्टेंबर पर्यंत मुंबईला पोंचणे आवश्यक होतें.

एवढ्या दुर्गम यात्रेला निघण्यापूर्वी पर्तगाळी येथील मुख्य मठांत जाऊन श्रीरामदेवाला वंदन करावे आणि परंपरेतील गुरुवर्यांच्या वृन्दावनांचेंहि दर्शन घ्यावें असें श्रीस्वामीजींच्या मनाने घेतलें होतें. दुपारीं ठीक १२.०० वाजतां पूज्य श्रीस्वामीजींनी मंकी येथून प्रस्थान केलें.

मंकी ते पर्तगाळी प्रवास केवळ दोन तासांचा. पण पर्तगाळीला देशाच्या विविध भागांतून श्रीगुरुदर्शनासाठीं आलेल्या भाविकांची संख्या फार मोठी होती. त्यांना उद्देशून आशिर्वचनाचे दोन शब्द बोलणे भाग पडलें. मठानुयायी वर्गाच्या आग्रहावरून श्रीरामदेव सन्निधींत घृतज्योत प्रज्वलित करण्यांत आली. ('दीप जळे, विघ्न टळे' ही उक्ती अशीच श्रद्धेंतून रूढ झालेली असावी.) लगबगीने प्रार्थना करून व वृन्दावन दर्शन घेऊन पूज्य श्रीस्वामीजी दुपारीं ठीक ३.३० वाजतां बेळगांव मार्गें मुंबईला जायला निघाले. बेळगांव मधील भक्तगणांच्या भावनांची कदर करतां करतां दिवस मावळला. तरी रात्रीचा प्रवास करून मुंबईला पोंचणे आवश्यक होतें. मुंबई-वारणासी रेल्वे गाडी सुटण्याची वेळ सकाळीं ११-२५ ची होती.

**मुंबई : दि. ७ सप्टेंबर**

रात्रीची वेळ आणि ओबड-धोबड रस्ता या दोन्ही कारणांसाठीं गाडी मुंबईला पोंचेपर्यंत सकाळचे सव्वासात वाजले. श्रीद्वारकानाथ भवन मठांत येऊन विश्रांती घेण्याचीहि उसंत नव्हती. स्नान-पूजा आटोपून मुंबापुरस्थ अनुयायांच्या गांठीभेठी सुरू झाल्या. श्रीराम मंदिराच्या प्रांगणांत आयोजित निरोप समारंभांत भाग घेणें क्रमप्राप्त होतें. तेवढ्यांत वर्तमान आलें कीं सकालीं ११-२५ वाजतां सुटणार असलेली गाडी संध्यांकाळीं ६-०० वाजतां सुटेल. सर्वांना ती इष्टापत्तीच वाटली. थोड्याशा मोकळ्या वातावरणांत समाजवृंदाशीं वार्तालाप होऊं शकला. समाजाच्या विविध थरांतील आबालवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते. संध्याकाळीं ६-०० वाजतां वारणासीकडे प्रयाण झालें.

**वारणासी : दि. ८ सप्टेंबर**

मुंबईहून येणारी गाडी रात्रौ ११ वाजतां वारणासी येथें दाखल झाली. श्री स्वामीजी पंचगंगा घाटावरील स्वमठांत पोहोंचेपर्यंत मध्यरात्र उलटली.

**वारणासी : दि. ९ सप्टेंबर**

सकाळीं पंचगंगा घाटावरील स्नान आटोपून श्रीस्वामीजीनी नित्य महापूजादि कार्यें यथासांग पार पाडलीं. गोरखपूरला जाणारी गाडी दुपारीं २.३० वाजतां

वारणासीहूंन निघाली. गाडी सायंकाळीं गोरखपूरला पोहोंचल्यानंतर श्रीस्वामीजी गोरखनाथ मंदिरांत मुक्कामास दाखल झाले. मुंबईहून आलेल्या शिष्यपरिवारा शिवाय पोखरा येथील मणिपाल इस्पितळाचे प्रतिनिधि श्रीस्वामीजींना भेटून गेले.

**गोरखपुर : दि. १० सप्टेंबर**

संध्याकाळ पर्यंत पोखरा येथें पोंचायचें होतें. त्यासाठीं सुनोवली येथें भारत-नेपाळ सरहद्द ओलांडून नेपाळ हद्दींत प्रवेश करणें आवश्यक होतें. नेपाळमध्ये नोंदणी झालेल्या दोन मोटर गाड्या व एक व्हॅन या प्रवासासाठीं वापरली. सकाळीं ९-३० वाजतां गोरखपुरहून प्रस्थान केलें व ठीक ११-०० वाजतां नेपाळच्या हद्दींत प्रवेश केला. वाटेंत नारायणगड येथें नारायणी नदींत श्रीस्वामीजींनी स्नान केलें व सायंकाळी ४-०० च्या सुमारास नारायणगड येथून प्रस्थान करून रात्रौ ८-०० वाजतां पोखरा येथें आगमन झालें. मणिपाल इस्पितळानें बांधलेल्या निवासी बंगल्यामध्यें श्रीस्वामीजींनी मुक्काम केला.

**पोखरा : दि. ११ सप्टेंबर**

गंडकी यात्रेचा शुभारंभ येथूनच करावयाचा आहे.परंतु यात्रेला प्रस्थान करण्यापूर्वी मणिपाल येथील रामदास माधव पै आणि त्यांच्या बंधूंच्या विनंतीवरून मणिपाल समूहाच्या आवारांत इस्पितळाची पाहणी श्रीस्वामीनीं केली. या प्रसंगी विशेष स्वागत समारंभ आयोजित करण्यांत आला. सकाळीं १०-०० वाजतां तीन लहान मोटारगाड्या घेऊन दुपारीं १२-०० पर्यंत मालडुंगा येथें श्रीस्वामीजी व इतर यात्रेकरू दाखल झाले. गंडकी यात्रेसाठीं नेपाळ येथील सरकारमान्य प्रवास-यात्रा कंपनी मार्फत मजूर, सहाय्यक, ट्रेक गाईड आदि व्यवस्था करण्यांत आली होती. यात्रा कंपनीचीं माणसें मालडुंगा येथें श्रीस्वामीजींच्या पथकांत रीतसर सामील झाले. पदयात्रा सुरु करण्यापूर्वी

स्वामीजींनी काळी गंडकी नदींत स्नान केलें. त्यांच्या समवेत श्रीधर आचार्य, वेदव्यास आचार्य, नारायण हरिचंद्र पै (बेळगांव) विनायक भट्ट, उमेश प्रभु आणि मणिपाल इस्पितळाने उपलब्ध करून दिलेले नेपाळी साथीदार बलबीर बहादूर हे यात्रेकरूंच्या पथकांतील सहयात्री होते. पदयात्रा दुपारीं २.०० वाजतां सुरू झाली व सायंकाळीं ६-०० वाजेपर्यंत बेनी येथें पोंचली. गांवाच्या पलीकडे एक विशाल मैदान होतें. त्या मैदानावर सहा तंबू उभारण्यांत आले आणि पदयात्रेतील पहिला मुक्काम त्या ठिकाणीं झाला. भाद्रपद कृष्ण पक्षांतील ती षष्ठी होती. तेरा किलोमीटर अंतर सहा तासांत तुडविण्यांत आल्याने प्रवासाचा थोडा थकवा सर्वांनाच जाणवला.

**बेनीं : दि. १२ सप्टेंबर**

यात्रेचा पुढील टप्प्यास सकाळीं ७-०० वाजतां आरंभ करण्याचें ठरल्याने श्रीस्वामीजींनी पहाटे उठून नित्यपूजा उरकून घेतली होती. अधिकाधिक अंतर तुडवण्याचा संकल्प आजच्या दिवसांत करण्यांत आला होता. वाटेंत गलेश्वर बेगखोला येथें अल्प मुक्काम करण्यांत आला. त्या ठिकाणी पुलह ऋषींचा आश्रम आहे. स्वामीजींनी बेगखोला नदींत स्नान केलें आणि पदयात्रा पुढें चालू केली. सकाळीं ७-०० वाजतां निघालेलें पथक सायंकाळीं ५-३० वाजेपर्यंत मार्गाक्रमण करीतच होतें. साडे दहा तासांच्या अखंड प्रवासाचा थकवा जाणवत होता. पण हवा व उत्साह अनुकूल असल्याने तो सह्य झाला. ५-३० वाजतां मंडळी टिपलिंग येथे पोंचली. या गांवांत एक लहानसे हॉटेल आहे. या हॉटेलच्या खुल्या जागेंत तंबू उभारून रात्रीचा मुक्काम केला.

**टिपलिंग : दि. १३ सप्टेंबर**

सकाळीं ७-०० वाजतां टिपलिंगहून प्रयाण घेऊन रातोपानीमार्गे दुपारीं १२-३० वाजेपर्यंत मंडळी ततोपानीला पोंचली, ततोपानी येथील तप्तकुंडावर श्रीस्वामीजींनी प्रोक्षण स्नान केलें आणि मुक्कामांत येऊन दुपारीं ३-३० वाजतां देवपूजा उरकून घेतली.

**ततोपानी : दि. १४ सप्टेंबर**

स्नान-पूजा आटोपून श्रीस्वामीजी व त्यांचे सहयात्री सकाळीं ९-०० वाजतां ततोपानीहून दानूमार्गे निघाले. संध्याकाळीं ६-०० वाजेपर्यंत यात्रा अखंड चालू राहिली. पहरीपाले येथें पोंचेपर्यंत सूर्यास्ताची वेळ झाली होती. परंतु रात्रीच्या मुक्कामासाठीं अनुरूप जागा कुठें मिळेना. हळूहळू काळोख दाटूं लागला. जागा शोधण्यांत कालापव्यय होऊं नये या विचाराने सुमारें २०० मीटर उंचीच्या डोंगराच्या पायथ्याशीं तंबू उभारून रात्रीचा मुक्काम केला. खडतर मार्गाने नऊ तास पायीं चालून १५ किलोमीटर अंतर तुडविण्यांत आलें होतें.

**पहरीपाले : दि. १५ सप्टेंबर**

सकाळीं ७-३० वाजतां लेतेच्या दिशेने प्रयाण केलें. वाटेंत पुंजक्या पुंजक्याने (घासा, कायकु, घुमावु) अशी कांहीं खेडीं लागलीं. यात्रेकरूंनी सूर्याच्या उजेडांत अधिकाधिक अंतर तुडविण्याचा संकल्प करून सायंकाळीं ५ वाजेपर्यंत कालोपानी गांठलें. मूळ योजनेनुसार काळोपानी येथील शाळेच्या मैदानांत तंबू उभारायचे होते. परंतु त्या दिवशीं शाळेचें वार्षिक स्नेहसंमेलन असल्यामुळें नदीच्या काठावरील

माळरानातच तंबू उभारावे लागले.

**कालोपानी : दि. १६ सप्टेंबर**

कालोपानीहून सकाळीं ७ वाजतां निघून कोखेथाटी, थाक, लार्जुंग, कोबांग सारखे चिमुकले गांव पार करीत मंडळी दुपारीं ३ वाजतां तुपचे या गांवांत पोंचली. तेथें एक उघड्या मैदानावर तंबू उभारून विश्रांति घेतली.

**तुकचे : दि. १७ सप्टेंबर**

तुकचेहून सकाळीं ७ वाजतां निघून मार्फा मार्गे यात्रेकरू दुपारीं २-३० वाजतां जॉमसम नगरींत पोंचले. नेपाळी भाषेंत या नगरीला झुमझुम असे म्हणतात. पण ट्रॅक गाईडने जागा शोधण्यासाठीं विलंब लावला. एका हॉटेलच्या खुल्या जागेंत तंबू उभारावे लागले. जॉमसम हें या यात्रेंतील मुख्य केंद्र म्हणतां येईल. पुढच्या मार्गांत शहरी सुखसोयी व मानवी वस्ती कमी होत जाणार याची यात्रेकरूंना कल्पना होती. समुद्र सपाटी पासून २७०० मीटर उंचीवर जॉमसम नगरी आहे. या नगरींत एक विमानतळहि आहे. अनेक यात्रेकरू पोखरा ते जॉमसम दरम्यानचा प्रवास विमानांतून हि करीत असतात. तसा पोखरा पासून मुक्तिनाथ पर्यंत हेलिकॉप्टरने प्रवास करतां येतो. परंतु यात्रेचा खरा आनंद भोवतालच्या परिसराचें अवलोकन करीत निसर्गाच्या नित्य बदलणाऱ्या नव्या नव्या छटा पाहात घ्यावयाचा असतो.

**जॉमसम : दि. १८ सप्टेंबर**

जॉमसमहून सकाळीं ९-०० वाजतां यात्रा सुरू झाली. श्रीस्वामीजींनी काकाबेनी (कागबेनी) मार्गे प्रवास करण्याचें ठरविलें. वाटेत एकलाभट्टी हा गांव लागतो. भट्टी म्हणजे चूल (हॉटेल) गांवात एकमेव हॉटेल अलल्याने तें नांव देण्यांत आलें होतें. काकाबेनीला (कागबेनी) पोंचेपर्यंत दुपारचे १२-०० वाजले. (कागबेनी उंची २८१० मीटर) मुक्तिनाथहून येणारी कृष्णा गंडकी काली गंडकीला मिळते. कागबेनीहून मुक्तिनाथला जाणारा रस्ता आहे. परंतु दामोदर कुंडाहून परततानाच मुक्तिनाथला जाण्याचा संकल्प श्रीस्वामीजींनी केला होता. गंडकी संगमतीर्थांत श्रीस्वामीजींनी मंत्रस्नान केलें. या ठिकाणाहून हिमाच्छादित शिखरांचे विलोभनीय दर्शन घडलें.

**कागबेनी : दि. १९सप्टेंबर**

कागबेनीहून सकाळीं ७ वाजतां निघून चुकसांग येथें यात्रेकरू दुपारीं १-३० वाजतां पोचले. कृष्ण पक्षांतील रात्र नभ-घुमटाखालीं आकाशस्थ ग्रहतारकांचें अवलोकन करून शीतल हवेंत आनंदाने घालवली. दिवसभराचा थकवा प्रसन्न वातावरणामुळें

बराच हलका झाला. वाटेंत तांगबे (२९९० मीटर) गांव लागलें. चुकसांग येथें नरसिंह खोला (नदी) व गंडकी नदीचा संगम घडतो. त्याच संगमाच्या परिसरांत रात्रीचा मुक्काम केला.

**च्युकसांग : दि. २० सप्टेंबर**

सकाळीं ७ वाजतां बेना, यामदो मार्गे निघून चेले मार्गें दुपारीं १२-३० वाजतां समर या गांवांत यात्रेकरू पोंचले. भाद्रपद अमावास्येची रात्र समर येथें घालवली.

**समर : दि. २१ सप्टेंबर**

आश्विन शुक्ल १ : पूजाअर्चा आटोपून सकाळीं ७ वाजतां बेना, यामदोमार्गें गेलिंगच्या दिशेनें प्रस्थान. दुपारीं २-३० वाजतां गेलिंगला आगमन. साडेसात तासांची पदयात्रा करताना प्रदेशाची उंची व हवेतील गारवा वाढत आहे, मानव व वनस्पती सृष्टी विरळ होत चालली आहे याची जाणीव व्हायची.

**गेलिंग : दि. २२ सप्टेंबर**

आज सात तासांची पदयात्रा करून यात्रेकरू घामी मार्गें चरांग येथें पोंचले. यावेळीं दुपारचे दोन वाजले होते. तरी हवेंत कमालीचा गारवा होता. या परिसरांत विशेष कांहीं नसलें तरी आजचा दिवस येथेंच मुक्काम करून विश्रांती घेण्याचें ठरविण्यांत आलें.

**चरांग : . २३ सप्टेंबर**

चरांगहून सकाळीं ७ वाजतां निघालेली मंडळी दुपारीं १ वाजतां याराला पोंचली. वाटेंत चरंग नदी, शालीग्रामी (देवखोला) व गंडकी या तीन नद्यांचा सुरेख संगम झालेला पहायला मिळाला, स्वामीजींनी उत्साहाने या त्रिवेणी संगमांत मंत्रस्नान केलें. दुपारीं २ वाजतां यारा येथें पोंचल्यानंतर एका खुल्या शेतांत तंबू ठोकून रात्र घालविली.

**यारा : दि. २४ सप्टेंबर**

याराहून सकाळीं ७ वाजतां प्रयाण घेऊन गिमू या निर्जन खडकाळ प्रदेशांत यात्रेकरू ७ वाजतां पोचले. सतत १२ तासांच्या पदयात्रेमुळें सर्वांनाच थकवा जाणवत होता. याराहून नो मॅन्स लँड (NO MAN'S LAND) सुरू होतें.

**गिमू : दि. २५ सप्टेंबर**

यात्रेकरूंना थकवा जाणवला आणि एक दिवस विश्रांती घेण्याचें ठरवलें.

हवेंत विलक्षण गारवा होता. परंतु आतां दामोदर कुंड दृष्टिपथांत आलें याचा आनंद उत्साह वाढवत होता. तसें गिमू येथें पहाण्यासारखें कांहीं नाहीं. एक लहानसा निर्झर खळखळ वाहतो, एवढेंच या गांवचें वैभव. गिमूहून शनिवारीं २६ सप्टेंबर, आश्विन शुक्ल पंचमीच्या दिवशीं सकाळीं यात्रेस आरंभ झाला त्यावेळीं हवेत गारवा होता. पण पुढील मुक्काम दामोदर कुंड असल्याने उत्साहाला उधाण आलें होतें, सुदूर क्षितिजावर दामोदर हिमालाचें उत्तुंग शिखर पहारेकऱ्याप्रमाणें निश्चल उभें होतें. रस्ता सरळ नाहीं. गिमू हें ठिकाण समुद्र सपाटीपासून ५९१६ मीटर उंचीवर आहे. दामोदर कुंडापर्यंत जाताना गिमू पास नांवाची खिंड ओलांडावी लागते. ती समुद्रसपाटीपासून ५९१६ मीटर उंचीवर आहे. नंतर पुन्हा खालीं उतरून दामोदर कुंडापर्यंत जावें लागतें. दामोदर कुंड समुद्र सपाटीपासून ४६८० मीटर उंचीवर आहे.

आजचा दिवस यात्रेकरूंचा भाग्याचा दिवस होता तसाच कठोर कसोटीचाहि होता. सत्पुरुषांच्या सान्निध्यामुळें नैसर्गिक प्रकोपापासून देखील कसें रक्षण होऊं शकतें याचा अनुभव यात्रेकरूंनी घेतला आणि त्या अनुभवानंतर शब्द मुके झाले, मस्तकें झुकलीं, हृदयें भरून आलीं.

यात्रेतील सर्वांत उंच अशा गिमू खोला या ठिकाणीं स्नान करावें आणि यात्रेचा थकवा घालवावा या विचाराने स्वामीजी गंडकीच्या पात्रांत उतरले. चारहि दिशांनी टोळधाड यावी तसा प्रकार घडला. दुपारचें बारा वाजले होते. पण आकाशांत चौफेर कृष्णमेघ दाटून आले आणि बघतां बघतां पाऊस पडूं लागला.

या अनपेक्षित प्रकाराने यात्रेकरू विस्मित झाले. वाटाडे म्हणून आलेले अनुभवी शेर्पा देखील गलितगात्र झाले. गंडकीच्या पात्रांत स्नान करताना श्रीस्वामीजी हा प्रकार पहात होते. त्यांनी आकाशाकडे पाहिलें. निराशेची ग्लानी मनांत दाटून आली. पुढें काय असा विचार मनांत येतो न येतो तेवढ्यांत साबुदाण्यासारखे हिमकण आकाशांतून झडले. भगवंताच्या आशीर्वादरूपी मंत्राक्षताच जणूं! कल्पना मनांत येतांच नवा उत्साह आला.

एका शेर्पाने इशारा दिला, "अजून बाराशें मीटर उंची चढावयाची आहे. दहा बारा किलोमीटरचें तें अंतर या वादळी हवेंत चढून जाणे सोपी गोष्ट नव्हे."

"हा दैवी अपशकून आहे!" असेहि उद्गार त्याने काढले. अजून सहा-आठ तास पदयात्रा करण्याची शक्ति कुणातच राहिली नाहीं. सूर्य मावळतीला झुकूं लागतांच हिमवृष्टि वाढेल आणि काळोख अधिक गडद होईल. दलदलीच्या या जमिनींत खेचरें देखील पुढें जाऊं शकणार नाहींत, आणि दामोदर कुंडापर्यंत पाण्याचा थेंबहि मिळणार नाहीं. यास्तव दामोदर कुंडापर्यंत जाण्याचा बेत रहित करावा आणि

माघारीं परतून गिमू येथें तळ ठोकावा.

अनुभवी वाटाड्यांचा हा सल्ला यात्रेकरूंना निराश करून गेला. यात्रेंत स्वामीजी मौनव्रताचें पालन करीत. चालतांना बोलूं नये. प्रसन्न परिसराचें अवलोकन करताना हृदयस्थ संगीताचे सूर तेवढे कानीं यावे असें त्यांना वाटत होतें. पण काय चाललें आहें हें समजलें होतें. सहयात्री स्वामीजींजवळ आले आणि त्यांच्या मनांतील विचार स्वामीजींनी तत्क्षणीं ओळखले. मागचा पुढचा विचार न करतां श्रीस्वामीजींनी दामोदर कुंडाच्या दिशेने हात केला आणि प्रत्यक्ष पावलेंहि उचललीं. कांहीसे हताश झालेले सहयात्री व मजूर स्वामीजीं मागोमाग जाऊं लागले.

एक वेगळी शक्ति कार्यरत झाल्याचें जाणवत होतें. नकळतां पथकाचे नेतृत्व स्वामीजींनी स्वतःकडे घेतलें. चढण चढत चढत साडेतीन वाजतां गिमू खिंड पार केली. ढगांआड गेलेल्या सूर्य नारायणाने लख्ख प्रभा आसमंतांत फैलावून यतिराजांचें स्वागत केलें.

आतां पुढचा मार्ग सुकर आहे याची खात्री सर्वांना पटली. पथकाच्या अग्रभागीं स्वामीजी, पाठोपाठ सहयात्री आणि त्यांच्यामागें खेचर व मजूर मार्गक्रमण करूं लागले.

गिमू खिंड पार करीपर्यंत दुपारचे ३-३० वाजले. एकाएकीं आकाशांतून पुष्पवृष्टी व्हावी असा आभास निर्माण झाला. आकाशांतून कुंदिच्या फुलांची वृष्टी होऊं लागली. बर्फापासून बनलेलीं शुभ्र धवल नाजुक फुलें स्वामीजींच्या अंगावर पडताना दिसत आणि लगेच लुप्त होत. तो हिमपातच होता. परंतु उत्साह वाढविणारा होता. श्रीविष्णूच्या पवित्रतम क्षेत्रांत धीरगंभीर पावलें उचलत येणाऱ्या यतिश्रेष्ठांचें अज्ञात शक्तीकडून स्वागत होत होतें. हा सारा प्रकार पाहून सहयात्री दिग्मूढ झाले. मागाहून श्रीस्वामीजी म्हणाले, "ती निसर्गाची लीला असो किंवा दैवी चमत्कार असो, आपणास तो आशिर्वादाचाच एक प्रकार वाटला."

रात्रीच्या वेळीं दामोदर कुंडाजवळ जाण्यांत अर्थ नव्हता. एक किलोमीटर अंतरावर असलेलें कुंड दृष्टिपंथांत आलें होतें. वाटेंत निर्झर वाहात होते आणि आतां सूर्यास्त होऊन चुकला होता. याच ठिकाणीं तंबू उभारले व सर्वांनी विश्रांती घेतली.

**दामोदर कुंड : रविवार, दि. २७ सप्टेंबर**

आजचा दिवस उजाडला तो कृष्ण मेघांच्या रुद्र नृत्याने. पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास एकाएकीं पाऊस पडूं लागला, मोठ्या प्रमाणांत हिमवृष्टि झाली. शेर्पाने तंबू उखडून परतीचा प्रवास सुरू करण्याचा आदेश दिला. या वातावरणांत तेथें

थांबणे धोक्याचें आहे असें सांगून त्याने स्वामीजींना साळसूद सल्ला दिला, "कुणाला तरी पाठवून दामोदर कुंडांतून कुंभभर पाणी आणून घेऊं या, स्वामीजींनी येथेंच स्नान करून परतीच्या प्रवासास लागावें."

श्रीस्वामीजी उद्विग्न झाले. इतका खडतर प्रवास करून येथवर आल्यानंतर हात हलवीत परत जायचें यांत पुरुषार्थ तो क़ोणता? पण स्वामीजींना धीर देणारा एकहि साथीदार नव्हता.

श्रीस्वामीजींची मनःस्थिति श्रीधर आचार्य यांनी ओळखली. खचलेला धीर पुन्हा प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने उसनें अवसान आणीत ते उद्‌गारले, "चोय, सूर्य उदेलो!"

सर्वांच्या नजरा पूर्व क्षितिजाकडे वळल्या. सर्वत्र कृष्णमेघ आणि आकाशाला लागलेली अखंड गळती. सूर्यकिरण देखील दिसत नव्हता. परंतु श्रीधर आचार्य यांच्या उद्‌गारांत जिद्द होती. आकाशस्थ कृष्णमेघ पांगळे नाहींत. पण मनांत दाटून आलेलीं निराशेचीं अभ्रें दूर झालीं. श्रीस्वामीजींना पण उत्साह आला. ते एकदम उठून उभे राहिले. म्हणाले, "ज्यांना शेर्पां समवेत खालीं जायचें असेल त्यांनी अवश्य जावें. आमच्याबरोबर श्रीधर आचार्य व नारायण पै पुरेत." असें सागून स्वामीजी पुढें निघाले. आठ वाजतां दामोदर कुंडाला पोंचले. तेथें पोंचतांच श्रीधर आचार्य यांनी श्रींच्या सल्ल्यानुसार कुंडामध्यें उतरून स्नान करून श्रीमठाराध्य दैवतांच्या देव्हाऱ्याच्या पेटीचें लोकरी वस्त्र सोडवून पेटी अलगदपणे दगडाच्या आसनावर ठेवली. नंतर स्वामीजींनी संकल्पपूर्वक स्नान करून देवाची पेटी उघडून प्रत्येक मूर्तीला कुंडांत स्नान घातलें. दुसऱ्या कुंडांत स्नानाला निघत असताना घोड्यावरून वेदव्यास आचार्य तिथें पोंचले. दुसऱ्या दामोदर कुंडामध्ये स्नान करून व देवांना अभिषेक करून तिसऱ्या चक्रतीर्थ कुंडांत स्वामीजींनी स्नान करून देवमूर्तींना अभिषेक केला. तिन्ही कुंडांमध्ये स्नान व दंडोदक देणे असताना श्रीधर आचार्य यांना परंपरेंतील सर्व पूर्व गुरुवर्यांचे स्तोत्र म्हणवीत गुरुसंस्मरण करविलें. तेथून परती प्रयाणाला निघताना १०-३० वाजले. ११-३० वाजतां श्रीस्वामी छावणींत पोंहोंचले. आचार्यांनी बजावलेले असतानाहि शेर्पा तेथूनच तंबू उखडून घेऊन दोन तास आधींच खालीं गेले होते. परतीचा प्रवास सुरू झाला. वेदव्यास आचार्य घोड्यावरून निघाले होते. ते पांच वाजतांच तंबूकडे पोचले. वाटेंत पावसामुळें दाटलेला चिखल तुडवत खालीं येत असताना गिमू खोला येथें अंधार पसरला. गिमू खोला हें अत्युच्च ठिकाण. तेथें काळोख मी म्हणत होता. श्रीस्वामीजी अर्धा तास तेथें थांबले. त्यांनी भिजलेले कपडे पिळून व ते परत तसेच अंगावर चढवून टॉर्चच्या उजेडांत चांचपडत पावलें उचलीत रात्रौ दीड वाजतां खालीं येऊन पोंचले. दिवसभर चालून सगळे

दमले होते. विश्रांती हवी होती. डोंगराळ जमिनीवरच ते झोंपले. परंतु झोपी गेलेल्याला जादा ऑक्सिजनची गरज असते, तेव्हां इथें झोपूं नये. जागेंत रहाणें इष्ट आहे असें बलबीर सिंग या नेपाळच्या एका सहयात्रिकानें सांगितलें. तरीहि दमलेल्या मंडळीने तासभर झोपून घेतलें.

रात्रीं साडेतीनच्या सुमारास आधींच गिमू येथें येऊन राहिलेले सहयात्रेकरू दोन नेपाळी मजुरांना घेऊन आले. आतां पाऊस थांबला होता. पहाटे चार वाजतांच ब्राह्म मुहूर्तावर परतीचा पुढील प्रवास सुरू झाला. तब्बल दीड-दोन तास अंधारांतून प्रकाशाकडे ही पदयात्रा चालली. मुक्कामाप्रत पोंचतांच पूर्वेला सूर्यबिंब उगवलें. घड्याळांत सहा वाजले होते. तब्बल साडेबावीस तास अखंड पदयात्रा आणि तीहि अन्न वा पाण्याचें सेवन केल्याशिवाय स्वामीजींना घडली होती. परंतु यात्रा पूर्तीची धन्यता या साऱ्या गोष्टींचा विसर पाडून गेली.

## परतीचा प्रवास

आल्या वाटेने परतायचें होतें. या प्रवासांत नवें कांही घडण्यासारखें नव्हतें. निर्जन, खडकाळ अशा या हिमाच्छादित प्रदेशांत अखंड सान्निध्य मिळते ते गंडकी नदीचें आणि दामोदर हिमालाचें. लहानमोठे नाले, झुळझुळ वाहणारे निर्झर, अचानक दोन वा अधिक नद्यांनी एकमेकांत आत्मविलोपन केल्याचे सुंदर देखावे. एरवीं प्रदेश निर्जन. पशुपक्षीदेखील कुठेंच आढळत नाहींत. शांततेचा हा असला निरव अनुभव सहसा दुसरीकडे येत नसतो. श्रीस्वामीजींना दोन दिवस उपवास घडला. पण प्रवास चालू राहिला. शरीर थकलें तरी मनांतील उत्साहाला उधाण आलेलें दिसलें.

**गिमू : दि. २८ सप्टेंबर**

वातावरणांत कडाक्याची थंडी. सकाळीं ६.३० वाजतां येथें आगमन झालें होतें. दोन तास विश्रांती घेतली. नंतर स्नान व महापूजा. परतीच्या प्रवासास प्रयाण घेईपर्यंत मध्यान्ह झाली. साडेतीन तासांत सहा किलोमीटर अंतर कापतां आलें. डोंगराच्या पायथ्याकडे जमिनीवर कांटेरी झुडुपें होतीं. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे या ठिकाणीं पाणी नाहीं. जवळपास पांच किलोमीटरच्या अंतरांत पाणी मिळण्याची शक्यता नाहीं. तिथेंच तंबू ठोकावे लागले. डोंगराच्या पायथ्याशीं जमीन ओलसर होती. तेथें एक लहानसा खड्डा खोदला. जमिनीखालचें पाणी पाझरत खड्डयांत जमा झालें. रंगाने पिवळसर. निथळवून चांगलें गरम केलें आणि त्या पाण्याने फराळाची व्यवस्था करून घेतली.

**गिमू : दि. २९ सप्टेंबर**

स्नानादिक आटोपून सकाळीं ७ वाजतां प्रयाण घेतलें आणि तीन तासांच्या खडतर पदयात्रेनंतर यात्रेकरू याराला पोंचले. परतीचा प्रवास सुखकर नव्हता. दामोदर कुंडाची यात्रा सफल झाल्याचा आनंद मात्र दिलासा देत होता. यारापासून निघून पुन्हा याराला पोंचण्यास सहा दिवस लागले होते. त्या जनरहित यात्रेंत विशेष कांहीं घडलें नाहीं.

**यारा : दि. ३० सप्टेंबर**

आतां लक्ष मुक्तिनाथकडे होतें. दामोदर कुंडाच्या प्रवासांत प्रथम मुक्तिनाथाला जाण्याचा मोह स्वामीजींनी टाळला होता. हवामान कोणत्याहि क्षणीं बदलतें याची त्यांना कल्पना होती. म्हणून मुक्तिनाथला जाताना तेतांगपर्यंत परतीचा प्रवास करावा लागेल. तेतांगहून मुक्तिनाथला जायचें अणि पुन्हा मुक्तिनाथहून जॉमसमला यायचें अशी योजना आंखलेली होती.

**तेतांग : दि. ३ ऑक्टोबर**

दि. ३० सप्टेंबर रोजीं यारा ते चरंग पदयात्रा झाली. सकाळीं ७ ते ११-३० पर्यंत यात्रेकरू पायीं चालले. ३० सप्टेंबर रोजीं चरांग येथें मुक्काम केला आणि १ ऑक्टोबर रोजीं गेलींगला पोंचले. चरांग ते गेलींग साडेसहा तासांचा प्रवास होता. २ ऑक्टोबर रोजीं एकादशी. त्या दिवशीं तब्बल सात तासांचा प्रवास झाला. गेलींगहून मंडळी समरला आली. आणि समरहून चुंकसांग मार्गें पावणेतीन तासांचा प्रवास करून तेतांगला पोंचली. येथून मुक्तिनाथचा प्रवास आठ तासांचा असल्याने रात्रीसाठीं तेथेंच तळ ठोकला.

**मुक्तिनाथ : रविवार दि. ४ ऑक्टोबर, (आश्विन त्रयोदशी)**

सकाळीं पावणेसात वाजतां मंडळी तेतांगहून निघाली आणि ठीक दुपारीं तीन वाजतां मुक्तिनाथला पोहोंचली. हें श्रीविष्णूचें पवित्र धाम मानलें जातें. समुद्र सपाटीपासून ३८०० मीटर उंचीवरील या तीर्थस्थानांत पोंचताना वाटेंत रस्ता अनेक ठिकाणीं अत्यंत धोकादायक होता. मुक्तिनाथ येथें पहाडाच्या उदरांतून जलप्रवाह निघतो. तें दृश्य मनोवेधक आहे. १०८ गोमुखींतून वाहणारा गंडकीचा तो प्रवाह आहे. उत्तुंग शालिग्राम पर्वताचें येथून दर्शन घडतें. पहाडांतून उगम पावणाऱ्या या नदीला कृष्णा गंडकी असें नांव आहे. श्रीस्वामीजींनी श्रीमुक्तिनारायण देवालयांत जाऊन देवपूजा केली. गंडकी नदी प्रवाहांत मंत्रस्नान करून ज्वालामाई देवालयाचेहि संदर्शन केलें. येथील पाण्यामध्यें गंधक असावा. त्यामुळें अधूनमधून येथील नदी

प्रवाहावर ज्वाला भडकून उठून दीपज्योत पेटत असल्याचा भास होतो. भाविक लोंक तो चमत्कार मानतात.

चुसांग ते ज्या दरम्यान असाच एक खाऱ्या पाण्याचा निर्झर लागतो. तोहि एक चमत्कार मानला जातो. बहुधा नदीच्या उगमाजवळ सैंधवाचे सांठे असावेत.

**जॉमसम : दि.५ ऑक्टोबर**

पौर्णिमेच्या दिवशीं मुक्तिनाथहून स्वामीजींनी प्रयाण केलें. तब्बल साडेसहा तासांची पदयात्रा करून एकला भट्टीमार्गे दुपारीं अडीच वाजतां मंडळी जॉमसमला पोंचली.

**पोखरा : दि. १० ऑक्टोबर**

जॉमसम, लार्जुंग, कोपचेपानी, ततोपानीस गलेसर मार्गें प्रवास करीत पांचव्या दिवशीं यात्रेकरू पोखराला परतले. वाटेंत एक नवाच अनुभव आला. गलेसर येथें डोंगरकडा कोसळल्याने जाताना खुला असलेला रस्ता बंद झाला होता. त्यामुळे वेड्यावाकड्या डोंगरवाटा तुडवून चार तास अधिक प्रवास करावा लागला. आज सकाळीं ७ वाजतां शिवमंदिर, राधाकृष्ण मंदीर व शक्तिमंदिरांत देवदर्शन करून सकाळीं ८ वाजतां यात्रेकरू बेनीला पोंचले. या ठिकाणीं स्वामीजींच्या स्वागतासाठीं वै. रंगप्पा पांडुरंग कामत यांचे सुपुत्र रामचंद्र व लक्ष्मण, त्याच प्रमाणे अमेंबळ शिवानंद कामत वाहने घेऊन आले होतें. दि. ११ ऑक्टोबर रोजीं सकाळीं साडेनऊ वाजतां बेनीहून निघून दुपारीं १ वाजतां पोखरा येथें आगमन झालें. त्याच दिवशीं नेपाळ सरहद्द ओलांडून रात्री साडेआठ वाजतां गोरखनाथ गांठलें व दि. १२ ऑक्टोबर या दिवशीं दुपारपर्यंत स्वामीजी वारणासी येथील पंचगंगा घाटावरील स्वीय मठांत दाखल झाले.

## १२. गंडकी यात्रेचें प्रयोजन व अनुभव

### (श्रीविद्याधिराजतीर्थ यांची एक मुलाखत)

***प्रश्न : तीर्थयात्रेचें प्रयोजन काय असतें?***

**उत्तर :** तीर्थयात्रा हा संन्याशाचा धर्मच असतो. तीर्थयात्रेमुळे इतिहास, भूगोल, लोकजीवन व संस्कृतीची उत्तम ओळख होत असते. मानवी मनाचे नमुने अभ्यासून घेण्याचें तें एक चांगलें साधन असतें. म्हणून अनादिकालापासून या भारत वर्षांत नद्यांची परिक्रमा करण्याची प्रथा चालू आहे.

भारताचा सांस्कृतिक इतिहास तपासून पाहिला तर असे दिसून येईल कीं

एकेकाळीं या देशांत शेकडों राजे होते. राजाराजांमध्यें लढाया होत. हा खंडतुल्य देश आहे. प्राचीन काळीं भारताचा विस्तार मानस सरोवर पासून महासागरापर्यंत होता. पश्चिमेला द्वारका आणि पूर्वेला थेट ब्रह्मदेशापर्यंत हा देश अखंड भूखंड होता. आजहि तो तसा आहे. परंतु राजकीय सीमारेषा अधिक प्रभावी ठरल्यापासून भारताची केलें असतां सूर्याचें तेज व प्रकाश शरिराच्या अणुरेणूंत झिरपत जात असल्याचा अनुभव येतो. सारा देह पिकल्या बोंडांतून सुटलेल्या कापसासारखा हलका होऊन जातो. मनांतील विचार-विकार गळून पडतात आणि एक अद्‌भुत अनुभव येऊं लागतो, त्याचें वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतील, आणि वर्णन केले तरी त्या अनुभवाची प्रचीति दुसऱ्याला येणें शक्य नाहीं.

***प्रश्न : चक्रतीर्थाचें विशेष महत्त्व कोणतें?***

**उत्तर :** चक्रतीर्थांत स्नान करतांना आमच्या बाह्य मनातील स्पंदनें बंद पडलीं. अंतर्मनाचे-हृदयवीणेचे झंकार त्यावेळीं सुरू झाले. तें स्वर्गीचे संगीत, भगवान् विष्णूच्या सांनिध्याचा, साक्षात्कार देणारें ठरलें. दामोदर कुंड हें भूतलावरील विष्णूचें एक स्थान आहे हें पुराणांत वाचलें होतें. पद्मपुराणांत भगवान् विष्णूनें गंडकी नदीला शालिग्राम शिलेच्या रूपाने आपण तिच्या उदरांत पुत्र बनून सदैव राहीन व भक्तांवर अनुग्रह करीन असा वर दिला होता. त्या पुराण कथेची सार्थकता आम्ही त्याक्षणीं अनुभवली.

एरवीं दामोदर कुंड हें एक लहानसें कुंड आहे. जेथें वनस्पती नाहीं, वृक्ष किंवा झाडें-झुडपें नाहींत. जीवजंतू नाहीं. फक्त खुरटें गवत तेवढें उगवलेलें दिसतें. अशा ह्या कुंडामध्यें दैवी तत्त्व आहे, तें सामान्य स्थितींत माणसाला दिसणार नाहीं. अंतर्मनाच्या चक्षूंद्वारें जेव्हां या परिसराचें दर्शन घडतें, तेव्हां देहबंधन गळून पडून आपलें मन त्या भगवान् तत्त्वाशीं एकरूप होत असतें.

***प्रश्न : तीर्थक्षेत्रांबद्दल आज लोकांचीं मने बदलूं लागलीं आहेत. त्याबद्दल काय वाटतें?***

**उत्तर :** माहीत आहे, आपल्या पुराणांमध्यें, धर्मशास्त्रामध्यें तीर्थक्षेत्रांचें महत्त्व व महात्म्य वर्णन करणाऱ्या अनेक कथा-आख्यायिका आहेत. सुधारलेल्या जगाला त्या कपोल-कल्पित गोष्टी वाटतात. पाप-पुण्याच्या संकल्पना देखील आज जगानें बदलून टाकल्या आहेत. पुढें जायचें झाल्यास धर्म, अध्यात्म, पुराणें, वेद व उपनिषदें सारीं बाजूला सारून विज्ञानाची कास धरावी असा विचार पुढें येत आहे. दुर्दैवाने आपल्याकडील विचारवंतही त्या विचारांच्या आहारीं जाऊं लागले आहेत. जीवनाची यथार्थता ज्यांना उमगली नाहीं, त्याची ही गोष्ट. सुख म्हणजे विलास व भोग असें मानून भौतिक समृध्दीच्या मृगजलामागें धावणारे हे अविचारी आत्मे आहेत. युरोप-

अमेरिकेमध्ये भौतिक समृध्दी आली. विधायक व संहारक अशी वैज्ञानिक शक्ति त्या देशांनी प्राप्त केली. आकाशस्थ ग्रहांवर आरोहण करण्याची कला शोधून काढली. पण या साऱ्या प्रयत्नांत त्या देशांतील लोक मन:शांती गमावून बसले. सुखाची झोप कशी असते हें झोपेच्या गोळ्या घेणाऱ्याला कसें कळणार? व्यथा-वेदनांवर मात कशी करावी हें अंमली द्रव्यांच्या नशेंत बुडुन रहाणाऱ्यांना कोण सांगणार? मानवतेच्या, धर्म व धार्मिकतेच्या विनाशाचा हा मार्ग आहे. या भौतिकतेमुळें कुटुंबसंस्था कोलमडून पडली. नात्यागोत्याचें मांगल्य भंगलें. फुटलेली कांच सांधणे कठीण असते.

***प्रश्न : भारतीय समाजाची दृष्टि साफ करण्यासाठी काय करावे लागते?***

**उत्तर :** भारतीय समाज-मानसाच्या दृष्टीची कांच थोडीशी मलीन झाली तरी अजून अभंग आहे. कारण वाल्मिकी-व्यासांचे संस्कार, वेद-उपनिषदें व पुराणांची शिकवण भारतीय माणसाला पोषण देत आहे.

सुखाची वाट त्यागांतून जाते ही आपल्या धर्माची शिकवण आहे. परमात्म्याच्या नांवानें त्याग करावा- "तेन त्यक्तेन भूंजीथा:" हें उपनिषदांचें वचन आहे.

***प्रश्न : एक कष्टप्रद यात्रा यशस्वी झाली याचें समाधान पू. श्री स्वामीजींना मिळालें काय?***

**उत्तर :** आम्ही पुराणें वाचलीं, धर्मशास्त्राचें अध्ययन केलें आणि जें वाचलें-जाणलें तें पडताळूनहि पाहिलें, इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान, अध्यात्म यांचा इतका नितांत सुमेळ इतरत्र सांपडणार नाहीं. पुराणांत नमूद केलेल्या बहुतेक तीर्थांची आम्ही यात्रा केली. ती धन्यता आगळी - वेगळी..परंतु ज्या दामोदर कुंडाचा, गंडकी नद्यांचा शालिग्राम क्षेत्राचा गौरवपूर्ण उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्यें आढळला, तें क्षेत्र कुठें आहे, तेथें कसें जायचें, हे प्रश्न मनांत घोळत राहिले. नित्य पूजापाठ, स्वाध्याय, लोकसंपर्क, धार्मिक योग, हवनें आदि उपक्रम चालू असतांनाच आणि परंपरागत संन्यस्त धर्माचें पालन करतांना दामोदर कुंडाची जिज्ञासा भागविण्यासाठीं शोध-संशोधन अखंड चालू राहिलें. अचानक एके दिवशीं आमच्या मठ परंपरेंतील तिसरे यतिवर्य श्रीजीवोत्तमतीर्थ यांच्या यात्रांच्या नोंदी वाचनांत आल्या. ते शके १४४० (सन १५८८) मध्यें मुक्त झाले. या सत्तर वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी आपलें नांव सार्थ केलें. मठाचें नांव उन्नत केलें आणि त्या काळीं अत्यंत दुर्गम अशा यात्रा केल्या. आपल्या तीर्थयात्रांची नोंद त्यांनी तीर्थावळ या आपल्या काव्यांतून सूचक, बोधक शब्दांमध्यें लिहून ठेवली आहे. सदेह वैकुंठाला गेलेले यतिवर्य अशी त्यांच्या बाबतींत आख्यायिका सांगितली जाते. महानिर्वाणाच्या वेळीं सोंदे मठाचे वादिराजतीर्थ यांना ते वैकुंठाला जात असल्याचा भास झाला होता. या गोष्टीचा भक्तगण आवर्जून उल्लेख करतात. त्या आख्यायिकेमध्ये तथ्य किती आहे याची छाननी करण्यांत अर्थ

नाहीं. पण एवढी गोष्ट खरी कीं श्रीजीवोत्तम त्या योग्यतेचे होते.

जर साडेचारशें वर्षांपूर्वी श्रीजीवोत्तमतीर्थ गंडकी यात्रेची यशस्वी परिपूर्ति करूं शकले, तर आपणहि ती केलीच पाहिजे असें आमच्या मनानें घेतलें आणि यावर्षीं तो योग जुळून आला.

***प्रश्न :*** *पूज्य श्रीस्वामीजींची प्रकृति नाजूक असताना ही यात्रा घडली. यात्रेचा प्रकृतीवर कांही परिणाम झाला काय?*

**उत्तर :** आमची प्रकृति नेहमी नाजूक राहिली आहे. पाठकण्याच्या मणक्यांना झालेल्या इजेमुळें दोन्ही पांयांची शक्ती बरीच घटली आहे. बसलों तरी वेदना, पहुडलों तरी वेदना, अशी ती अवस्था. वेदनाशामक औषधें सेवन करण्यास आम्ही स्पष्टपणे नकार दिलेला आहे. समाजासाठी देवगुरुच्या साक्षीने ज्या संन्यस्त व्रताची दीक्षा घेतली, त्याच्या साऱ्या यमनियमाचें कांटेकोर पालन व्हावे असा आमचा आग्रह. त्याबाबत तडजोड करणे ही आत्मवंचना ठरेल. संन्यास दीक्षेनंतर विशेषतः गुरुपीठारोहण झाल्यानंतर नित्यपूजा व नैमित्तिक यज्ञयाग-अनुष्ठानें क्रमप्राप्त झालीं आहेत. शिखरकलशप्रतिष्ठा देखील करावी लागते. पीठाधीश या नात्याने या कर्तव्यांत कसूर ठेवतां येत नाहीं.

सुरवातीला आम्ही पाठकण्याच्या वेदना सुसह्य व्हाव्यात म्हणून पहुडलेल्या अवस्थेंत कांही काळ पूजा केली. सभा-संमेलनामध्ये देखील अशा अवस्थेंत आशिर्वचनपर भाषणें देखील केलीं. परंतु मागाहून आम्हाला अशी प्रचीति आली, संकल्पाला निर्धाराची जोड मिळाली आणि भगवंताची कृपादृष्टि राहिली तर तो संकल्प सिद्धीस जात असतो. वेदना कमी झाल्या किंवा प्रकृति सुधारली अशांतला भाग नव्हे. आमच्या अंदाजाप्रमाणे पांयांची शक्ती मंद होत राहिली आहे. तरी देखील नित्य पूजापाठ, मठाधीश या नात्याने पार पाडावयाचीं कर्तव्यें, यज्ञयाग, अनुष्ठानें, देवप्रतिष्ठा सभारंभ, शिखर प्रतिष्ठा आदि कार्यक्रमांना आम्ही सहर्ष हजर राहात असतों. समाजासाठी जीवन अर्पण करायचे तर समाजाच्या अपेक्षानाही उतराव लागतें. कर्ता करविता भगवंत आहे. त्याची इच्छा असेल ते कार्य ही आमच्या हातून घडेल हा विश्वास मनात दृढ होत गेला. तीर्थाटने व खडतर यात्रा करण्याची प्रेरणा आम्हाला संतवचनातून मिळाली. संतवचने फार बोधक वेधक व सुरेख असतात. देवकृपेने पंगू देखील पर्वत पार करीत असतील तर आम्ही मागे कां रहावें? आमच्या सत्प्रवृत्तीला भगवंताचे अधिष्ठान आहे आम्ही मानतो आणि त्या भावनेनेच क्लेश वेदना बाजूला सारून कर्तव्यपूर्तीच्या कामासाठी तत्परतेने पुढे सरसावतों.

वैद्यकीय अहवाल तितकेसे उत्सावर्धक नाहींत. जो देह धारण केला, त्या देहाचे भोग चुकणार नाहींत परंतु आत्मबळ नांवाच्या तत्त्वांची जी वास्तु असते तिची

शक्ती अलौकिक असल्याचा अनुभव आम्ही घेत आहोंत. हा आत्मप्रौढीचा प्रकार नव्हे. तुमच्या प्रश्नाचे सरळ व प्रांजळ उत्तर आहे. हा ही एक यज्ञच . भगवंताची इच्छा असेल तोवर प्रज्वलित राहील. आपला संकल्प कच्चा राहिला, निर्धार कमी पडला असें घडूं नये एवढीच तळमळ असते.

*प्रश्न : दामोदर कुंड व चक्रतीर्थ या नांवाने सुविख्यात असलेल्या या कुंडाचें वैशिष्ट्य तें कोणतें? भारतांत देशभर अशीं असंख्य कुंडें असताना एका लहानशा कुंडांत स्नान करण्यासाठीं एवढा आटापिटा कां करावा?*

उत्तर : (स्वामीजी क्षणभर गंभीर) सकृत्‌दर्शनी तुमच्या म्हणण्यांत तथ्य आहे, कारण ज्यांना कुंडांत स्नान करावयाचें आहे त्यांच्यासाठीं असंख्य कुंडें उपलब्ध आहेत. राहत्या घराच्या मागें देखील असें एखादें कुंड असूं शकेल, जेथें पावसांत पाणी सांचत असेल किंवा भूगर्भांतील निर्झरामुळें त्या कुंडांत स्वच्छ पाणी रहात असेल, परंतु त्या कुंडाला दामोदर कुंडाची सर कशी येणार? दामोदर कुंड म्हणजे केवळ एक जलाशय नव्हे. तें कुंड हिमालयाच्या दुर्गम भागांत आहे एवढ्याचसाठीं त्याला महत्त्व प्राप्त झालें अशांतलाहि भाग नाहीं. हिमालयाच्या परिसरांत नद्या, नाले व कुंडें यांचा तुटवडा नाहीं. पण क्षणभर तो मुद्दा जरी बाजूला ठेवला तरी अनादी कालापासून या कुंडामध्यें सहस्त्रावधि भक्तांच्या श्रद्धा व भावना एकरूप झालेल्या आहेत. त्यामुळें आपोआपच दामोदर कुंडामध्यें दिव्यत्वाचा अंश विकसित होऊं शकला.

उदाहरणार्थ, देवालयामध्यें देवाची मूर्ति स्थापन करून आपण तिची पूजा-अर्चा करतों. खऱ्या देवाचें दर्शन कुणी घेतलें आहे? तो सर्वव्यापी असूनहि निराकार व अदृश्य आहे. देव प्रतिमेंत, मग ती प्रतिमा आकृतीच्या स्वरुपांत असो अथवा लिंगाच्या रुपांत, आपण दिव्यत्व पहातों. एरव्हीं ज्या धातू, शिळा अथवा काष्ठापासून देवप्रतिमा बनविलेली असते, अशीं अगणित काष्ठें, शिळा व धातू सर्वत्र विखुरलेले आहेत. मग देवळांत जाऊन देवप्रतिमेची पूजा आपण कां करतों? कारण त्या प्रतिमेची धर्मशास्त्रानुसार प्रतिष्ठापना झालेली असते. हजारों लोक सहस्त्रावधि वर्षे त्या प्रतिमेला आपली श्रद्धा, भक्ति अर्पण करीत असतात. म्हणूनच मंदिराच्या परिसरांतील वातावरणांत चैतन्य येत असतें आणि दिव्यत्वाची तेथें प्रचीति येते. इतर धातूंमध्यें असा दिव्यत्वाचा अंश नसतो. म्हणूनच दुर्गम भागांतील देवमंदिरांत जाण्याचें धाडस भक्त करतात. ज्यांच्या हृदयाला अशा दिव्यत्वाचा साक्षात्कार घडूं शकतो त्यांना दामोदर कुंडाचें महत्त्व आपोआप पटतें. या अनुभवाने जाणून घेण्यासारख्या गोष्टी आहेत.

चार भिंती उभारून त्यावर कौलें चढवलीं म्हणून तें घर होत नाहीं, निवास

होत नाहीं. तर त्यांत एकमेकांशीं प्रेमाने वागणारीं माणसें रहावीं लागतात. त्या माणसांच्या मनांत त्या निवासाबद्दल भक्ती, आदर असावा लागतो; तेव्हांच तो निवास ह्या नांवास पात्र होतो. नुसतें कुंड असलें व त्यांत पाणी असलें म्हणून तें पवित्र कुंड ठरत नसतें, तर भक्तांची त्यावर श्रद्धा असावी लागते; तेव्हांच तें पवित्र कुंड ठरतें. दामोदर कुंडाचेंहि असेंच आहे. अनादि काळापासून लोक त्याला पवित्र मानत आले आहेत.

*प्रश्न : कांही आगळे वेगळे अनुभव?*

**उत्तर :** अनेक आहेत. यात्रेमध्यें जेव्हां जीवसृष्टी व वनस्पतीसृष्टी यांच्यापासून मुक्त अशा प्रदेशांतून संचार होऊं लागला तेव्हां एके दिवशीं एक विलक्षण संकट समोर उभें राहिलें. आकाशांतून मोठाल्या गारा झडूं लागल्या आणि वातावरणांत तुफान आलें. एका दिवसाच्या वाटेवर दामोदर कुंड असताना आलेलें हें संकट पाहून स्थानिक वाटाडे व मदतनीस माघारी परतले. निष्ठावंत सहयात्री आमच्या आज्ञेची वाट पहात होते. आम्ही क्षणभर ध्यानस्थ बसलों. येथपर्यंत येऊन रिक्त हस्तें परत यायचें काय? यात्रेला निघताना श्रीरामदेवाने निष्कलंक अभयाचा शब्द दोनदां दिला होता, तो निरर्थक ठरणार काय? काय व्हायचें तें होवो, यात्रेंत खंड पडायचा नाहीं. असा कौल आमच्या मनानें दिला. या यात्राकाळांत आम्ही मौनव्रताचें पालन करीत होतों. सहयात्रींना हातानेच पुढील मार्गक्रमण करण्याची सूचना दिली आणि आम्ही उठलों. तत्क्षणीं एक दैवी साक्षात्कार झाला. तो भास होता, अंतर्मनाचा कौल होता कीं विष्णु परमात्म्याचा दिलासा होता हें सांगतां येत नाहीं. पण आदेश स्पष्ट होता. "यतिश्रेष्ठा, ज्या निष्ठेने व श्रद्धेने आणि ज्या जिद्दीने व ध्यासाने आपण येथवर आलांत ती साधना व्यर्थ जाणार नाहीं. पुढे जा. तुमच्या यात्रेची परिपूर्ति निर्विघ्नपणें होईल."

- आम्हाला कठोपनिषदांतील वचनाचें स्मरण झालें.

**"उत्तिष्ठित, जागृत प्राप्त वरान् निबोधत**
**क्षूरस्य धारा निषिता दुरत्यया**
**दुर्गं पथस् तत् कवयो वदन्ति ।।" (कठोपनिषत् १.३.१४)**

त्याच उपनिषदामध्ये आणखी एक श्लोक आहे. त्याचेंहि मनातल्या मनांत स्मरण केलें.

**"विज्ञानसारथिरथिर्यस्तु मनःप्रग्रहवान् नरः ।**
**सोऽध्वनः पारम् आप्नोति तद् विष्णोः परमं पदम् ।।**
**(कठोपनिषद् १.३.९)**

गिमू खिंड पार केली, तेवढ्यांत ईशान्येकडील आभाळ निरभ्र होऊं लागलें. अचानक अंगावर आकाशांतून अक्षता झडल्या. साबुदाण्याच्या आकाराचे ते बर्फाचे गोळे अंगावर झेलताना पुनित-पावन झाल्याचा... संकट टळल्याचा भास झाला. मन निश्चिंत झालें. कृष्णमेघाच्या कडा चकाकल्या. सोनेरी सूर्यकिरण हिमाच्छादित पर्वत शिखरांवरून परावर्तित होऊन आसमंत प्रसन्न करते झाले. देवधामांतील दीप प्रज्वलित झाले होते. आणि अहो आश्चर्यम्! आकाशांतुन पुष्पवृष्टीहि झाली. तुंब्याच्या सारखीं शुभ्रधवल, नाजूक, कोमल फुलें अंगावर झेलतां झेलतां अदृश्य व्हायचीं. एकहि फूल बोचलें नाहीं. आम्ही मनोमन श्रीविष्णूचें स्मरण केलें. जणूं वैकुंठ... भगवान विष्णूच्या हृदय मंदिराचें महाद्वार सताड खुलें झालें होतें.

दामोदर कुंडांत प्रवेश करून जगन्नियंत्या सूर्यनारायणाला अर्ध्य अर्पण केलें. श्रीमठाराध्य देव प्रतिमेस अभिषेक पूजा केली आणि मठपरंपरेंतील बावीसहि स्वाम्यांचें उत्कटतेनें स्मरण झालें. श्रीधर आचार्य शेजारींच होते. आमच्या मनांतील भावना त्यांनी जाणल्या आणि मुक्त कंठाने गुरुपरंपरा स्तोत्राचें अस्खलित पठण केलें. एक एका गुरुवर्यांची आकृति मनःचक्षुंसमोरून सरकत राहिली आणि जेव्हां पठण थांबलें, तेव्हां निरव स्तब्धता आसमंतांत पसरली.

परतीच्या प्रवासांत संत तुकारामाची कधींकाळीं कानावरून गेलेली अभंगवाणी आमच्या मनांत निनादूं लागली...

**जेथें जातो तेथें तू माझा सांगाती। चालविसी हाती धरोनियां।।**

## १३. तीर्थक्षेत्रांचें संदर्शन

श्रीगंडकी शालिग्राम क्षेत्राशिवाय श्री विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी यांनी संदर्शन केलेलीं तीर्थस्थळें.

| | | |
|---|---|---|
| पंढरपुर | वृन्दावन - गोकुल | अयोध्या |
| कोल्हापुर | मथुरा | अलाहाबाद - प्रयाग |
| नासिक | आग्रा | वारणासी |
| सोमनाथ द्वारका | देहली | विष्णुगया, बुद्धगया |
| मातृगया, बेटद्वारका | श्री बदरीनाथ | जगन्नाथपुरी |
| प्रभासक्षेत्र, पुष्कर | हरिद्वार - हृषिकेश | कोणार्क - साक्षिगोपाल |
| जयपुर | नैमिषारण्य - शुकस्थळ | भुवनेश्वर |

| | | |
|---|---|---|
| राजमहेन्द्रि - विशाखापट्टणम् | मानामधुरै | मुंबई |
| अहोबल | मधुरै | अयोध्या |
| शिवकांचि | तोताद्रि | रांचि |
| विष्णुकांचि | कन्याकुमारी | बेजवाड |
| तिरूवणामलै | सुचींद्रं - त्रिवेंद्रम | तिरुपति - कालहस्ति |
| तिरूक्कोयिलूर | तिरुवनंतपुरम् | बडोदा |
| श्रीमुष्णं | जनार्दन | कुरुक्षेत्र |
| चिदंबरम् | कालडि | उज्जयिनी |
| कुंभकोणं | गुरुवायुरु | उडुपि |
| तंजाऊरु | पळनि | पाजक |
| श्रीरंग | बेंगळूर | कोल्लूर |
| रामेश्वरं | महाबलिपुरं | सुब्रह्मण्य |
| नवपाषाण - दर्भशयन | मद्रास | |

卐

# परिशिष्ट

*परिशिष्ट - १*

# मल्ल्यार मठ : इतिहासांतील एक सोनेरी प्रकरण

मल्ल्यार मठ या नावाने ओळखण्यांत येणारीं कर्नाटकांतील किनारी भागांत पांच ठिकाणीं असलेलीं देवमंदिरें हीं स्थलांतरित सारस्वत समाजाच्या इतिहासांतील कीर्तिस्थानें आहेत. गंगोळ्ळी येथील मल्ल्यार मठांतील देवमंदिराच्या अग्रभागीं एक फलक लावलेला वाचायला मिळतो. फलकांत अशी नोंद आहे कीं, मूळ गोव्यांतील वेर्णे गांवचे श्री. नारायण महाले यांनी सतराव्या शतकांत हा मठ बांधून समाजाला अर्पण केला. कोण हे श्री. नारायण मल्ल्या (महाले)? ते गंगोळ्ळीला कसे पोंचले आणि त्यांनी मठवास्तु उभारून समाजाला कां अर्पण केली? या प्रश्नांचीं उत्तरें त्या परिसरांतील इतिहासाच्या अनेक पुस्तकांमध्ये लिहिलेलीं आढळतील. प्रत्येक नोंदीमध्ये थोडाफार फरक आढळेल. या परिसरांतील वयोवृद्ध गृहस्थ श्री. नारायण महाले यांच्याबद्दल अनेक कथा सांगतात. त्यांत देखील एकवाक्यता नाहीं. ऐतिहासिक नोंदी व ऐकिव इतिहास यांच्या आधारें श्री.नारायण मल्ल्या यांच्याबद्दल पुढील मजकूर संकलित केला आहे.

गोव्यांत सासष्टी परिसरांत कुशस्थळी जवळ वेर्णे हा एक समृध्द गांव होता. एका बाजूने लोटली व रासय आणि दुसरीकडे कुशस्थळी यांच्या मध्यभागीं डोंगराच्या पठारावर वसलेल्या या गांवाचें जुनें वैभव लोककथा व गीतांनी ऐकायला मिळतें. महालसा ही त्या गांवची देवता. आजहि पुरातन महालसेच्या देवालयाचे जे अवशेष वेर्णें वठारावर आहेत ते मूळ देवमंदिराची भव्यता व समृद्धि यांची कल्पना देण्यास पुरेसे आहेत. डोंगरमाथ्यावर मधुर पाण्याचे निर्झर, जलाशय पाहिले असतां गांव शेती-बागायतींच्या दृष्टीने किती समृध्द असेल याची कल्पना येतो.

पोर्तुगीजांच्या रुपाने परचक्र आलें आणि त्यांनी देवमंदिरें जमीनदोस्त केलीं. हातीं सांपडलेल्यांना सक्तीने बाटविलें. त्या काळीं धर्म व संस्कृतीच्या रक्षणासाठीं जीं अनेक सारस्वत कुटुंबें वेर्णे येथून स्थलांतरित झालीं एक त्यांपैकीं महाले यांचें कुटुंब एक होते.

पदरीं असलेलें सोनें देऊन त्यानी कुमठा येथें एक लहानसें घर विकत घेतलें आणि अधून मधून सोन्याचे दागिने विकून ते आपला प्रपंच चालवूं लागले. कुटुंबांतील एकमेव सदस्य म्हणजे त्यांची पत्नी. मूलबाळ कुणी नाहीं.

हळूहळू घरभाटांतील नारळ घरांत गोळा होऊं लागले. या नारळांचें काय करावें? बाजारांत नेऊन विकले तर थोडे पैसे येतील असा विचार करून श्री.

नारायण महाले यांनी सारे नारळ गोणपाटांत भरून घेतले आणि दुसऱ्या दिवशीं पहांटे एका मजुरासह ते नारळ घेऊन होन्नावरला जायला निघाले.

कुमठा ते होनावर दरम्यान अनेक टोलनाके लागले. प्रत्येक नाक्यावरील अधिकाऱ्यांनी कराचे पैसे मागितले आणि ते नसल्यामुळें श्री. नारायण मल्ल्या यांच्या गोणपाटांतून दोनचार नारळ काढून घेतले.

होन्नावर बाजारपेठेंत पोंचेपर्यंत अर्धे अधिक नारळ संपले होते. राहिलेले विकून पैसे येणार तरी किती? मनांतल्या मनांत भ्रष्ट व बेबंद राजवटीवर ते चिडले. सरळ राजाकडे जावे व तक्रार नोंदवावी असा विचार केला आणि ते राजवाड्यापर्यंत गेलेहि. पण त्यांना राजवाड्यांत प्रवेश मिळाला नाहीं. रागाला शरमेची जोड मिळाली. ते अस्वस्थ झाले. कसेहि करून राजाचें लक्ष या अनागोंदी कारभाराकडे वेधण्याचा निर्धार करून त्यांनी होन्नावर येथें राजवाड्याच्या रस्त्यावरच आपला एक टोलनाका उभा केला. निदान या बेकायदेशीर टोलनाक्याकडे लक्ष जाऊन आपणास दरबारांत उभे करतील अशी त्यांची अपेक्षा होती. पण विपरितच घडलें. कोणी कसलीच चौकशी वा तक्रार केली नाहीं आणि सारे मुकाट्याने वस्तूंच्या रूपाने लोक टोल भरूं लागले.

आतां काय करायचें? बंदरांतून राजवाड्याचें टपाल घेऊन एक माणूस टोल नाक्यासमोरूनदररोज जायचा. श्री.नारायण मल्ल्यायानी त्याला अडविलें. टपालाची पिशवी उघडली आणि आंतील पत्रांवर आपला संदेश लिहून टाकला. "अठरा फळें नवे, कर- कुमठा नारायण."

श्री. मल्ल्या यांची अशी अपेक्षा होती कीं आपल्या या कृत्याचा जाब विचारला जाईल. पण अठरा महिने उलटले तरी कुणी साधी चौकशीहि केली नाहीं. उलट टोलनाक्यामुळें प्रपंच चालविण्यास नियमित उत्पन्न मिळत राहिलें.

आपल्या पतिदेवाचे हे उपद्व्याप पत्नीला पसंत नव्हते. त्यापेक्षां काशी यात्रेला जाऊन तेथेंच राहूं अशी ती वारंवार म्हणायची. श्री. नारायण मल्ल्या पण निराश झाले होते. मूळ हेतु तडीस जाण्याचीं आशा दिसत नव्हती. एके दिवशीं त्यांनी टपालाची पिशवी न उघडतांच राजवाड्यांत जाऊं दिली. त्या दिवशीं मात्र राजवाड्यांत श्री. नारायण मल्ल्या यांच्याविरूद्ध अधिकृत तक्रार नोंदली गेली आणि श्री. मल्ल्या यांना राजाज्ञेचा भंग केल्याच्या आरोपावरून दरबारांत उभे केले गेलें.

या संधीचा फायदा घेऊन श्री. नारायण मल्ल्या यांनी राजे शिवप्पा नायक यांना आपली व सारस्वत समाजाच्या दुर्दशेची कथा सांगितली. ते म्हणाले, "धर्म व संस्कृतीचें रक्षण करण्यासाठीं आम्ही केळदी संस्थानाचा आसरा घेतला. पण येथील भ्रष्ट राजवट, मुजोर अधिकारी व अंधाधुंदी कारभार पाहून असें वाटतें कीं, येथेंहि सरळ मार्गाने जगतां येणार नाहीं. ही परिस्थिति राजेसाहेबांच्या कानावर घालण्यासाठीं

राजदरबारांत प्रवेश मिळवण्यासाठीं हा उपद्व्याप केला. पण सतत अठरा महिनेपर्यंत या बेकायदेशीर टोलनाक्याची कोणी दखल देखील घेतली नाहीं, यावरून राज्यांतील कारभार कसा चालला आहे तें राजेसाहेबांनी समजून घ्यावें."

सारी हकिकत ऐकून घेतल्यावर राजा विस्मित झाला. पण त्याचबरोबर श्री. मल्ल्या यांच्या बुद्धिमत्तेचे राजाला कौतुक वाटले. राजेसाहेबांनी श्री. नारायण मल्ल्या यांना सरकारी नोकरींत घेऊन राज्यकारभार सुधारण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोंपविली. कालांतराने हेच श्री. नारायण मल्ल्या केळदी संस्थानचे महसूल मंत्री झाले. संस्थानचें उत्पन्न वाढलें व त्या प्रमाणांत समृध्दीहि वाढली.

बरींच वर्षे राज्याची सेवा केल्यानंतर पत्नीसह काशीयात्रेला जायचा निर्णय श्री. नारायण मल्ल्या यांनी घेतला. त्यांच्या कार्यशक्तीवर, निष्कलंक चारित्र्यावर आणि विशेष म्हणजे बुद्धिमत्तेवर संतुष्ट असलेल्या राजाने नारायण मल्ल्या यांची कोणतीहि इच्छा असेल तर ती पुरी करण्याचा शब्द देऊन त्याबाबत पृच्छा केली.

"एक इच्छा आहे." श्री नारायण महाले उत्तरले, "केवळ साडेतीन घटकांसाठीं राजमुद्रा व राजदंड मला हवा आहे."

राजाला आश्चर्य वाटलें. राजपद भोगण्याची हौस भागविण्यासाठीं ते साडेतीन घटकांसाठी राजदंड व राजमुद्रा मागून घेत आहेत असा विचार करून राजाने आनंदाने त्यांची इच्छा पूर्ण केली.

श्री. नारायण महाले यानी कांही ताम्रपट तयार करून ठेवले होते. त्या ताम्रपटांवर त्यानी राजमुद्रा उमटविल्या व ते राजासमोर ठेऊन राजमुद्रा व राजदंड परत केला.

"हे कसले ताम्रपट?" आश्चर्याने राजाने विचारलें.

"वाचून पाहिल्यावर राजेसाहेबांना सारें समजेलच." असें उत्तर देऊन नारायण महाले एका बाजूला उभे राहिले.

केलदी राज्यांत पांच ठिकाणीं, पांच जमिनी स्थलांतरित सारस्वतांना दान देण्याचा आदेश त्या ताम्रपटांत होता.

गंगोळीचा मठ अशाच एका जागेवर उभारण्यात आला आहे. होन्नावर येथील व्यंकटरमण देवालयांत दुसरा एक ताम्रपट पहायला मिळतो. वेंकटापुर व हेजमाडी येथील श्री व्यंकटरमण देवस्थानें व कासरकोड येथील श्री बिंदुमाधव विश्वेश्वर देवस्थान येथे उभारण्यात आलें आहे. जमिनीहि मल्ल्या यानी समाजाला दान केलेल्या जमिनींपैकीं आहेत. गोव्यांतील श्रीरामनाथाच्या कौण्डिण्य गोत्री कुळाव्याने स्थलांतरित समाजाची केलेली ही एक उत्तम सेवा. एका ताम्रपटावर वरील नोंद पहातां हे मठ इ.स. १६६३ मध्ये बांधून पूर्ण झालेले दिसतात.

*परिशिष्ट - २*

## श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींची जन्मकुंडली


जन्मतिथि : शालिवाहन शक १८६७ - पार्थिव संवत्सर - सिंह मास, दिन ६, श्रावण शु. १४

जन्मतारीख : बुधवार दि. २३ ऑगस्ट, १९४५


जन्मवेळ : पहाटे ३.५० वा.

जन्मस्थल : गंगोळ्ळी (द. कन्नड)

**।। जन्मलग्न कुंडली ।।**




**।। नवांश कुंडली ।।**



*परिशिष्ट - ३*

# विद्याधिराज पुरस्काराचे मानकरी

१९७७ - श्री पुरुषोत्तम रामनाथ केणी (मरणोत्तर)
१९७८ - डॉ. तोणसे माधव अनंत पै.
१९७९ - श्री. रंगप्पा पांडुरंग कामत
१९८० - श्री. दिनकर देसाई
१९८१ - श्री. माधवराव अच्युत पै (मरणोत्तर)
१९८२ - श्री. पांगाळ रमानाथ नायक
१९८३ - डॉ. सखाराम गोपाळ गुडे
१९८४ - श्री. रामकृष्ण नरसिंह कामत
१९८५ - डॉ. बाबा म्हाळप्पा पै
१९८६ - श्री. रामदास प्रभू नवारी
१९८७ - पद्मभूषण नित्यानंद मंगेश वागळे
१९८८ - एडमिरल जयंत गणेश नाडकर्णी
१९८९ - श्री. वैकुंठ शेषगिरी सोंदे
१९९० - पद्मश्री वसंतराव श्रीनिवास शे. धेंपे
१९९१ - पद्मभूषण श्याम बेनेगल
१९९२ - श्री. तोणसे रमेश उ. पै
१९९३ - श्री. अनंत नरसिंह नायक
१९९४ - श्री. रघुनाथराव विश्वनाथराव देशपांडे
१९९५ - श्री. माधव व्ही. कामत
१९९६ - श्री. मंगळूर रंगा पै
१९९७ - श्री. मनोहर शेणवी उसगांवकर
१९९८ - श्री. के. वामन. कामत

*परिशिष्ट - ४*

## व्दैत संप्रदायाचे संस्थापक : श्रीमध्वाचार्य

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ या नांवाने आज मान्यता पावलेला मठ हा द्वैत संप्रदायाचे प्रतिनिधित्व करीत असून या संप्रदायाचे संस्थापक श्रीमध्वाचार्य होत. भक्तीला दार्शनिक सुवर्णपीठावर प्रतिष्ठित करणाऱ्या महान् चिंतक भक्त आचार्यांमध्यें श्रीरामानुज यांच्या पश्चात् श्रीमध्वाचार्य यांचेच स्थान आहे. काळगणनेच्या दृष्टीने भक्त दार्शनिक श्रीभास्कराचार्य हे श्रीमध्वाचार्यांपेक्षां पुरोगामी होते. परंतु कार्य व प्रभाव विचारांत घेतां श्रीमध्वाचार्य यांची ख्याति विशेष आहे. आज मध्व विचारदृष्टीचा पुरस्कार करणारे समृद्ध मठ व त्यागी विद्वान देशांत इतस्ततः विखुरलेले दिसतात. मध्वमताचे मुख्य पीठ कर्नाटक राज्यातील उडुपी शहर होय. पुरोगामी आचार्य श्रीशंकर व श्रीरामानुज यांच्या अस्त्राच्या धारेप्रमाणे तीक्ष्ण बुद्धींतून प्रस्थापित झालेल्या सिद्धांताना आव्हान देण्याचे अवघड काम केवळ हृदयात भक्ति असलेले प्राचार्य करू शकणार नाहीत. भक्ति बरोबरच बुद्धिचीही जोड असावी लागते. हे दोन्ही सद्‌गुण श्रीमध्वाचार्यामध्यें उत्कट होते. म्हणूनच आज सात शतकांनंतर देखील ते असंख्य चिंतक व भाविकांचे आराध्य बनून राहिले आहेत.

माध्व संप्रदाय श्रीमध्वाचार्यांना वायुदेवाचे अवतार मानतो. त्यांच्या संबंधांतील सुप्रसिद्ध श्लोकांचा भावार्थ असा आहेः व्यासादि प्राचीन मुनी व श्रीहरीच्या निरंतर ध्यानातून प्राप्त झालेले ज्ञान यांच्या जोरावर प्रतिद्वंद्वी रूपी हत्तीचे बळ, सिंह ज्या प्रमाणे उध्वंस्त करतात आणि समग्र वेदांशीं संबंधित लोकांमधील अज्ञानरूपी तिमिराचा तेजस्वी सूर्याप्रमाणे ऱ्हास करतात अशा सर्वज्ञ व विख्यात मध्व आचार्यांची व्याख्या सकल सुहृदयांच्या कानांचे आभूषण बनलें आहे.

"ज्यांना कसलाच भ्रम नाही, जे कुणाकडूनच पराभूत होत नाहींत, जे जडताशून्य व निर्मळ आहेत, त्या विविध संतापांना दूर करणाऱ्या आनंदतीर्थांची मी उपासना करतों," असाहि भक्तांनी त्यांचा गौरव केला आहे.

आनंदतीर्थ, पूर्णप्रज्ञ, व सुखतीर्थ या नांवांनीही श्रीमध्वाचार्यांना ओळखलें जातें. आपल्या युगकार्याबद्दल ते सभान होते. ते स्वतःला वायुपुत्र म्हणवत व वेदादि शास्त्रांच्या उद्धारासाठी ईश्वरप्रेषित मानत. एके ठिकाणीं तर त्यांनी कोणताच संकोच न बाळगता स्वतःचा उल्लेख वायूचा तिसरा अवतार असा केला आहे. पहिला

अवतार राम साहाय्यक हनुमानाचा, दुसरा कौरवगण संहारक भीमाचा व तिसरा अज्ञान विदारक मध्वाचा. आचार्यांनी ३७ ग्रंथ रचलेले असून त्यांमध्ये गीता ब्रह्मसूत्र व उपनिषदांवरील भाष्यांचा समावेश आहे. उडुपी येथे आपल्या सिद्धीच्या जोरावर भगवान् श्रीकृष्णाची मनमोहन मूर्ति चालवून स्वतःकडे आणली व त्यांनी तेथे विशाल व सुंदर मंदिर उभारले अशी आख्यायिका आहे. आजहि उडुपीतील श्रीकृष्ण मंदिर हे भाविकांचे प्रमुख आकर्षण असून गेलीं सात शतकें हें मंदिर मध्व प्रवृत्तीचें मुख्य केन्द्र राहिलें आहे.

श्रीमध्वाचार्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारे एक संस्कृत महाकाव्य त्यांचे समकालीन श्रीनारायण पंडिताचार्य यांनीं रचलेलें आहे. सोळा सर्गातील आणि हजारांहून अधिक श्लोकांनीं भरलेलें हें महाकाव्य म्हणजे मध्व संप्रदायी सिद्धांत मीमांसक अशा रसाळ साहित्यिक शैलीतील उत्कृष्ट काव्य आहे. ग्रंथकार म्हणतात की श्रीमध्व हे उत्तम आचार्य व वैदिक तत्त्वाचे खरे द्रष्टे व प्रबोधक होत. श्रीमध्वाचार्यांच्या उपदेशाचा केंद्रबिंदू स्वकर्तव्यनिष्ठा व ईश्वरसमर्पण हा होय. सर्वसंग परित्यागाला ते महत्त्व देत नव्हते. सर्व कल्याणकारक प्रवृत्तींत व्यग्र असतानाच ईश्वरपरायण रहाणे हें श्रेष्ठ व श्रेयस्कर जीवन आहे असें ते मानत आणि अकर्मण्यतेचा ते विरोध करीत.

तत्त्वदृष्टीने त्यांचा सिद्धांत असाः

विश्वात तीन घटक तत्त्वें आहेत : परमात्मा, जीव आणि जगत्. नारायण हा परमात्म्यासाठी त्यांनी रूढ केलेला शब्द होय. नारायण म्हणजे जीवामध्यें वास करणारा अंतर्यामी. हीं तिन्ही तत्त्वें अविनाशी- अर्थात नित्य व एकमेकांपासून भिन्न आहेत. जीव आणि जगत् भिन्न असूनही त्यांवर नारायणाचे नियंत्रण आहे. समर्थपणे विधर्माचरण केल्यानेच परमात्म्याचें प्रीतिभोजन होऊं शकतें व क्लेषांपासून मुक्ति मिळते. विधिवत् पूजन, अर्चन केल्यानेच परमात्म्याचें यथार्थ ज्ञान व संतापनिवारक अनुग्रह प्राप्त होत असतो. परमात्मा हा जगताचे सर्जन, संहार, नियमन, बंधन व मुक्ति इच्छेनुसार करू शकतो. तरी देखील जीवाचा सदाचार व त्याची भक्ति हे इच्छेचे प्रयोजक असतात. नारायण सकळ उत्तम गुणनिधान व सर्वविध दोष अथवा त्रुटींपासून मुक्त आहे. आपापल्या कर्माचीं फळें मिळावीं या हेतूनें तोच जीवांना उच्च नीच योनीमध्ये जन्म देतो. जीवाची पात्रता किंवा योग्यता पाहूनच ईश्वर विविध भोग निर्माण करीत असतो. उच्च कर्मांद्वारे परमार्थ साधूं पहाणाऱ्यांना नारायणच अनुकूलता निर्माण करून मदत करीत असतो.

परमात्म्याला समजण्याचें प्रमाणित साधन म्हणजे वेद, वाल्मिकी रामायण व

महाभारत हीं होत. पूर्वग्रहविमुक्त या शास्त्रांचा स्वाध्याय केला पाहिजे. श्रीमध्वाचार्यांच्या मतें जगांतील सर्व भाषांतील सर्व शब्द प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या परमात्म्याचेंच प्रतिपादन करतात. सर्वसामान्य व्यवहारांतील शब्दाचा व्यावहारिक अर्थ वस्तुरूमी असला तरी पारमार्थिक अर्थाने तो नारायणच ठरतो. वेदादिशास्त्रां पासून परमात्म्याचे स्वरूप ज्ञान प्राप्त होऊं शकलें तरी त्याच्या प्राप्तीसाठीं ते पुरेसें नाही. परमात्मसमर्पण बुद्धीने सामाजिक व वैयक्तिक सत्कर्में करावींत व त्याच बरोबर ईश्वरार्चन करावें. तसे केल्याने आंतरबाह्य शुद्धि होऊन जीवाला परमात्म्याचा अनुग्रह प्राप्त होतो. सकाम भावाने केलेलीं सत्कर्मे पुण्यरूप असल्याने सुखदायी असलीं तरी त्या सुखाच्या आसक्तीमधून दुष्कृत्यें व पापाचा उद्भव संभवतो. यास्तव सत्कर्म व परमपूजा निष्काम ईश्वरसंतुष्टीसाठीच करणे योग्य होईल.

परमात्मा हा विश्वाचा सर्जक, पालक व संचालक असल्याचे शास्त्रें सांगतात. परंतु सर्जनादि प्रवृत्तीमागे परमात्म्याचा कांहीं स्वार्थ असूं शकेल काय? श्रीमध्वाचार्य म्हणतात : परमात्मा प्राप्त काम अर्थात् सर्व कामनांपासून अलिप्त आहे. परंतु पापपुण्याचे संस्कार तसेंच भोगवासनांना क्षपित करण्याची जीवाला संधी देण्यासाठीच प्रभुने सृष्टिरचना केली. जीवनानुभवाने तसेंच सत्पुरुषांच्या सहवासाने संसाराची दुःखमयता व भोगांची निरर्थकता ओळखून आत्मकल्याणाच्या मार्गाकडे वळण्यास जीव स्वतंत्र आहे. या स्वातंत्र्याचा सदुपयोग करावा की दुरुपयोग हे ज्याचें त्यानें ठरवावें. सदुपयोग केल्यास सर्व सुखनिधान परमात्म्याकडे तो पोचतो आणि दुरुपयोग सर्व दुःखनिधान पापाकडे तो वळतो. या दोन्ही अवस्थांसाठी जीव स्वतःच जबाबदार असतो.

श्रीमध्वाचार्य जीवनाचे तीन गुण सांगतात. हे तीन गुण म्हणजे सात्त्विक, राजस व तामस होत. सामान्यपणे ज्या गुणधर्मांनिशी जीव जन्म घेतो त्या गुणधर्मातच त्याच्या जीवनाची सांगता होत असते. जीवन कामातील अनुभव आचरणावर त्याच्या जन्मांतरातील गुणांमध्ये परिवर्तन शक्य असते.

अज्ञानाचा पडदाच जीवाला स्वतःच्या किंवा परमात्म्याच्या खऱ्या स्वरूपाबद्दल अजाण ठेवतो. सत्कर्म व भक्ति हा पडदा हळू हळू दूर करते व परमात्म्याचा अनुग्रह होताच तो अदृश्य होतो. सर्व साधनांचा मुख्य उद्देश, जीवाचे हें स्वतःविषयींचे व परमात्म्याविषयीचे अज्ञान दूर करणे हाच आहे. जो स्वतःस स्वायत्त मानतो तो देखील याच अज्ञानामुळें. आपण परमात्म्याच्या आधीन असून सारी प्रेरणा परमात्म्याकडूनच मिळते, अशी श्रद्धा असलेला जीव निरहंकारी बनतो. खरें पहातां अहंकार हाच पडदा असतो. पडदा दूर होणे म्हणजेच निरहंकारी बनणे. एकदा

पडदा दूर झाला म्हणजे परमात्म्याचा साक्षात्कार होऊ शकतो व ती स्थिती प्राप्त करण्यासाठी परमात्म्याची अविच्छिन्न व अहेतुक भक्ति हा एकमेव मार्ग आहे. आत्मा व परमात्मा यांचे अबाधित ज्ञान हीच परमानंदाची स्थिति असून त्यालाच मोक्ष म्हणतात.

श्रीमध्वाचार्यांच्या मतें भगवान् नारायणाची पूजा नित्यनेमाने व विधिवत् व्हावी लागते. सर्वोत्तम तत्त्वरूपी नारायण असला तरी त्याच्या पूजेस त्याचा परिवार महालक्ष्मी, वायु व अग्नी यांना अपरिहार्यपणे स्थान द्यावे लागेल. महालक्ष्मी ही नारायणाची अर्धांगिनी. नारायणाप्रमाणेच व्यापक व सर्वज्ञ. तरीहि नारायणाच्या आधीन आहे, स्वतंत्र नाही. इतर जीवांहून महालक्ष्मी विलक्षण व नित्यमुक्त आहे. नारायणाच्या स्वरूपाचें सर्वाधिक ज्ञान तिला आहे. नारायणाची सेवा व सान्निध्य यांतच ती आनंदित असते. तिसरे स्थान वायुदेवाचें. तो सर्वश्रेष्ठ जीव असून त्रिकालज्ञ व परमात्म्याचा परमप्रिय भक्त आहे. वायूनंतर अग्नीचे स्थान, अग्नी तेजस्तत्व असून सर्व देवांचा प्रतिनिधी बनून आहुत्यांचा स्वीकार करतो. नारायणाच्या सर्जन, पालन व संहरण कार्यातील मुख्य साथी असल्याने अग्नी हा आराध्य आहे.

श्रीमध्वाचार्यांनी एकूण ३७ ग्रंथ रचले. त्यांचें ब्रह्मसूत्रावरील भाष्य सर्वोत्तम मानलें जातें. असें म्हणतात की नारायणाच्या आज्ञेवरून वायूने श्रीमध्वाचार्य यांच्या रुपाने अवतार घेतला आणि खुद्द व्यासजींच्या प्रेरणेने व्यासरचित वेदान्त सूत्र ब्रह्मसूत्राचा अर्थ यथार्थपणे रूजू करून भाष्य लिहिलें. "महाभारत-तात्पर्य" ही त्यांची आणखी एक आगळी रचना आहे.

श्रीमध्वाचार्यांच्या मतें मोक्ष मिळण्याचे एकमेव साधन म्हणजे ईश्वरानुग्रह होय. एकाच श्लोकांत श्रीमध्वाचार्यांचे विचार नवनीत व्यक्त करतां येतील.

**श्रीमन्मध्वमते हरिः परतरः सत्यं जगत् तत्वतो।**
**भेदा जीवगणा, हरेरनुचरा नीचोच्चभावं गताः।**
**मुक्तिर्नैज सुखानुभूतिरमला, भक्तिश्च तत्साधनं।**
**ह्यक्षादित्रितयं प्रमाणमखिलाम्नायैकवेद्यो हरिः।।**

श्रीमध्वाचार्यांच्या सिद्धांताप्रमाणे हरि परमतत्त्व आहे. जगत् वास्तव आहे (मिथ्या नाही.) जीव अनेक व परस्पर भिन्न आहेत. हरीच्या अनुयायांच्या तीन उच्च-नीच कोटि आहेत. आत्म्यातील निर्मळ आनंदाची अनुभूति हीच मुक्ति आहे. मुक्तीचे साधन भक्ति आहे. प्रत्यक्ष अनुमान व शब्द हीं तीन यथार्थ ज्ञानाचीं साधनें आहेत. समग्र वेदादि शास्त्रें एकमेव हरीचेंच प्रतिपादन करतात..

*परिशिष्ट - ५*

## श्रीपर्तगाळ परिसरांतील यापूर्वींचे जीर्णोध्दार

**श्रीशके १६२५ पूर्वी सुभानु संवत्सरांत झालेल्या जीर्णोध्दार कार्याचा विवरः**

- ☆ श्रींदेवाचें मध्यगृह.
- ☆ देवापुढील अग्रशाला व सेजासहित चारहि अग्रशाला.
- ☆ यज्ञमंडप व सभामंडप.
- ☆ दोन्ही रथ, तेरविदि तथा रथगृह.
- ☆ मुख्यप्राण घूड.
- ☆ श्रीमठाच्या उजवीकडील व डावीकडील विहीर.
- ☆ नदीकडील अश्वत्थाचे पेड.
- ☆ धर्मशाळा.

**श्री शके १७३१ शुक्ल संवत्सरांत मठाधीश श्रीमदानंदतीर्थ स्वामीजींनी करवून घेतलेल्या जीर्णोध्दाराचा विवरः**

- ☆ श्रीराम देवाचे मध्यगृह व सेजासहित चारहि अग्रशाला.
- ☆ श्रीमुख्यप्राण घुडाचे खांब.
- ☆ रथगृहाकडील पायऱ्यांची पाज.
- ☆ सांतेमळावरील अश्वत्थाचे कटे.
- ☆ रथगृहाकडील अश्वत्थाचे कटे.

**श्री शके १८५६ - श्रीमद् इंदिराकांततीर्थ स्वामीजींनी आपल्या कारकिर्दीत करवून घेतलेले जीर्णोध्दार कार्य :**

- ☆ श्रीराम देवासमोरील मोठी माडी व खालील चावडीसह संपूर्ण बांधकाम.
- ☆ श्रीवीरविठ्ठलासमोरील वासरी, स्वयंपाकगृह व खालील वासरीचें बांधकाम.

**श्री शके १८८८ मध्ये श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामी महाराजांनी करविलेले जीर्णोध्दारः**

- ☆ मठवास्तूचा आवश्यक डागडुजी.
- ☆ श्रीराम देवाची पुनःप्रतिष्ठा.
- ☆ सुवर्णलेपित कलश प्रतिष्ठा.
- ☆ गोशाळा.

*परिशिष्ट - ६*

# अष्टोत्तर - शत दिव्य विष्णुस्थान

| स्थल | देवता | |
|---|---|---|
| १. श्री वैंकुण्ठ | वासुदेव | श्रीवैंकुण्ठ (परमपद) |
| २. आमोद | सङ्कर्षण | श्रीक्षीरसागर (तिरुप्पाल्कडल) |
| ३. प्रमोद | प्रद्युम्न | श्रीरङ्ग |
| ४. सम्मोद | अनिरुध्द | कोळियूर- निचुलापुरी (उरैयूर) |
| ५. सत्यलोक | विष्णु | तिरूवेळ्ळारै (श्वेतगिरी) |
| ६. सूर्यमण्डल | पद्नाक्ष | अन्बिल (धन्विन :पुर) |
| ७. क्षीरसागर | शेषशायी | तिरूप्पेर नगर (कोविलडि, श्रीरामनगर) |
| ८. श्वेतद्विप | तारक | करम्बनूर (उत्तमर - कोइल, कदम्बपुर) |
| ९. बदरिकाश्रम | नारायण | तज्जैमामणिकोइल (शरण्यनगर) |
| १०. नैमिष | अविनाशी हरि | तिरक्कण्डियूर (खण्डनगर) |
| ११. हरिक्षेत्र | शालग्राम | कुडलूर (संगमपुर) |
| १२ अयोध्या | राघवेन्द्र श्रीरामभद्र | कपिस्थलम् |
| १३ मथुरा | श्री बालकृष्ण | पुल्लभूदङ्कुडि |
| १४ मायापुरी | मधुसूदन | आदनूर(गोपुरी) |
| १५ काशी | भोगशयन | तिरक्कुडन्दै (कुम्भकोणम्) |
| १६ अवन्तिका | अवनीपति | तिरूविण्णगरम् (आकाशनगर) |
| १७ द्वारका | यादवेन्द्र | तिरूनारैयूर (सुगन्धगिरी) |
| १८ व्रज | गोपीजनवल्लभ | तिरूच्चैरै (सारक्षेत्र) |
| १९ वृन्दावन | नन्दनन्दन | नन्दिपुरविण्णगरम् |
| २० कालियव्हृद | गोविन्द | तिरूवेल्लियङ्कुडि (भार्गवपुरी) |
| २१. गोवर्द्धन | भवनाशक गोपवेशधारी भक्तवत्सल | तेरळुन्दूर (रथपात - स्थल) |
| २२. गोमन्त पर्वत | शौरि | तिरूविन्दलूर (इन्द्रपुर) |
| २३. हरिद्वार | जगत्पति | शिरूपुलुयूर (व्याघ्रपुर) |
| २४. प्रयाग | वेणीमाधव | तिरूक्कण्णपुरम् (श्रीकृष्णपुर, कण्वपुर) |
| २५. गया | गदाधर | तिरूक्कण्णमडैग (कृष्ण मट्गलपुर) |
| २६. गंगा-सागर-संगम | विष्णु | तिरूक्कण्णङ्कडि (कृष्ण-कुटी) |
| २७. चित्रकूट | राघव | तिरूनागै (नागपट्टणम्) |

| | | |
|---|---|---|
| २८. नन्दिग्राम | राक्षसहन्ता | कालिस्सीरामविण्णगरम् (त्रिविक्रमपूर) |
| २९. प्रभास | विश्वरूप | तिरुवालि-तिरुनगरी (वरिरम्भपुर) |
| ३०. श्रीकूर्मम् | अचल कूर्म | मणिमाडक्कोइल (तिरुनागूर-नागपुरी) |
| ३१. नीलाचल (जगन्नाथपुरी) | पुरूषोत्तम | वैकुण्ठविण्णगरम् (वैकुण्ठपुर ) |
| ३२. सिंहाचल | महासिंह (पना-नरसिंह) | अरिमेयविण्णगरम् (नभपुर) |
| ३३. तुलसीवन | गदापाणि | वण्पुरुषोत्तमम् (पुरुषोत्तम) |
| ३४. घृतशैल | पापहर | सेम्पोन्सेय- कोइल (स्वर्णमन्दिर) |
| ३५. श्वेताचल | सिंहस्वरूप | तिरूत्तेट्रियम्बलम् (लक्ष्मी-रङ्गनाथ) |
| ३६. धर्मपुरी | योगानन्द | तिरूमणिक्कूडम् (मणिकूट) |
| ३७. काकुल | आन्ध्रनायक | तिरूक्कावलम्पाडि (तालवन) |
| ३८. अहौबिल | गरूडाद्रिपर हिरण्य-कशिपुवधकारी नृसिंह | तिरूद्देवनार-तोकै (कीळेचालै - देवनगर) |
| ३९. पाण्डुरङ्ग (पंढरपूर) | विठ्ठल | तिरुवेल्लक्कुळम् (श्वेतह्रद) |
| ४०. वेङ्कटाचल (तिरूपति) | रमाप्रिय(श्रीनिवासबालाजी) | पार्थनपळ्ळि (पार्थस्थल) |
| ४१. यादवाचल (मेलुकोटे) | नारायण | तलैच्चङ्कनाण्मदियम - तलैच्चंकाडुपुर |
| ४२. घटिकाचल | नृसिंह | तिल्लै - तिरूचित्रकूटम् (चिदम्बरम्) |
| ४३. काञ्ची | वारणाचलपर कमललोचन (वरदराज) | तिरूक्कुडल (मधुरा) |
| ४४. परमेशपुर (शिवकाञ्ची) | यथोक्तकारी | तिरूमोहूर (माहूर) |
| ४५. काञ्ची | पाण्डवदूत, त्रिविक्रम, अष्टभुज | तिरूमालिरंचोलै (वृषभाद्रि) |
| ४६. कामासिकी शोभन | नृसिंह, मेघाकार, शुभाकार, शेषाकार | तिरूम्मेय्यम् (सत्यगिरि) |
| ४७. कामकोटि दिव्य दीपाभ | शितिकण्ठ के अन्तर्गत शुभप्रद कालमेघ, गरुडारुढ, कोटिसूर्य-समप्रभ, दिपप्रकाश, देवाधिप,प्रवालवर्ण | तिरूक्कोह्यिूर (गोष्ठीपूर) |
| ४८. श्रीगृध्रसरोवर | विजयराघव | तिरूपुल्लाणी (दर्भशयन) |
| ४९. अति पवित्र विक्षारण्य | वीरराघव | तिरूत्तंकालूर (शीतोद्यानपूर) |
| ५०. तोताद्रि | तुङ्गशायी | श्रीविल्लिपुत्तूर |
| ५१. गजस्थल | गजार्तिनाशक | श्रीवरमङ्गै |
| ५२. महाबलिपुर | महाबली | तिरूक्करूकुडि (करङ्गनगर) |

| | | | |
|---|---|---|---|
| ५३. | भक्तिसार | जगत्पति | तिरूक्कुरूकूर (आळवार-तिरूनगरी श्रीनगरी) |
| ५४. | श्रीमुष्ण | महावराह | तुलैविल्लिमङ्गनम् (धन्विमङ्गल) |
| ५५. | महीन्द्र | पद्नलोचन | श्री वैकुण्ठम् |
| ५६. | श्रीरङ्ग | जगन्नाथ (रङ्गनाथ) | वरगुणमङ्गै (वरगुण) |
| ५७. | श्री धाम | जानकीवल्लभ | तिरूप्पुलिंकुडि (चिंचाकुटी) |
| ५८. | सारक्षेत्र | सारनाथ | तिरूक्कुलन्दै (पेरूंकुलम्-बृहतडाग) |
| ५९. | खण्डन | हरचापभज्जक | तिरूप्पेरै (श्री नामपुर) |
| ६०. | श्रीनिवास स्थल | पूर्ण | तिरूक्कोलूर (महानिधिपुर) |
| ६१. | स्वर्णमन्दिर | सुवर्ण | तिरूवन्तपुरम (अनन्तशयनम्) |
| ६२. | व्याघ्रपुरी | महाविष्णु | तिरूवाट्टारू (परशुरामक्षेत्र) |
| ६३. | भक्तिस्थान | भक्तिदाता | तिरूवण्परिसारम् (रम्यस्थल) |
| ६४. | श्वेतत्हृद | शान्तमूर्ति | तिरूच्चेंकुनूर (सौरभपुर) |
| ६५. | अग्निपुरी | सुरप्रिय | कुट्टनाडु (शार्दूलनगर) |
| ६६. | भार्गव स्थल | भर्ग | तिरूवण्डूर |
| ६७. | वैकुण्ठ | माधव | तिरूवल्लवाळ (केरलपुर) |
| ६८. | पुरुषोत्तम | भक्तसखा | तिरूक्कडित्तानम् (गन्धनगर) |
| ६९. | चक्रतीर्थ | सुदर्शन | तिरुवारन्विलै आरन्मुलै (समृध्दिस्थल) |
| ७०. | कुम्भकोणम् | चक्रपाणि | तिरूक्काट्करै (मरूतट) |
| ७१. | भूतपुरी | शाङ्गधर | तिरूमूळिक्कलम् (श्री मूलधाम |
| ७२. | कपिस्थल | गजार्तिहर | विट्टुवक्कोडु (विद्वत्पुर) |
| ७३. | (तिरु) चित्रकुट | गोविन्द | तिरूनावाय् (नवपुर) |
| ७४. | उत्तमा | अनुत्तम | तिरूवयिन्दिरपुरम् (अहीन्द्रपुर) |
| ७५. | श्वेताचल | पद्नलोचन | तिरूक्कोवलूर (देहलीपूर) |
| ७६. | पार्थस्थल | परब्रह्न | तिरूवल्लिक्केणि (वृन्दारण्यक्षेत्र) |
| ७७. | कृष्णकोटि | मधुसूदन | तिरूनिन्नवूर (तिन्ननूर) |
| ७८. | नन्दपुरी | महानन्द | तिरूवेव्वलूर (वीक्षारण्य) |
| ७९. | वृध्दपुरी | वृषाश्रय | तिरूक्कडिकै (घटिकाचल) |
| ८०. | सङ्गमग्राम | असङ्ग | तिरूनीर्मलै (तोयाद्रि) |
| ८१. | शरण्य | श्री शरण | तिरूविडवेन्दै (वाराहक्षेत्र) |
| ८२. | दक्षिणद्वारका | जगत्पति गोपाल | तिरुक्कडल्मलै |
| ८३. | सिंहक्षेत्र | महासिंह | हस्तिगिरि |
| ८४. | मणिमण्डण | मल्लारि | तरुवेक्का (यथोक्तकारी) |

| | | | |
|---|---|---|---|
| ८५. | निबिङ | निविडाकार | अष्टभुजम् |
| ८६ | घनुष्कोटि | जगदीश्वर | तिरुत्तंका (दिपप्रकाश) |
| ८७. | मौहूर | कालमेघ | वेलुक्कै (कामासिकी) |
| ८८. | मधुरा (मदुरै) | सुन्दर, परमस्वमी | उरगम् (त्रिविक्रम्) |
| ८९. | श्री वरगुण | नाथ | नीरकम् (नीराकार) |
| ९०. | कुरुक | रमाप्रिय | कारकम् |
| ९१. | गोष्ठीपुत्र | गोष्ठपति | कार्वानम् |
| ९२. | दर्भशयन | दर्भशायी | तिरुक्कल्वनूर |
| ९३. | धन्विमङ्गल (अन्विल) | शौरि | पाटकम् (पाण्डवदूत) |
| ९४. | भ्रमरस्थल | बलाढ्य | निलात्तिङ्गल्तुण्डम् (चंद्रचूड) |
| ९५. | कुरङ्ग (पुर) | पूर्ण | पवळवर्णम् (प्रवाळवर्ण) |
| ९६. | वटस्थल | श्रीकृष्ण | परमेश्वरविण्णगरम् |
| ९७. | क्षुद्रनदी | अच्युत | पिरुप्पुक्कुळ्ळि (गृध्रक्षेत्र) |
| ९८. | अनन्तपुर | पद्मनाभ | तिरुवेङ्कटम् (तिरुपति, वेङ्कटाद्रि) |
| ९९. | ... | ... | सिङ्गवेल्कुन्नम् |
| १००. | ... | ... | तुवरै (द्वारका) |
| १०१. | ... | ... | अयोध्या |
| १०२. | ... | ... | नैमिषारण्य |
| १०३. | ... | ... | मथुरा |
| १०४. | ... | ... | तिरुवाइप्पाडि |
| १०५. | ... | ... | देवप्रयाग (कण्डम्) |
| १०६. | ... | ... | तिरुप्पिरिदि (ज्योतिष्पीठ) |
| १०७. | ... | ... | बदरिकाश्रम् |
| १०८. | ... | ... | शालग्रामम् (मुक्तिनारायण) |

## परिशिष्ट ७

*(वारणासी येथील आद्य मठाचा जीर्णोद्धार सर्वप्रथम करविल्यानंतर (१९७५) श्री विद्याधिराज तीर्थांनी १९७८ सालीं त्या मठांत चातुर्मास व्रताचरण केलें. त्यावेळीं वारणासींत स्थायिक झालेल्या महाराष्ट्रांतील तीर्थ पुरोहितांच्या संघाने श्री स्वामीजींचा गौरव समारंभ घडवून आणून एक मानपत्र अर्पण केलें. मुस्लीम राजवटींत पंचगंगा घाटावरील या मठाने स्वत्वाच्या रक्षणार्थ जी कामगिरी बजावली तिची कृतज्ञतापूर्वक नोंद घेऊन सदर मठाचे कार्य हिंदु-धर्मियांना अभिमानास्पद व भूषणास्पद असल्याची भावना त्यांत व्यक्त झाली आहे. मूळ संस्कृत भाषेंतील मानपत्र)*

८

॥श्रीः॥

एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति
आस्तिक्याङ्कुर सम्भवा स्वगुरुपत्सेवालवालोदया
सवैदुष्यदलायशः फलभरा संस्कारमूला पुनः ।
शौचाचार विचार सौरभभरैः सम्वासयन्तीं दिशः
सा विद्याव्रतति द्विजेन्द्र निचयैः सेव्या मुहुर्वर्धताम्॥

श्री श्रीमतान् श्रीमद्वैदिक मत प्रवर्तक श्रीमन्मध्वाचार्यचरणारविन्द
मिलिन्दां मानानाम् सिद्धसारस्वतानाम् अनन्त श्री विभूषित
श्रीमदिन्दिराकान्त तीर्थ श्रीपाद वडेर शिष्य
श्री कमलानाथ तीर्थ श्रीपाद वडेर शिष्य
श्री द्वारकानाथतीर्थ स्वामी श्रीपाद वडेर शिष्याणाम्
ब्रह्म दुर्वासो वेदव्यास सनादि चतुष्टय
नारायणतीर्थ वासुदेव तीर्थ पारम्परी परीतानाम्
अष्टादश प्रधान मठाधिष्ठान प्राप्त प्रतिष्ठानाम्
श्री गोकर्ण जीवोत्तम पर्तगाळी मठाधीशानाम्
श्रीमताम् विद्याधिराज तीर्थ स्वामि श्रीपाद वडेर महोदयानाम्
अभिनन्दन नन्दन प्रसूनाञ्जलिः ॥

यः शास्त्रवारिनिधि मन्थन मन्दर श्रीः भूयस्तपोव्रत पवित्र चरित्र मूर्तिः।
श्रीद्वैत मार्ग परिरक्षण कर्म दक्षो विद्याधिराजयतिराट् त्याविभाति नित्यम्।।
वेदादिशास्त्ररत पण्डित मण्डतेन्द्रः श्रीरामविट्ठल पदाब्ज रजोऽनुवर्ती
गोमन्तका भिध महीतल मण्डनाढ्य जीवोत्रमाह्वय मठाधिप एव भाति।।
श्रीब्रह्मनारद सनादि चतुष्टयाढ्य व्यासादिमुख्य कृत चारु परम्परायाम्।
भूयो निजैर्गुण गणैर्गणनीय एष श्रीमान् सुमेरु सदृशः सविभातिधाम्ना।।
नाना मनोज्ञ मतवाद विशुद्धचित्तैः आस्तिक्य कर्म पत्तिपालन चुन्युहृत्कैः।
बोभूष्यमाण मखिलै रपि यच्चिराय विद्याधिराज पद पङ्कज मानमामः।।
विद्याधिराज विबुधाधिप राजिराज शास्त्रव्रजाम्बुज महाग्रहराजिराज।
पीठाधिराज ननु माध्वमताधिराज सर्वाधिराज भवतश्चरणाब्जमीडे।।
हं हो मुस्लिम शासनस्य समये श्री भारते भारते ।

हिन्दूनाञ्च परस्परोदित महा भेदात्मनां सर्वतः।
येनैव स्वयमत्र सङ्घटनयैवैक्यं विधाय ध्रुवम् ।
स्वत्वं रक्षित मेन सोऽस्ति भवतां सत्सम्प्रदायो महान् ।।
काश्यामेष मठोऽपि हन्तहिचिरं लुप्तः समासीत्पुरा।
नाभूच्चिह्नमपि प्रकाममथ वा कुत्र स्वरुपं पुनः ।
आश्चर्यं खलु साम्प्रतं सहिमठो दोधूयमानैर्ध्वजै :।
राराजीति समस्त लोक कुहरै यत्नेनहि श्रीमताम् ।।

"इति निवेदयामो अ. भा. महाराष्ट्र तीर्थ पुरोहितसंघ सदस्याः"
वाराणसी

फाल्गुन शुद्ध प्रतिपदा शके १९००
दिनांक २७-२-१९७९

*परिशिष्ट - ७*

.(श्रीविद्याधिराजतीर्थांच्या श्रीगुरुपीठावरील २६ वर्षांच्या दैदीप्यमान कारकिर्दीबद्दल आणि विशेषतः त्यांच्या अपूर्व सिद्धी तथा श्रीशालिग्राम क्षेत्राच्या यात्रेची यशस्वी परिपूर्ती केल्याबद्दल आनंद व्यक्त करून त्यांना अभिवादन करण्याचा एक समारंभ गोव्यांतील समावृंदाने रविवार, दि. २८ फेब्रुवारी १९९९ रोजीं घडवून आणला. त्या समारंभांत श्रीस्वामीजींना अर्पण करण्यांत आलेलें मूळ संस्कृत भार्षेतील मानपत्र व त्या मानपत्राचा मराठी अनुवाद येथें देत आहोंत)

**मानपत्र-**

## श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीशाः

## परमपूज्याः श्रीमद्–विद्याधिराजतीर्थाः श्रीपाद वडेर स्वामिनः

चैत्र-शुक्ल २ (द्वितीया) तिथौ शके १८९५ मिते शालिवाहनशके बृहस्पति वासरे श्रीमठस्य ४९८ तमे संस्थापनादिने श्रीगुरुपीठासीनानां, तद्दिनात् प्रभृति आत्मनः संन्यस्तव्रतस्य वज्रनिर्धारेण पालनं कुर्वाणानां, तथैव विविधेषु सामाजिक–सांस्कृतिक-धार्मिक-आध्यात्मिक-क्षेत्रेषु स्नेहस्य तथैव सहकार्यस्य च आधारेण मठानुयायिवर्गेषु तथैव अखिल-सारस्वतानां समाजेषु अननुभूतं चैतन्यं निर्मितवतां ततश्च श्रीगोकर्ण - पर्तगाळी-जीवोत्तम-मठस्य कीर्तिं दिक्षु प्रसारितवतां, श्रद्धेयानां श्रीमठ-परंपरायां त्रयोविंशतितमानां श्रीगुरुस्वामिनां परमपूज्यानां श्रीमद्-विद्याधिराजतीर्थानां श्रीपाद-वडेर-महाशयानां पवित्रचरणकमले सश्रद्धं प्रणम्य अद्यतनीये शुभदिने वयं तेषां प्रति निखिलस्य गोमन्तक-सारस्वत-समाजवृन्दस्य आदरभावनाः विनिवेदयामः।

मठाधिपतेः संन्यस्तव्रतस्य कठोरं पालनं समाचरद्भिः श्रीस्वामिभिः यः अध्यात्म-धर्म-स्वाध्याय-महायज्ञः अखण्डतया समाचरितः तस्य परमोत्तुंगा परिणतिः नाम श्रीमन्न्यायसुधा मङ्गलपाठस्य सुयशोन्विता परिपूर्तिः (शके १९२०)। समाजसम्पर्क सातत्यार्थहेतुना यत्र यत्र सारस्वत-समाजः ऐतिहासिक कारणेन वा व्यवसायोद्यम कारणेन वा निवसति तत्र तत्र संचारम् अवलम्ब्य संवादं समालम्ब्य च श्रीस्वामिभिः समाजहृदयेषु स्वत्वस्य च स्वाभिमानस्य च तेजो ज्योतिः प्रज्वलिता तेषु च आन्तरिकीम् एकात्मतां वृद्धिः नीरवा सारस्वतसमाजः कुलदैवतानि श्रीगुरुचरणौ प्रति च अधिकमेव समाकर्षितः।

तीर्थाटनं संन्यास-धर्मस्य अविभाज्यं कार्यं ज्ञात्वा श्रीस्वामिभिः श्रीमठ-परम्परान्तर्गत-यतिवर्यैःकृतानां सर्वेषां पवित्रधाम्नाम् तथैव तीर्थस्थानानां यात्राः कर्तव्यबुद्ध्या कृताः। तासु सप्तानां मोक्षपुरीणां तथैव चतुर्णां धाम्नां तथा च अष्टवैष्णवानां दिव्यक्षेत्राणां सन्दर्शन यात्राः प्राधान्येन उल्लेखम् अर्हन्ति। तासु अपि सविशेषम् उल्लेखनीया यात्रा नाम नेपाळ-त्रिविष्टप (तिबेट) परिसरे गण्डकीनद्याःतीरे दामोदर-हिमालय-पर्वतश्रेणीनां संनिधौ भगवतः श्रीविष्णौः भूतलस्थितस्य पवित्र धाम्नः श्रीदामोदरकुण्डस्य(चक्रतीर्थस्य) दुर्गमा, दुर्लभा, कष्टसाध्या च ऐतिहासिकी यात्रा। आत्मनः सुखसुविधाः प्रकृतेः अस्वास्थ्यं

तथा साधनसामग्रीम् अविगणय्य श्रीस्वामिभिः अंगीकृतानि कार्याणि पूर्णतां नीत्वा श्रीमठस्य इतिहासे सुवर्णपर्वारम्भः कृतः इति अहो भाग्यमेव सकलसारस्वतानाम्।

एतादृशेषु ऐतिहासिकेषु कार्येषु अग्रगण्यः श्रीमठस्थापना-पंचशताब्द-महोत्सवः शके १८९९ संमिते वर्षे श्रीस्वामिभिः महता विभवेन सम्पादितः। तस्य उत्सवस्य माध्यमेन ऐतिहासिक कालात् इतस्ततः विकीर्णानां समाजबान्धवानां संघटनस्य प्रक्रियां समारभ्य श्री स्वामिभिः समाजः अननुभूतेन एकतासूत्रेण सुगुम्फितः। 'विद्याधिराज-पुरस्कार' योजनाधारेण समाजे विद्यमानानां गुणिजनानां समुचितगौरव-सत्कार प्रथायाः शुभारम्भः कृतः। चातुर्मासव्रतसमये अन्यस्मिन् वा प्रसङ्गे कृतवसति-परिसरस्थान् समाजश्रेष्ठान् सत्कार्यसम्मान पुरस्कारैः सत्कृत्य समाजसेवाकार्यम् गौरवान्वितं प्रतिष्ठां प्रापितं च श्रीस्वामिभिः।

तपोद्वयस्य अल्पीयसि एव काले स्वामिभिः श्रीसंस्थानकक्षान्तर्गतानां येषां सर्वेषां मठानां तथैव शाखामठानां जीर्णोद्धारः कारितः तेषु वारणासी-तीर्थक्षेत्रे पंचगंगा-रोधसि ईशान्यप्लवायाः गंगायाः तीरे स्थितः आद्यमठोऽपि समाविष्टः। श्रीस्वामिभिः देवमन्दिरस्तितानां प्रतिमानां पुनःप्रतिष्ठां तथैव मन्दिराणां जीर्णोद्धारं च सम्पाद्य मन्दिर-समाजयोः सम्बन्धः सुदृढतरः कृतः। सारस्वत-समाजस्य नूतनाः वसतयः यत्र यत्र समुत्पन्नाः तत्र तत्र श्री स्वामिभिः नवयुगस्य आवश्यकतानुसारं सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिकाणाम् अपेक्षाणां परिपूर्तये नूतनानि भव्यानि मठवास्तूनि निर्मितानि। परिवर्तितकालक्रमानुसारम् अनेक सामाजिकः शैक्षणिकाः सांस्कृतिकाः च उपक्रमाः प्रारब्धाः। विविधान् यज्ञयागान् सम्पाद्य समाजबान्धवेषु धर्मभावनायाः धर्मश्रद्धायाश्च वृद्धिः आकारिता। तस्य प्रधानं निदर्शनं नाम मठमुख्यालयस्य ईशान्यप्लवाकुशावती-तीर्थे तटस्थितस्य पुरातन-मठवास्तोः त्रिभागीयं कायाकल्पं कारयित्वा विस्तारकार्यं पूर्णतां च नीत्वा श्रीस्वामिचरणैः श्रीरामदेवस्य कण्ठे वास्तुरूपिणी पुष्पमाला सुप्रतिष्ठापिता इति प्रतिभाति।

केवलं प्रधानविशेषः एव अत्र उल्लिखिताः। वयम् एतेषाम् अन्येषां च विविधानां कार्यसिद्धीनां साक्षिभूताः। श्रीस्वामिचरणानाम् असीमा कार्यसिध्दिः मन्त्रशक्तिप्राप्तम् अमोघं वाग्वैभवं, साधनशुचितानिष्ठा, कालबद्धतया अनुशासनदक्षतया अखिलकार्यक्रमपूर्ततादर्शः अंगीकृत-व्रतस्य कठोराचरणम् इत्यादिगुणान् श्रीस्वामिसान्निध्य लाभात् अवलोक्य अस्माभिः प्रतिपदं दिव्यत्वं साक्षात्कृतम् येन अस्माकं हृदयानि भक्त्यादरेण आकण्ठं परिपूरितानि। अस्माकं कृतार्थभावनायाः समुल्लेखः शाश्वतं तिष्ठतु इति हेतुना सविनयम् शब्दसंमान सुमनसाम् अंजलिं परमपूजनीयानां श्रीस्वामिनां पुण्यचरणयोः समर्प्य धन्यधन्यताम् अनुभवामः।

मठग्राम - गोमन्तकः
तिथिः फाल्गुन - शुद्ध - त्रयोदशी, शके १९२०
रविवारः दिनांक २८ फेब्रुआरी १९९९

*परिशिष्ट - ८*

**मानपत्राचा मराठी अनुवाद**

## श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी मठाधीश

## परमपूज्य श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी

चैत्र शुक्ल २या शके १८९५ या मंगलदिनी, जो श्रीमठाचा ४९८ वा संस्थापनदिन होता, श्रीगुरुपीठासीन झाल्यापासून ज्यांनी आपल्या संन्यस्तव्रताचे निर्धारपूर्वक पालन करतानाच सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रांत धर्माचरणाला स्नेह व सहकार्याची जोड देऊन मठानुयायी वर्गामध्ये आणि सकल सारस्वत समाजामध्ये अभूतपूर्व चैतन्य निर्माण केलें, जेणेकरून श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाची कीर्ति दिगंत झाली, ते श्रीमठ परंपरेतील तेविसावे गुरुस्वामी परमपूज्य श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर यांच्या चरणकमलांना सश्रद्ध अंतःकरणाने आम्ही वंदन करतों आणि आजच्या दिवशी तमाम गोमंतकस्थ सारस्वत समाजवृंदाची आदरयुक्त भावना विदीत करतों.

मठाधिपति या नात्याने संन्यस्त व्रताचे कठोर पालन करताना श्रीस्वामीजींनी धर्म-अध्यात्माच्या स्वाध्यायाचा महायज्ञ अखंड चालविला, ज्याची एक उत्तुंग परिणती संबोधता येईल ती श्रीमन्न्यायसुधा मंगलपाठाची यशस्वी परिपूर्ति (शके १९२०) होय. समाजाकडे सतत संपर्क रहावा या दृष्टीने जेथे जेथे सारस्वत समाज ऐतिहासिक कारणासाठी असो वा उद्योग-व्यवसायासाठी असो, स्थायिक झालेला असेल तेथे संचार करून सत्संग व संवादाद्वारे समाजामध्ये हृदयस्थ स्वत्व व स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित केली व आंतरिक एकात्मता वृद्धिंगत करताना कुलदैवतांकडे व श्रीगुरुचरणांकडे समाजाला अधिक आकृष्ट करून घेतले.

तीर्थाटन हा संन्यास धर्माचा अविभाज्य भाग मानून श्रीमठ परंपरेंतील यतिवर्यांकडून घडलेल्या साऱ्या पवित्र धामांची व तीर्थस्थानांची आग्रहाने यात्रा केली, त्यांमध्ये सप्त मोक्षपुरी, चतुर्धाम यात्रा, अष्टवैष्णव दिव्य क्षेत्र संदर्शन यांचा अंतर्भाव आहे. त्यांतहि विशेष उल्लेखनीय अशी नेपाळ-तिबेट परिसरांतील गंडकी नदीच्या किनारी दामोदर हिमाल पर्वतरांगांच्या सान्निध्यांतील भगवान् श्रीविष्णूचे भूतलावरील पवित्र धाम मानल्या जाणाऱ्या श्रीदामोदर कुंडाची (चक्रतीर्थ) दुर्गम, दुर्लभ व कष्टसाध्य अशी ऐतिहासिक यात्रा पूर्ण केली. वैयक्तिक सुखसोयी,

प्रकृति अस्वास्थ्य अथवा साधनसामुग्रीच्या अभावाची पर्वा न करता श्रीस्वामीजींनी सारीं अंगीकृत कार्यें पूर्णत्त्वास नेऊन श्रीमठाच्या इतिहासांतील सुवर्ण पर्वाचा आरंभ केला.

अशा ऐतिहासिक कार्यांमध्ये श्रीमठ स्थापनेचा पंचशताब्दि महोत्सव शके १८९९ साली वैभवाने साजरा करून ऐतिहासिक कारणामुळें इतस्ततः विखुरलेल्या समाजाला संघटित करण्यासाठी प्रक्रिया कार्यरत केली व समाजांत अभूतपूर्व एकता घडवून आणली. 'विद्याधिराज पुरस्कार' योजनेद्वारे समाजांतील गुणिजनांचा यथोचित गौरव करण्याची प्रथा सुरू केली. चातुर्मास व्रतकालीं अथवा अन्य प्रसंगीं वास्तव्य केलेल्या परिसरांतील समाजश्रेष्ठींच्या सत्कार्याची सन्मानपूर्वक पावती देऊन समाजसेवेला मान्यता व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

दोन तपांच्या अल्पावधींत श्रीसंस्थानच्या कक्षेतील सर्व मठ व शाखामठ यांचे जीर्णोद्धार करविले, ज्यांमध्यें वारणासी तीर्थक्षेत्रीं पंचगंगा घाटावरील ईशान्यप्लवा गंगेच्या तीरी असलेल्या आद्य मठाचा समावेश आहे. देव मंदिरांमधील प्रतिमांची पुनःप्रतिष्ठा व मंदिरांचे जीर्णोध्दार करून समाज व मंदिरांमधील दुवा दृढतर केला. सारस्वत समाजाच्या नव्या वसाहती जेथे निर्माण झाल्या तेथे तेथे समाजाची सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक गरज भागविण्यासाठीं नव्या भव्य मठवास्तु उभ्या केल्या. तसेच बदलत्या काळाच्या गरजा ओळखून अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम सुरू केले. विविध यज्ञयागांद्वारे धर्म व धार्मिकतेची भावना वाढीस लावली. विशेष म्हणजे मठाचे मुख्यालय असलेल्या ईशान्यप्लवा कुशावती तीर्थाच्या तटावरील पुरातन मठवास्तूचा तीन टप्प्यांत कायाकल्प करवून विस्ताराचे कार्य पूर्णत्वास नेले व त्यायोगे श्रीरामदेवाच्या गळ्यांत वास्तुरूपी माला प्रतिष्ठित केली.

हे केवळ ठळक विशेष आहेत. या व इतर अनेक अपूर्व सिद्धीचे आम्ही साक्षीदार. अचाट कार्यसिद्धि, मंत्रशक्ति प्राप्त झालेली अमोघ वाणी, साधनशुचितेचा आग्रह, प्रत्येक कार्यक्रम कालबद्ध व शिस्तबद्ध रीतीने पूर्णत्वास नेण्याचा आदर्श, स्वीकृत व्रताचे कठोर आचरण, हे सारे सद्‌गुण जवळून पाहताना आम्हाला पदोपदीं दिव्यत्वाची प्रचीति आली आणि आमचीं मने आदर व भक्तीने आकंठ भरून गेलीं. या कृतार्थतेच्या भावनेची नोंद रहावी या हेतूने अत्यंत नम्रतेने हा शब्दसन्मान परमपूज्य श्रीस्वामीजींच्या चरणी अर्पण करीत आहोंत.

मठग्रामस्थ - गोमन्तक
फाल्गुन शुद्ध त्रयोदशी, शके १९२०
रविवार, दि. २८ फेब्रुवारी १९९९

